७ फेब्रुवारी १९७०
चाळीस पैसे

# माणूस

‘ टिकाव मारीन तिथे पाणी काढीन ’
अशी या मागाठणे शिबीरार्थींची जिद्द होती.



७ फेब्रुवारी १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस


वर्ष नववे : अंक छत्तीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये



सध्याच्या निवडणुकीच्या तंत्रात विधानसभेच्या उमेदवाराला देशभरच्या कुठल्याही मतदारसंघांतून उभे राहण्याची मुभा आहे. पण मतदाराला मात्र कुठल्याही मतदारसंघातल्या आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मते देण्याची मुभा नाही, हा त्याच्यावर अन्यायच आहे. ह्यामुळे एका हाताने दिलेला त्याचा मताचा हक्क ठराविकच भागातला उमेदवार निवडण्याची सक्ती लादून दुसऱ्या हाताने काढून घेण्यात आला आहे. तरी पुढल्या सार्वजनिक निवडणुकीच्या आधी उमेदवाराइतकेच स्वातंत्र्य मतदारालाही देण्याची तजवीज लोकसभेने करावी.

जानेवारी, २७ अशोक शहाणे, रघू दंडवते, नंदू राजे, नंदकिशोर मित्तल, मुंबई.

आपला ३१ जाने. चा ' माणूस ' वाचला..खूप आवडला. कारणे दोन. एक श्री. हिदायत खान यांचा तर्कसुसंगत निकडीचा व भाववाही विचारप्रधान लेख. दुसरे म्हणजे विजय तेंडुलकरना त्यांच्या तिघा सुहृदांनी दिलेले मनमोकळे व जिव्हाळ्याचे धन्यवाद. डॉ. लागू नेमक्या शब्दांत व नेमक्या वेळी तेंडुलकरना हृदय व ग्लास ओसंडणारे ' चीअर्स ' देतात. असे मनःपूर्व व निरोगी चीअर्स आपल्या कर्तबगार बांधवांना द्यायला आपण कधी शिकणार आहोत ?... तुम्हालाही म्हणूनच धन्यवाद ! ' माणूस ' हे महाराष्ट्राचे एक वैचारिक खुल्लमखुल्ला व्यासपीठ....उथळ चर्चेसाठी नव्हे.... होण्याची सुचिन्हे या अंकावरून मला दिसताहेत. हिदायत खान महाराष्ट्रांतील मुसलमानांचे दुखणे बरोबर बोलून दाखवितात. त्याचप्रमाणे त्यांच्या उणीवांवर व दोषांवरही अचूक बोट ठेवतात. हा महाराष्ट्राचा उगवता व आशा निर्माण करणारा ललित लेखक वैचारिक पातळीवरही बरेच समर्थ कार्य करू शकेल असा भरंवसा त्याचा लेख वाचून वाटला. त्यांचे म्हणणे खरेच आहे !.... हमीद दलवाईंचा खरोखरच ' रोल ' कोणता आहे ?— तेंडुलकरांची ' रातराणी ' पुनः सुरू झाली की काय ?.... पुनःश्च आपल्या द्रष्टया संपादनाला धन्यवाद !

जानेवारी, ३० प्र. श्री. नेरुरकर, विलेपार्ले

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मी स्वतः या मंडळींच्या

घरी चिठ्ठी येऊन पडलेली असते. आज माणूस कार्यालयामध्ये श्री. मोहन धारिया येणार आहेत, आपण अवश्य यावे. चिठ्ठी बरहुकूम मी हजर होतो. ठरल्याप्रमाणे धारिया येतात. अन्य निवडक मित्रमंडळीही हजर असतात, चर्चा रंगत जाते आणि औपचारिकतेचे पटल हळुवारपणे गळून पडून चर्चेला गप्पांचे स्वरूप येते. गप्पांच्या ओघातच श्री. धारिया यांच्याबरोबर मी नगरला जाण्याची कल्पना पुढे येते. मी तात्काळ होकार देऊन मोकळा होतो.

गाडीमध्ये स्वत: धारिया, मी, एक कार्यकर्ते श्री. गोडे आणि ड्रायव्हर—नाही धारिया यांचे ड्रायव्हर मित्र श्री. पवार इतकी मंडळी असतात. जवळपासच्या दौऱ्यांच्या वेळी एखाद्या ' चक्रधारी ' दोस्ताला बरोबर नेण्याचा त्यांचा परिपाठ असल्याचे समजते.

कार्यक्रम पूर्वनियोजित असल्याने कशा स्वरूपाची चर्चा करायची याची काही निश्चित योजना मनाशी आखलेली असते. पण लवकरच लक्षात येते की छे:, हे काही खरे नाही. अर्ध्या—एक तासाच्या मुलाखतीला प्रश्नोत्तराचे जे स्वरूप असते तसे स्वरूप देण्याची काहीच गरज नाही. म्हणून मूळ योजलेली कल्पना बाजूला टाकून मी चक्क गप्पांचा पवित्रा घेतो. या बदललेल्या पवित्र्याला धारियाजींकडून मनमोकळा प्रतिसाद मिळतो. गप्पांच्या ओघामध्ये आम्ही नगरच्या वेशीवर कधी पोहोचतो तेही समजले नाही.

गाडी रेल्वे क्रॉसिंग ओलांडून नगरमध्ये येते, आणि तरुण कार्यकर्ते धावत पुढे येतात. हारतुरे आगत—स्वागत होते. आणि लक्षात येते या मंडळींच्या दृष्टीने आपण नगण्य आहोत. बदललेली ' पोझिशन ' लक्षात घेऊन या मंडळींनी आणलेल्या जीपमध्ये मी जाऊन बसतो.

नगरमध्ये ठरलेले कार्यक्रम दोन. संध्याकाळी ६।। वाजता युवक कॉंग्रेस मेळाव्या-

### खोजाची चाळ - श्रमिक नगर

# बाजूने उभा राहणार आहे

**— मोहन धारिया**

पुढे भाषण, आणि रात्री जाहीर सभा. आम्ही दुपारी पुण्याहून निघून संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास नगरमध्ये दाखल झालेले असतो. चहापान करून थोडी विश्रांती घेऊन युवक काँग्रेस मेळाव्यापुढे जाण्याची मूळ योजना असते.

एक पोरसवदा कार्यकर्ता सांगतो—भाईजी, आपण आधी आमच्या दुकानामध्ये जाऊ, आम्ही नवीन दुकान घातले आहे. धारियाजी चहापान तिथेच करतील. जीप दुकानासमोर उभी राहते. रस्त्यावर तुफान गर्दी असते. लाउडस्पीकरवर कुठले तरी अफलातून फिल्मी गीत चालू असते. धारियाजींची गाडी थांबल्याबरोबर गीत ही कच्कन बंद होते. तमाम जनता बहिरी आहे अशी समजूत करून घेऊन दूरध्वनिक्षेपकावर कोणीतरी गर्जना करते—सुरज वस्त्रभांडार, खासदार, भारताचे (?) तरुण तुर्क नेते मोहन धारिया यांचे स्वागत करत आहे! हसतमुख चेहऱ्याने धारियाजी दुकानात प्रवेश करतात. अन्य मंडळींबरोबर मीही दुकानामध्ये घुसतो. वंदे मातरम् म्हणण्यासाठी शाळा—कॉलेजच्या संमेलनात पोरे जशी रंगमंचावर उभी राहतात तसे आम्हाला उभे करण्यात येते. फ्लॅशेस् उडतात. धारियाजींनी दुकानाला भेट दिल्याचा पुरावा नोंदला जातो. भली मोठी प्लॅस्टिक वादली आमच्या समोर ठेवण्यात येते. चिठ्यांच्या चळतीने वादली शिगोशीग भरलेली असते. दुकानाचे मालक धारियांना खूण करतात. धारियाजी मिस्कीलपणे माझ्याकडे पहातात. आणि एक चिठ्ठी उचलतात. जमलेल्या गर्दीचे रहस्य आता लक्षात येते. दूरध्वनिक्षेपक गर्जना करतो.

बक्षीस पहिले तिकीट क्रमांक १९४७. दुसरी चिठ्ठी निघते, तिसरी निघते. मी कोण, कशासाठी आलो याचा मंडळींना अजून पत्ता नसतो. पण मी धारियाजींबरोबर आहे ही वस्तुस्थिती पुरेशी असते. चिठ्या काढण्याचा मान मलाही दिला जातो. महाराष्ट्र लॉटरीची ही छोटी कॉपी, धंदा वाढवण्यासाठी मालकांनी मोठ्या

खुबीने योजलेली असते. धारियाजींना या कार्यक्रमामध्ये गुंतवून राजकारण आणि अर्थकारण यांची गुंतवणूक करण्याच्या व्यापारी कौशल्यावर आपण खुश होतो. बक्षिसांचे नंबर काढून होतात, आणि बक्षिसे लगेच घेऊन जाण्याची घोषणा होते. आता मात्र धारियाजीही धास्तावतात. घड्याळाकडे नजर टाकतात. व्यापारी बंधू काय समजायचे ते समजतात. अन्य मंडळींबरोबर मी वरच्या मजल्यावर जातो. काजू-बेदाण्याचे ताट बैठकीमधून फिरते. दुकानदारातर्फे पाहुण्यांना हारतुरे घातले जातात. कोणीतरी हळूच सांगते. दोन हार बाकी आहेत. अरे, एक हार पाहुण्यांना

# माझी मनोव्यथा...

मुंबईला आमची खोजाची चाळ. करीरोड येथे. तेथेच बहुतेक बालपण गेले. चाळ शंभर वर्षांची. मालक काहीच करीत नव्हता. लोकांनी बळेबळे जोडून संघटना हाती सोपविली. १९६४ साल उजाडले. मालकांना दुरुस्ती-संबंधाने विचारले. त्या दिवसापासून आजपर्यंत आपले नियमित भाडे वसु-लीस तो येईनासा झाला. काहीतरी करावयास हवे होते. नाहीतर आम्ही बेघर होणार होतो. मालकाने भाडे न्यावे म्हणून कायद्याने नोटिस दिली. नियमित भाडे घेण्यास सुचविले, पण उत्तरच आले नाही.

भाडेकरू संमिश्र, देशस्थ, कोकणस्थ, उत्तर भारतीय, हैद्राबादी. अशाही लोकात संघटना उभी केली. इमारत दुरुस्त करण्याचे ठरविले. निधी उभा केला. लोक गरीब, पण राहायला जागा पाहिजे होती. ऐवज गहाण ठेवून पैसा उभा केला. आर्थिक बळ आले, पण पुढे काय ?

मुंबई पालिकेने साहाय्य करण्याचे ठरविले. संकल्पित इमारतीचा प्लॅन तयार झाला; पण मालक नगरपालिकेच्या किमतीत जागा देईनासा झाला. आमचे संकल्पित प्लॅन कोसळले.

महाराष्ट्र हौसिंग बोर्डाने जागा होण्याची कबुली दिली, पण त्यांच्या ठरलेल्या प्लॅनमध्ये आमचे दोनशे भाडेकरू बसेनात. संपले! हाही एक आशेचा दीप मालवला.

चार वर्षे स्वस्थ बसलेला मालक जागा झाला. १९६९ साली त्याने कायद्याचे समन्स काढले. आम्हाला जागा खाली करण्याचा आदेश होता. वकील म्हणाले, 'कायद्याने तर भाडे द्यावेच लागणार; पण तुमचा फायदा काय होणार ? तुम्ही तर शेवटी अशा अवस्थेत बेघरच होणार. तुम्ही दुरुस्ती सुरू करा. मी पुढचे पाहतो.'

घाला. मोर्चा माझ्याकडे वळतो. 'छे! छे! हे काय! अहो, मी पत्रकार आहे' असे म्हणत गळयात येणारा हार हातात घेऊन मी बाजूला होतो. माझी Identity स्पष्ट झाल्याने मंडळींना बरे वाटते.

वाघ नावाचे कोणी कार्यकर्ते आजारी असल्याने त्यांच्या घरी जाण्याचा धारियाजींचा विचार असतो. राजकीय पुढाऱ्यांचे घरगुती कार्यक्रम कशा स्वरूपाचे असतात याची कल्पना असल्याने, मी हा कार्यक्रम टाळून युवक काँग्रेसचा कार्यक्रम जेथे होणार असतो त्या सभागृहात दाखल होतो.

आम्ही अहोरात्र बायका–मुलांनीशी राबलो. कष्ट म्हटले नाहीत, पैसे पाहिले नाहीत, आमचे मोडके घरटे दुरुस्त केले. हा हा म्हणता खोजाच्या चाळीचे श्रमिक नगर झाले. मालक पिसाळला आहे. सरकार, नगरपालिका ह्यांनी सहकार्य केले नाही. कायद्याचे सल्लागार आम्हालाच गुन्हेगार म्हणत आहे. आमचे कोण ऐकत नाही. कदाचित कायद्याने आम्ही गुन्हेगार असू; पण ह्यातून बचावाचा एकही मार्ग नाही का? आम्हाला कोणीच वाचवू शकणार नाही का? आमचे नैतिक बळ फुकट जाणार का?

परवा मोहनबाबू धारिया आले होते. आमचे दुःख, अश्रू पाहून ते हळहळले. म्हणाले, "कायद्याने जरी संरक्षण नसले तरी तुमच्या नैतिक सामर्थ्यानिशी मी ह्या इमारतीसमोर उभा राहीन."

क्षणोक्षणी समाजवादाचा उदोउदो करणाऱ्या ह्या राज्यात आमच्या व्यथा कमी होणार नाहीत का? सर्वजण आले, आमच्या जखमेवर फुंकर घालून गेले. पण खोलवर झालेल्या आमच्या जखमेवर कोणी औषध लावील का?

समाजवादाच्या नावाखाली व्यासपीठे रंगत आहेत. सिंडिकेट, इंडिकेट आपली अधिवेशने एक दुसऱ्यापेक्षा सरस होण्यासाठी लाखो रुपयांची उधळण करीत आहेत. ह्या फारकतीत थोडीशी आशा दिसते; पण आमच्याजवळ येणारे फक्त सुंदर वक्तृत्व करून जात आहेत. प्रत्यक्षात अजून अंधकारच आहे. आम्हाला आशेचा दीप कोठेच दिसत नाही. आम्ही मात्र निराशेकडे लोटले जात आहोत. आमच्यासारखे, व्यथा असणारे मात्र ह्यातुन होरपळून जात आहेत. ह्या वादातून, फारकतीतून काहीच साध्य होणार नाही। गरीब तो गरीबच राहणार, आणि ह्याहीपेक्षा खडतर जीवन त्याला जगावे लागणार आहे; आमच्याजवळ गरुडझेप घेण्याकरिता असणारे अवसान मात्र फुकट जाणार आहे.


— सुरेश आप्पा गायकवाड

गर्दी जमू लागलेली असते. तरुण मंडळी उत्साहाने वावरत असतात. विलास सप्तर्षी, अशोक इनामदार, टी. पी. काळे, डी. एम्. कांबळे, बी. एस्. गुजर ही कार्यकर्ती मंडळी समारंभाच्या नियोजनामध्ये दंग झालेली दिसतात. एकेकाला पकडून मी बोलता करण्याचा प्रयत्न करीत होतो. पण मनमोकळेपणे बोलण्याच्या मनस्थितीत फारसे कोणी नव्हते. विलास सप्तर्षी हा पदवीधर तरुण कार्यकर्ता, बी. कॉम होऊन एम्. कॉमचा अभ्यास करतो आहे. 'काँग्रेसमधील संघर्षाशी आम्हाला फारसे कर्तव्य नाही. आम्ही फक्त विधायक कार्य करतो. सिंडिकेट–इंडिकेटचा वाद आमच्या थरापर्यंत आलेला नाही.' मी त्याला म्हणालो, 'तात्त्विक चर्चेसाठी आपण धरून चालू, की पक्षांतर्गत फूट तुझ्यापर्यंत आली, आणि तुला बाजू निवडण्याची वेळ आलीच, तर तू कोणत्या बाजूने उभा राहशील ?' त्याने तात्काळ उत्तर दिले, 'इंडिकेटच्या बाजूने.' मी विचारले, 'का ?' – आधी निश्चित उत्तरच मिळाले नाही. मग म्हणाला, 'सर्वसाधारणपणे कार्यकर्त्यांचा ओघ त्या बाजूस आहे. आपणही त्या मार्गाने जाणे बरे.' वैचारिक मतभेद, तात्त्विक संघर्ष, समाजवाद, याचा उल्लेख त्याच्या खुलाशामध्ये आला नाही. विलासखेरीज अन्य चार पाच तरुण कार्यकर्ते पकडले. प्रत्येकाजवळ हीच उत्तरे तयार. शिवाय जाताना, नावे छापू नका अशी विनंतीवजा आज्ञा.

नगरची लोकसंख्या एक लाखाच्या वर गेली आहे. गावात महाविद्यालये दोन. एकूण विद्यार्थीसंख्या तीन हजाराच्या वर. शिवाय एक बी. एड्. कॉलेज व प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण केंद्र. या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संघटनांपैकी युवक–काँग्रेस व विद्यार्थी परिषद या प्रबळ संस्था. युवक काँग्रेसचा कल उघड उघड इंडिकेटवादी आहे. विद्यार्थी परिषदेवर अर्थातच जनसंघाची पकड आहे. गावामध्ये फेरफटका मारल्यावर एकंदरीत इंडिकेट काँग्रेसचे पारडे जड असल्याचा लगेच प्रत्यय येतो. नाईक–निंबाळकरांनी महाराष्ट्रामध्ये सिंडीकेटची जी आघाडी उघडली आहे त्यामध्ये नगरचे प्रतिनिधित्व उत्तमचंद बोगावत करतात. दहा वर्षे खासदारकी भोगलेल्या बोगावतांबद्दल एकंदरीत आस्था बेताचीच दिसून आली. राजकीय पक्षांच्या बलाबलाची तुलना करावयाची झाल्यास इंडिकेट काँग्रेस, उजवे कम्युनिस्ट, आणि जनसंघ अशी क्रमवारी लावावी लागेल.

संध्याकाळी साडेसहा पावणेसातच्या सुमारास धारियाजी सभागृहात दाखल झाले. मेळाव्याला गर्दी चांगल्यापैकी होती. ग्रामीण भागातूनही युवक काँग्रेसचे कार्यकर्ते आलेले दिसले. जिल्हा काँग्रेस अध्यक्ष आमदार मारूतराव घुले पाटील उपस्थित होते. वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तांमुळे धारियाजींभोवती 'ग्लॅमर' निर्माण झाले असल्याने त्यांचे विचार ऐकण्यास मंडळी उत्सुक असलेली दिसली. परिचय, स्वागत आदी कार्यक्रमानंतर धारियाजींनी सुमारे तासभर मार्गदर्शनपर

[पृष्ठ ५५ वर]



# दिल्ली

## दिनांक २७ जानेवारी

### अणुबाँबचे आकडेशास्त्र

चंदीगडलाही मागे टाकणारी या आठवड्याची सनसनाटी बातमी अशी आहे की तिचा सरकारने म्हटल्यास आहे म्हटल्यास नाही अशा पद्धतीने इन्कारही केला आहे. ती म्हणजे भारत सरकारचे अणुबाँब-विषयक धोरण अखेर बदलण्याच्या मार्गावर असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत ही होय. अणुशक्तीच्या बाबतीत सल्ला देणाऱ्या पार्लमेंटरी कमिटीची बैठक गेल्या आठवड्यात झाली, तेव्हा अणुबाँब तयार करायला काय खर्च येईल याचा सरकारने आढावा घ्यावा अशी जोरदार मागणी प्रस्तुत कमिटीत करण्यात आली व सरकार तसे करायला कबूल झाले आहे असे वृत्त आहे. हा प्रश्न बैठकीत प्रथम संसोपाचे जॉर्ज फर्नांडिस यांनी उपस्थित केला व मग प्रसोपाचे समर गुहा इतकेच नव्हे तर सरकारी काँग्रेसचे कृष्णकांत यांनी देखील ही कल्पना उचलून धरली.

हा मुद्दा निघाला तेव्हा प्रथम सरकारने या बाबतीत यूनोच्या एका तज्ज्ञ समितीने तयार केलेला अहवाल मंडळीत वाटला, पण हे टोलवाटोलवीचे धोरण पुरे करा असा सल्लागार मंडळींनी आग्रह धरला. प्रस्तुत अहवालात म्हणे असे मत प्रकट करण्यात आले आहे की, आटोपशीर अणुशस्त्र-संभार उभारायचा म्हटला तरी दहा वर्षांच्या कालखंडात किमान १२६५ कोटी रुपये खर्च करावे लागतील. खर्चाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी भारत व चीन यांच्या शस्त्रसज्जतेत जे चिंताजनक अंतर पडत चालले आहे ते भारत कसे भरून काढणार आहे हा प्रमुख सवाल सरकारला करण्यात आला. सरकारी काँग्रेसचे प्रतिनिधी कृष्णकांत यांनी असेही विचारले की, भारत सरकार जर अणुबाँब करणार नसेल तर अणुबाँब-विरोधी आंतरराष्ट्रीय करारावर सही करण्यास नकार देण्याचा अर्थ काय ?

खर्चाच्या हिशेबाचे आकडेही यूनो-तज्ज्ञांनी जे दिले आहेत ते काही सल्लागारांना मान्य झालेले नाहीत. त्यांच्या मते अणुबाँबसाठी लागणारे युरेनियम तयार करण्याची एक नवीन प्रक्रिया निघाली असून तिच्यामुळे अणुबाँब तयार करण्याचा खर्च आता निम्म्याने कमी झाला आहे. एका सल्लागाराने या बाबतीत नुकतेच अमेरिकेहून आलेले व जनसंघाला मिळालेले तरुण अर्थशास्त्रज्ञ श्री. स्वामी यांचा

हवाला दिला. श्री. स्वामी यांनी अणुबाँब भारताच्या अगदी आवाक्यातला आहे असे सिद्ध करणारे आकडे दिले आहेत. या आकड्यांनुसार भारताला पाच वर्षांच्या कालखंडात एकूण ७५० कोटी रुपये खर्च करावे लागतील. स्वामींनी असे मत प्रकट केले आहे की, चीनच्या दिशेने रोखलेला भारतीय अणुशस्त्र-संभार दिल्लीच्या जवळपास उभारायचा म्हटला तर आपल्या सुरक्षा बजेटच्या आठ टक्क्यांहूनही कमी खर्च येईल. त्यांचा मुख्य मुद्दा असा की कुठलाही स्वाभिमानी देश स्वत:च्या संरक्षणाची तरतूद शक्य तोवर स्वत:च करील.

सल्लागार समितीच्या बऱ्याच सदस्यांना स्वामींचे हे म्हणणे पटले व त्यांनी असा आग्रह धरला की चीनपासून भारताचे संरक्षण करण्याच्या कामी अगदी प्राथमिक गोष्ट म्हणजे सरकारने अणुबाँबच्या खर्चाचा अंदाज करायला हवा होता. तो अजूनही न घेण्याची सरकारने केलेली चूक आता सुधारण्यात आली पाहिजे. या बाबतीत लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे श्री. स्वामी यांचा भारतीय अणुबाँबचा अर्थशास्त्रीय तपशील, जनसंघाने दोन वर्षांपूर्वी अखिल भारतीय अधिवेशनाच्या निमित्ताने काढलेल्या स्मरणिकेत प्रसिद्ध झालेल्या लेखात दिला होता. त्यावेळी ते अमेरिकेत हार्वर्ड या जगप्रसिद्ध विश्वविद्यालयात प्राध्यापक होते. त्याच स्मरणिकेत 'इंडियन इन्स्टीटयूट ऑफ पब्लिक ओपिनियन' या नव्या दिल्लीतील संस्थेने अणुबाँबवर घेतलेल्या 'घोडदौड' मतमोजणीचे आकडेही देण्यात आले होते, व त्या आकड्यांवरून स्पष्ट झाले होते की, बहुसंख्य भारतीय अणुबाँबच्या बाजूचे आहेत. हे आकडे लक्षात घेता इंदिरा सरकारने अणुशस्त्र-विषयक सरकारी धोरणात असा अगदी प्राथमिक स्वरूपाचा बदल करायचा निर्णय घेतला तरी सरकारी काँग्रेसच्या लोकप्रियतेत एकदम भर पडेल हे सुज्ञास सांगणे नलगे. आणि सध्या तरी सहकारी काँग्रेसला लोकप्रियतेची बरीच गरज आहे हे निर्विवाद.

पण कुठल्याही बाबतीत स्पष्टता नसणे हे सरकारचे व्यवच्छेदक लक्षण असते. त्यामुळे हा सनसनाटी निर्णयही स्पष्टपणे घेण्यात आला आहे अशी समजूत शहाण्याने करून घेऊ नये. प्रस्तुत सल्लागार समितीची बैठक इंदिराजींच्या अध्यक्षतेखाली व्हायची, पण त्या दौऱ्यावर असल्याने नंदिनी सत्पथी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सल्लागार समितीने सरकारकडून हे आश्वासन मिळविल्याची बातमी वर्तमानपत्रात झळकली तेव्हा वार्ताहरांनी ती दौऱ्यावरच इंदिराजींना दाखवली— पण त्यांनी "माझ्या हातात अजून काही अधिकृत वृत्त आलेले नाही, तेव्हा मी काही सांगू शकत नाही", असे म्हणून कानावर हात ठेवले. भरीला भर म्हणजे एका सरकारी प्रवक्त्याने अशी मल्लीनाथी केली आहे की, भारताचे अणुशस्त्र-विषयक धोरण एका पाठोपाठ एक असे तीन प्रधानमंत्री स्पष्ट करीत आले आहेत, तेव्हा अधिक ते सांगणे काय? ते काही असो, अणुबाँबच्या खर्चाचा हिशेब लावण्याच्या कल्पनेचा तरी सरकारी मनाला विटाळ झाला 'हेही नसे थोडके!'

# परराष्ट्र धोरणाचे तीन तेरा

खेद व आश्चर्य हेच आपल्या परराष्ट्रीय धोरणाचे स्थायीभाव दिसतात. कारण असेच सखेदाश्चर्य प्रकट करण्याची पाळी दोन बाबतीत भारत सरकारवर आली. त्यातली एक म्हणजे रशियाने हिंदुस्थान व पाकिस्तानला समानतेने वागविण्याच्या आपल्या धोरणात आता आणखी एक पाऊल पुढे टाकल्याचे उघडकीस आले आहे. ताश्कंद कराराच्या वर्षदिनानिमित्त यंदा कोसिजिन साहेबांनी इंदिराजींना जो संदेश पाठविला आहे त्याची भाषा भारत सरकारच्या परिचयाचीच आहे, पण त्यात एका सूचक गोष्टीची भर पडली आहे व ती म्हणजे कराराची अंमलबजावणी करण्यासाठी जे काही केले जात आहे त्याची प्रशंसा करण्यात आली आहे—म्हणजे या बाबतीत भारताने पाकिस्तानपेक्षा काही अधिक केले आहे याची जाणीव दाखविण्याचे टाळण्यात आले आहे. म्हणजे यापुढे भारत व पाकिस्तान या दोघांच्याबद्दल किंवा या दोघांशी बोलताना त्यांना कॅटेकोरपणे समान लेखण्याचे धोरण अखेर रशियाने स्वीकारलेले दिसते. पाकिस्तानने ताश्कंद कराराचे तीन-तेरा वाजविल्याचे भारत सरकारने रशियाच्या निदर्शनाला यापूर्वी पुनः पुनः आणून दिले आहे. असे असतानाही रशियाने हे धोरण स्वीकारलेले पाहून "हेचि फळ काय मम तपाला" असे सखेदाश्चर्य इंदिरा-सरकारला झाल्याचे म्हणतात.

आणि दुसरी आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे बंडखोर नागा लोकांच्या टोळ्या चीनला जाऊन घातपाताचे शिक्षण घेऊन येतात हे जगजाहीर आहे. पण अशा एका टोळीला सुमारे दोन वर्षांपूर्वी उत्तर व्हिएटनामध्येही शिक्षण देण्यात आले, अशी माहिती छापणारे एक उत्तर व्हिएटनामी सरकारी प्रकाशन नुकतेच एका स्वतंत्र-पक्षीय पार्लमेंट-सदस्याच्या हाती आले. त्याने त्यातले परिच्छेद परराष्ट्र-मंत्र्यांना पाठविले. गडबडलेल्या परराष्ट्रमंत्रालयाने हे खरे काय अशी उत्तर व्हिएटनाम सरकारकडे विचारणा केली. बऱ्याच दिवसांनी भारतातल्या व्हिएट-नामी दूतावासाने 'हे प्रकाशन खोटे आहे' असा खुलासा केला. पण सरकारी मनाला या खुलाशाने दिलासा मिळालेला दिसत नाही. कारण या प्रकाशनाची व त्यातल्या मजकुराची सत्यता पडताळून पाहण्याची धडपड आता परराष्ट्रमंत्रालयाने आरंभल्याचे वृत्त आहे. उत्तर व्हिएटनाममधील भारतीय दूतावासाचा दर्जा वाढविण्याचा मैत्रीपूर्ण विचार इंदिरा, दिनेश आणि कंपनीने केला; इतक्यात या प्रकाशनाचा स्फोट झाल्याने सरकारी श्रीमुखात चपराक बसल्यासारखे झाले आहे. खरे म्हणजे चिनी आक्रमणापासून पाक आक्रमणापर्यंत प्रत्येक वेळी उत्तर व्हिएट-नामने भारताच्या विरुद्ध बाजू घेतली आहे. त्यामुळे उघड उघड शत्रुत्व करणाऱ्या या देशाला मित्र समजण्याचा अट्टाहास भारत सरकार का करीत आहे हे 'देवो न जानाति कुतो अनामिकः ?'

—अनामिक

# मुक्काम चंदीगड

सौ. निलान् जोशी

सव्वीस तारखेपासूनच येथील सर्व व्यवहार थंड पडलेत. शाळा–कॉलेज बंद. रस्ते ओस. बाजारपेठांमधील वर्दळ तुरळक. सेक्रेटरीएटमध्ये सर्वत्र शुकशुकाट. येथे असला प्रकार हा तसा अगदी नवीन. क्षुल्लक कारणांमुळे बसेस् जाळणे, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस वगैरे प्रकार पंजाबी मनाला अवगत नाहीत म्हटले तरी चालेल. लढवय्ये लोकांचा पिंड असाच असतो म्हणतात. जितके शूर तितकेच थंड प्रकृतीचे हे पंजाबी लोक. कामात सदैव गढलेले आणि तरीही कमालीच्या छानछोकीची आवड असलेले. ऐषआरामात डोक्यापर्यंत बुडवून घेऊन फिरून अंबाला कँटोन्मेंट–हॉस्पिटल वरील नृशंस पाकिस्तानी बाँब-हल्ल्याच्या आठवणीनेही दग्ध होऊन उठणारा 'हरियाणवी जाट' काय किंवा पोटच्या पोराने वयाची पंचवीशी उलटूनही कुठल्या का गुन्ह्याच्या निमित्ताने एकदाही बेडी घालून घेतली, नसल्यामुळे बिरादरीत खालच्या मानेने वावरणारा माथेफिरू आणि तरीही रंगेल असा भटिंडयाचा शीख काय शेवटी दोन्हीही त्याच पंच नद्यांच्या संगमातले ! पण आज त्यांच्यातही वितुष्ट आलं आहे, खाजगी वैमनस्य नसतानाही !

आपल्याकडील पानवाला जितक्या पोटतिडकीने सीमाप्रश्न किंवा शिवसेनेवर बोलेल तितक्या प्रमाणात इकडील समाजाचा खालचा थर ढवळून निघाला नसला, तरी पंजाब आता झपाट्याने बदलू लागला आहे. खुद्द चंदीगडमध्ये देखील परिस्थिती वेगळी नाही. मात्र काटेकोरपणे बोलायचे झाल्यास पंजाबी भाषिक येथे अल्पसंख्याकात आहेत. मूळचा हा भूभाग अंबाला जिल्ह्याच्या टोकाचा वन्य प्रदेश. इथे मुख्यत्वेकरून महारोग्यांची आणि तत्सम बहिष्कृतांचीच वस्ती पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली. आजही येथील पाण्यात वेगवेगळी, रसायने घालून मगच त्याचा पुरवठा शहरात


केला जातो. नेहमीच्या फिल्टर पद्धतीपेक्षा हा प्रकार सर्वस्वी वेगळा आहे. यात कुठेही गफलत झाल्यास रोगराई पसरू शकते| हे कित्येकांना ठाऊकही नसेल. अशा ह्या उजाड प्रदेशात वदावदा पैसा ओतून ही सोन्याची लंका वसविली गेली. खरा समृद्ध पंजाब, पाकिस्तानात गेला आणि सिमला ही तात्पुरत्या स्वरूपाची राजधानी होती म्हणूनच ह्या नगरीच्या रूपाने पंजाबला एक प्रकारे जुने वैभव आळवण्याची संधी पुन्हा मिळाली, आणि ती देखील ह्या कष्टाळू लोकांनी बऱ्याच अंशांनी सार्थकी लावली. त्याच अर्थाने तो तो त्यांचा मानबिंदू. पण तरीही अठरापगड शहरात जे होते तेच इथेही झाले. त्यातूनच संकुचित प्रांताभिमान तर सोडाच पण खास प्रादेशिक, धार्मिक किंवा सांस्कृतिक प्रसंगामध्येही 'युरोपियन कल्चर' घुसडून बेगडी फॅशनेबल–धेडगुजरीपणा आपल्या देशात जर प्रथम कुणी आणला असेल तर ह्या पंजाबी लोकांनी, आणि म्हणूनच चंदीगडपण त्यातून सुटले नाही. भांगडा हा नृत्यप्रकार इथल्या लोकांच्या अनास्थेचा, क्वचित प्रसंगी टिंगली-चाही, होत चालला आहे हे सांगूनही खरं वाटणार नाही कुणाला. कुणी सांगावं. ह्याच तथाकथित पुढारलेपणाचे भयानक सावट आज दिल्लीच्या सार्वजनिक जीवनावरही जे पसरलेले दिसते त्याच्या मुळाशी हीच वृत्ती असेल.

पण आवश्यक अशा प्रांतीय भावनांबद्दल उदासीन असणाऱ्या ह्या समाजातील राजकारण्यांचा, किंबहुना सगळ्या सुशिक्षितांचा गटच आज चंदीगड अन् भाकराचं निमित्त करून शड्डू ठोकून उभा आहे. ज्यावेळी १९६६ साली भाषिकगटांच्या तत्त्वाधाराने पंजाबची फाळणी झाली तेव्हाच एका अर्थी चंदीगडचाही निर्णय घेतला जाऊ शकला असता. हरियाणा झाला तो हिंदी बोलणाऱ्यांचा म्हणून. चंदीगडलाही तीच भाषा प्रामुख्याने बोलली जात होती आणि आहेही. पण शहा कमिशनच्या सूचनेला डावलून नसते वादंग निमित्त म्हणून पुढे आले अन् केन्द्रशासित चंदीगड जन्मास आले.

ठळक मुद्दे दोन्ही बाजूंकडील मंडळी आज त्वेषानेच मांडीत आहेत. आणि ते फारसे चूकही नाही. सर्वसामान्य नागरिक घेतला तर तो निःसंशय 'जैसे थे' च्या पक्षानेच कौल देईल. पण महत्त्वाचे निर्णय आपल्या देशात नेहमीच जनतेला अंधारात ठेवून घेतले गेले आहेत. सर्वसामान्य नागरिकाचा विचार कोण करतोय कशाला ?

नुकतीच एक मजेदार घटना घडली. येथील सतरा सेक्टरच्या फॅशनेबल मार्केटच्या परिसरात झालेल्या एका उत्खननात काही अतिप्राचीन मानवी सापळे सापडले आहेत; भांडी-कुंडी आणि खेळणी पण-त्यावर हडप्पा मोहन-जोदरोच्या अतिप्राचीन आर्यपूर्व संस्कृतीची छाप आहे. ह्यावरून चंदीगड-

वरील पंजाबचाच भौगोलिक हक्क शाबीत झाला असे बोलणारे रगड लोक अहमहमिकेने पुढे सरसावले आहेत. त्याचबरोबर ते काही नाही, एक ते बावीस सेक्टर्स पंजाबात आणि तेवीस ते तेहतीसपर्यंतचे सेक्टर्स हरियाणात अशीच शहराची फाळणी होऊन अखेर शेवट गोड होणार असेही शपथेवर सांगणारे चिक्कार महाभाग भेटतात. केन्द्र सरकार काहीही निर्णय घेवो, पण हरएक कसोटीप्रमाणे निर्णयही उलट-सुलट करावे लागतात हा सध्याच्या भारतीय समाजकारणातला एक विलक्षण विनोद आहे. त्याबरोबरच आणखी एक गोष्ट पक्की माहीत असलेली बरी. ती ही, की सध्याचे केन्द्रप्रशासन लयास गेल्यावर त्यानंतर मग हे शहर सगळेच्या सगळे अगर अर्ध-मुर्ध कुठेही गेले तरी, ते आखीव टापटीपीचे रस्ते, एकसारख्या एक इमारती, सुशोभित शिक्षण संस्था, बाजार आणि बगिचे हे सर्व इतर कुठल्याही भुक्कड शहराप्रमाणेच दिसू लागतील आणि 'ल कार्बूजे' यांनी कल्पनेच्या अफाट पल्ल्यांनी चितारलेले चंदीगड ते हेच का, असाच प्रश्न कुणाही अगांतुकाच्या मनात उमटेल.




# वल्लभपूरची दंतकथा

रातराणी । रातराणी

विजय तेंडुलकर

भूपति या नावावरून जाऊ नका. हा तरुण भूपति घरंदाज असला तरी आज तो हक्काचे वडिलार्जित भले थोरले जुने घर वगळता खंक आहे. कर्जबाजारी आहे. त्याच्या धनकोंना आणि घेणेकऱ्यांना आता धीर निघेनासा झाला आहे



अमोल पालेकर । रवींद्र बाक्रे । एकनाथ हट्टंगडी । सुषमा पेंगणकर

त्यांचे लकडे लागले आहेत. एकुलता एक नोकर आहे तो डोक्यावर बसल्यासारखा आहे. भूपतीची मूळ वृत्ती खुशालचेंडू. ती असल्या विपरीत परिस्थितीमुळे जाते थोडीच ? चैनीसाठी पैसे हे हवेतच. कर्जे सावकाशीने फेडता येतील, पण पैसे आणायचे कुठून ? एक कल्पना निघते. वाडा विकायचा.

तसा हा वाडा काही नवा किंवा उत्तम स्थितीतला नव्हे. हा कोण घेणार ? आणि

याचे येणार काय ? पण इमानी नोकराचा सुपीक मेंदू कल्पना देतो. आपली खंक आणि गरजू अवस्था दिसू देता कामा नये. आपण मोठ्या ऐषमध्ये या वाड्यात रहातो आहोत असेच दृश्य दिसले पाहिजे. वाडा विकण्याची आपल्याला गरजच नाही असे वाटले पाहिजे. वाडा घेऊ पहाणाऱ्याला भीड पडली पाहिजे. आपल्या आदरातिथ्यानेच गडी भारावला पाहिजे. म्हणजे चार पैसे येतील आले तर.

साबणाचा कारखानदार हलधार सहकुटुंब या वाड्यासाठी येऊन पोचतो तेव्हा तरुण भूपति मॉशॉय पिढीजाद वैभवाच्या प्रदर्शनात फुले हुंगीत, नोकरचाकरांच्या दिमतीत जगताहेत त्यांचा एक कारभारीदेखील आहे. हे आज्ञाधारक नोकरचाकर म्हणजे कर्जवसुलीच्या एकमेव आशेने नोकरचाकर बनलेले भूपतीचे धनको आणि कारभारी झाला आहे त्याचा अचानक येऊन टपकलेला दोस्त; न पेलणाऱ्या मोठ्या नाटकी मिशा वगैरे नाकपुड्यात अडकवून. सदरेवरचे नोकर सदरेवरली ड्यूटी संपली की तसेच आत धावून पोषाख पालटून आचारी खानसामे बनतात. चार की पाच तथाकथित नोकरांत पाचपंचवीस नोकरांचा भास निर्माण केला जातो. हलधार आणि त्याची तरुण कन्या खूष होऊन जातात. भूपतीची आशा वाढते. यात त्याला नवा शोध लागतो. हलधार ऐतिहासिक वास्तूंचा भोक्ता आहे. जितके घर जुने तितके त्याला त्याचे कौतुक जास्त ! भूपती भलताच खूष होऊन घराचे जूनेपण तोंडाने वाढवता येईल तेवढे वाढवण्याच्या मार्गाला आता लागतो. घर विकायचेच नाही म्हणून भाव खाऊ लागतो. तेवढा हलधार किंमत वाढवतो. पावती नको म्हणत चेक भूपतीच्या हाती सारीत रहातो. एरवी सत्प्रवृत्त भूपतीला वाटते, छेछे, हा मात्र भलेपणाचा कडेलोट झाला. या वाड्याची एवढी किंमत ? आपण तर याला चक्क टोपी घालू पहातो आहोत ! पण भूपतीला मागे फिरणे आता शक्य नसते. हलधार त्या वास्तूचा आशिक बनलेला असतो.

इकडे हलधारची कन्या भूपतीच्या त्या नकली मिशा लावणाऱ्या कारभारी मित्रावर फिदा आहे, म्हणजे तिला तो आवडत नाही तर त्याच्या मिशा आवडतात!

मित्राच्या मिशा, भूपतीचे वेषांतरे करीत धावणारे नोकर ऊर्फ धनको, वाड्याचे मूळ पुरुष रघूदा यांचे अतृप्त पिशाच्च, हलधार आणि त्याचे तऱ्हेवाईक कुटुंब, आणि यात गडबडत डोके खाजवून यातून बाहेर निघण्याचा मार्ग हुडकणारा भूपतीचा इमानी नोकर अशा गुंत्यातून अनेक मजेदार घटना तयार होतात. हल-धारचा या ऐतिहासिक वास्तूसंबंधातला प्रतिस्पर्धी चौधरी अचानक येऊन पोचतो. रघूदांचे अतृप्त पिशाच्च ज्या शत्रुघराण्यातल्या वंशजाच्या शोधात आहे तोच हा चौधरी आहे. यासरशी हे पिशाच्च खवळते. चौधरीचा बळी घेऊन आपली प्रतिज्ञा पुरी करण्याचा प्रयत्न करते. चौधरी निघून जातो, पिशाच्चही जाते आणि भूपति वाडा निर्वेधपणे विकण्याला मोकळा होतो.

साधारणतः असे हे 'वल्लभपूरची दंतकथा' चे कथानक. यात मनोविश्लेषण

नाही, समस्या नाही, रहस्य नाही की एकादा धाडसी तांत्रिक अथवा मांत्रिक प्रयोग नाही. इतकेच नव्हे तर मुंबईचे थिएटर युनिट सादर करते त्या या नाटकाच्या मराठी भाषांतरात मराठी विनोदी नाटकांचे मोठे बळ असा शाब्दिक विनोद-देखील नाही. आहेत फक्त मजेदार घटना आणि या घटनात गुंतून एकमेकांच्या अंगावर झपटू बघणारी, एकमेकांशी लपंडाव आणि शिवाशिवी खेळणारी, निष्पाप-पणे घोटाळे माजविणारी प्रौढ पात्रे—आणि अर्थात साक्षात एक पिशाच्च, रघूदांचे, आजच्या मराठी रंगभूमीवर नवे आणि हवेसे वाटावे इतके हे नाटक साधे, सुट-सुटीत, स्वच्छ आणि आनंददायक आहे. याचे लेखक बादल सरकार हे बंगालमधले तरुण नाटककार; त्यांच्या 'एवम् इंद्रजित' सारख्या प्रयोगशील नाटकांनी बंगाली हिंदी—गुजराती अशा भिन्न भाषिक रंगभूमीवर ओळखले जाणारे. हे 'वल्लभपूर' त्यांनी खरे म्हणजे एरवीच्या आशयघन, गंभीर नाटकांच्या व्यापातून थोडा सुटका म्हणून मजेने लिहिले. बंगाली रंगभूमीवर ते अद्याप आलेले नाही. परंतु हिंदी रंगभूमीवर आले आणि थिएटर युनिटने त्याचे मराठी भाषांतर यंदाच्या सरकारी नाट्यस्पर्धेत सादर केले.

## दिग्दर्शनातील वेगळेपण

थिएटर युनिटच्या मराठी प्रयोगात देखील एक वैशिष्टय आहे. घटनाप्रधान विनोदी नाटके आपल्या मराठी रंगभूमीवर रूढ फार्सिकल पद्धतीने बसवली जातात. त्यातल्या व्यक्तिरेखांची व्यंगचित्रे बनवली जातात. आणि एक कृत्रिम जलद गती या प्रकारच्या प्रयोगांना देण्यात येते. सत्यदेव दुबे आणि अमोल पालेकर दिग्दर्शित 'वल्लभपूर'चे स्वरूप याहून नैसर्गिक, संथ, बदलत्या गतीचे आणि व्यक्तिरेखां-मधले विलोभनीय माणूसपण कायम राखून त्यांची धावपळ आणि गुंतागुंत रंग-विणारे आहे. थिएटर युनिटचे 'वल्लभपूर' ही माणसांची विनोदी गोष्ट आहे. मूळ विनोदी नाटकाचे लेखन एका अधिक ताकदीच्या नाटककाराने केलेले असल्याने या विनोदी नाटकातील पात्रांनाही त्यांचे किमान माणूसपण राहून गेले आहे ही प्रयोगकर्त्यांना एक सोयीची गोष्ट आहे. थिएटर युनिटचे 'वल्लभपूर' पोट फुटे-पर्यंत हसविणारे नाही परंतु पोटभर आनंद देऊ शकणारे झाले आहे; कारण चांगल्या नाटकाचे एक महत्त्वाचे वैशिष्टय—त्यातल्या व्यक्तिरेखांविषयी प्रेक्षकांना एक नाते वाटणे—आणि विनोदी नाटकाची निखळ हास्यकारकता यांचा मेळ या प्रयोगात बसला आहे.

भूमिका करणाऱ्या नटनटीत नवी नावे, उदयोन्मुख नावे, नवे चेहरे अधिक आहेत. 'हलधार' झालेले एकनाथ हत्तंगडी कन्नड रंगभूमीवरचे अनुभवी नट; ते मराठी प्रेक्षकांच्या परिचयाचे नाहीत. रंगमंचावर येताच ते मुळी हलधारच वाट-तात; त्यासाठी त्यांना किंवा प्रेक्षकांना वेगळे कष्ट पडतच नाहीत. तेच इतरांचे. अमोल पालेकर, रवींद्र बाकरे, सुषमा पेंगणकर, विनोद दोशी, रमेश सावे, रमेश तेंबुलकर, चंद्रशेखर शेणॉय इत्यादींना मराठी प्रेक्षकांपुरते रंगमंचावरचे स्वतःचे

से बरेवाईट प्रस्थापित व्यक्तिमत्त्व नाही; आणि दिग्दर्शकांनी पात्रयोजना करताना त्यांचे एरवीचे व्यक्तिमत्त्व आणि भूमिका यांचा असा मेळ साधला आहे की आपल्या अननुभवानिशी आणि मर्यादित अभिनयानिशी ही माणसे अत्यंत सहजपणे त्या भूमिकाच भासतात; त्यांच्या सर्व गुणदोषांबरोबरच प्रेक्षक नाटकाशी समरस होऊन जातात.

नेपथ्यात रत्नूदांच्या पिशाच्चाच्या प्रवेशांसाठी ठेवलेली खास जागा सोडली तर ते कोणत्याही जुन्या सामाजिक नाटकाचे आहे. किंबहुना दिग्दर्शक, नेपथ्यकार आणि प्रकाशयोजनाकार यांनी या हलक्या फुलक्या नाटकातला हा विक्षिप्त पारलौकिक भाग वेगळा आणि प्रभाव टाकण्यायोग्य ठरवून त्यावर विशेष भर दिला आहे असे वाटते. या नाटकातला एवढाच भाग प्रयोगातील अभिनयाच्या आणि तांत्रिक अंगातील सहजता टाकून एखाद्या रहस्य–नाट्यासारखा भरपूर उठविण्यात आला आहे. तांत्रिक अंगे पुष्कळच विनचूकपणे सांभाळण्यात आली आहेत म्हणून त्यांचा परिणामही नेमका आणि रेखीव आहे.

थिएटर युनिटचे 'वल्लभपूर' हे असे आहे; एका मर्यादेत सहजपणे, अट्टाहासाविना हसविणारे आणि म्हणून आनंद देणारे. त्याचा फार्सही एखादा कल्पक दिग्दर्शक फार्सिकल अभिनयात दर्दी अशा नटसंचाच्या मदतीने करू शकेल. आणि कदाचित प्रेक्षकांच्या हसून हसून मुरकुंड्या वळतील. व्यावसायिक मराठी आणि मग गुजराती रंगभूमीवर 'वल्लभपूर'चे वेगळे अवतार येतही आहेत. थिएटर युनिटच्या हौशी दिग्दर्शकद्वयाचे कौशल्य मुख्यत: हे की आपला नटसंच आणि मर्यादा वेळीच जाणून त्यांनी या नाटकाला आपल्यापुरता एक आकार दिला आणि तो प्रेक्षकांना आवडला. बंगालीतही रंगमंच न पाहिलेले एक बंगाली नाटक मराठी प्रेक्षकांना दिसले आणि आनंददायी वाटले. ◻ ◻ ◻


# शिलंगणाचं सोनं

आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

आपापले सामान सांभाळीत, इतरांची उगाचच काळजी करत, एखादा भारावलेला शब्द उच्चारत, चांदणे सोबतीला घेऊन आम्ही मुक्कामावर उतरलो. चोवीस डिसेंबर. उद्यापासून खरे शिबीर सुरू होणार. घरून जेवूनच आलो होतो. सामान वगैरे लावून झाल्यावर एकत्र जमलो आणि थोडा, अंगावर पडलेल्या जवाबदारीचा अंदाज घेतला. काम, बौद्धिके यातील मनस्वीपणा तर हवाच, पण ज्या कांतीभाई पटेलांच्या बंगल्यात उतरलो आहोत, तिथे आजूबाजूला भरपूर भाजीपाला आहे, झाडंझुडं आहेत, उपद्व्याप करायचे म्हटले तर साधनं हवी तितकी आहेत, पण आपण त्यांच्या वाटेस जायचे नाही ..आबांनी इशारा दिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ठरविल्यावरहुकूम बरोबर साडेसहा वाजता काम सुरू करण्याच्या इराद्याने आम्ही अंथरुणांवर अंगं टाकली. पण मला तरी निदान त्या दिवशी रात्री झोपच आली नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठायचे असल्याने, आता झोप लागावी असं वाटत असूनही विचार थांबत नव्हते. दिवाळीच्या सुट्टीत

# मागाठणे शिबीर

**वसुधा करमरकर दिडोशी**

अनगावला शिविराला गेले असताना एक रात्र मी अशीच कितीतरी वेळ जागी होते. दुपारी आबांचे पत्र आले होते. त्यांनी भायलाच्या शेतात एक विहीर खणण्याची—आणि आम्ही उत्क्रांती दलाच्या मुलांनी खणण्याची—कल्पना मांडली होती. दुसरे दिवशी रस्त्याच्या कामावर जाताना मनात विचारांची दाटी झाली होती. अनगावात घरोघरी असे भायला मंगल असतील. त्यांच्या सर्व प्रश्नांच्या मुळांपर्यंत जाऊन पोहोचायला हवं. पावसाच्या पाण्यानं कदाचित धुपून सुद्धा जाईल, असा हा रस्ता त्यांच्या जीवनात काय सुधारणा घडवून आणू शकेल ?

...लांबून कुठूनसे दर तासाच्या टोलांचे आवाज ऐकू येत होते. पावणेपाचाला सारी जणं आपण होऊनच जागी झाली. साऱ्यांचं आटोपल्यावर आम्ही बाहेर पडलो. आमच्या रहाण्याच्या जागेपासून भायलाचं शेत नि विहिरीची जागा, पाचएक मिनिटाच्या अंतरावर. थंडीचा सराव झाला नव्हता. रस्त्यातील गुरख्यांनी पेटवलेल्या शेकोटचांकडे पहात, दातांच्या घड्या करून आम्ही चालली होतो.

कामाला सुरुवात झाली, त्यावेळी सव्वासहाच झाले होते. पश्चिमेकडे झरझर जाणारा चंद्र आम्हाला पाहून थबकलासा वाटत होता. टिकाव हातात धरवत नव्हतं नि घमेल्याचा थंड स्पर्श अजून सहन होत नव्हता. पण मनात कुठंतरी बरं वाटत होतं.

सकाळभरात पावणेचार तास काम झालं. कामाला मुलं सगळी छान होती. व्यूहरचना आबांची. भायलाच्या जोडीला करसन, भाणा, चंपक हे मजूर होते. नि आम्हाला जेवू खाऊ घालणारे साठे व त्यांचा पांडूही. नाश्ता आणायला साठे केव्हा जातात, याची मुलं वाट पहायला लागेपर्यंत ते हलत नसत. मावशीची माया इथेही साऱ्यांना पाखर घालत होती.

प्रत्येक गोष्टीची एक नशा असते. तळींची खावडखुबड जमीन टोचेल की काय याची काळजी करत, येताना आम्ही किती जपून जपून पावलं टाकली होती. काम करून जाताना मात्र, अश्वमेधाचा घोडा फिरवून परत निघल्यासारखे, बेगुमानपणे वाट तुडवित होतो.

दुपारी ४ ते ६ कामाची वेळ होती. पण तेव्हाच प्रा. अ. भि. शहा, सौ. शहा व प्रा. मे. पुं. रेगे आले. विहिरीच्या कामाऐवजी त्याच वेळी नियोजन या विषयावर अ. भि. शहांचे भाषण व त्यावर चर्चा झाली. यानंतर पुढे नेहमीच कामाची वेळ २।। ते ४।। अशी ठेवून, संध्याकाळी अभ्यासवर्ग घेण्याचे ठरले. यापुढील सारी बौद्धिके ' प्रबोधन ' या विषयावर झाली. असा विषय नि तो हाताळणारे रेग्यांसारखे कुशल प्राध्यापक ! मग काय ? ही चळवळ कशाच्या विरुद्ध सुरू झाली, याचा मागोवा घेत घेत आम्ही थेट ग्रीक संस्कृतीच्या पायथ्याशी जाऊन पोहोचलो. तिथल्या पर्वतशिखरांवर चढून तिथून आर्यावर्तातल्या हिंदू संस्कृतीकडे नजर टाकली. स्वतःला देवाचे लाडके समजणारे ज्यू, त्यांचा येहोवा, त्यांचा करार – या साऱ्यांशी आमचा परिचय झाला. हरदासाच्या कथेपेक्षाही अधिक रंगलेली ही सुरस आणि चमत्कारिक कथा पूर्ण मात्र झाली नाही ' आतां सूर्य उगवला, राहिलेली गोष्ट उद्यां सांगेन, ' अशासारखं आश्वासन देऊन मे. पुं. नी आमचा तात्पुरता निरोप घेतला आहे.

सातपुड्याच्या छायेत वसलेल्या बोराडी या गावाची, व तिथे व्यंकटराव धोबी यांनी उभारलेल्या कामाची गोष्ट प्रा. गोपाळराव राण्यांनी सांगितली. एके दिवशी रात्री युवक चळवळींविषयी आबा बोलले. ' उत्पादनाभिमुख कृती, प्रबोधनाचे अधिष्ठान आणि संघर्ष ' ही युवक चळवळीची त्रिसूत्री आबांनी कल्पिली आहे. त्या दिवशीचा मुख्य विषय होता संघर्ष. सामाजिक क्षेत्रात काम करत असताना स्वतःला कराव्या लागलेल्या संघर्षाच्या कथा आबा ऐकवत होते. कसोशीचे, निराशेचे क्षण येत होते, दुःखांच्या छाया तरळत होत्या, अखेर विजयाचा आनंद होता – पुराण-इतिहासातील लढायांची वर्णनं श्वास रोधून ऐकत असावं, अशी आमची अवस्था



भायला मंगलच्या शेतात जमलेले श्रमवीर

झाली होती. दुर्दैव एवढंच होतं की ही टक्कर द्यावी लागत होती ती, लोकशाही स्वीकारलेल्या, स्वतःच्याच स्वतंत्र देशातील नोकरशाहीविरुद्ध व देशाच्या हिताकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करणाऱ्या व निर्णय घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांविरुद्ध. या घरच्या शत्रूंना तोंड देण्यात आपली किती ताकद खर्ची पडत असेल, याचा हिशोबच नाही. एका परीने हेही वास्तविक आहे. परतंत्र असेपर्यंत स्वातंत्र्यप्राप्ती हे सर्वोच्च ध्येय होते. पण प्राप्त झाल्यावर ते साधन मात्र ठरते. आता पुढच्या वाटचालीच्या नव्या समस्या आहेत. गळफासापेक्षाही भयंकर अशा लाल फितीचे उच्चाटन करणे, ही त्यातलीच एक. सामाजिक क्षेत्रात उतरल्यावर तिच्याशी संबंध वारंवार येणार. त्यावेळी 'मोडेन पण वाकणार नाही' या बाण्याने वागल्याखेरीज आपल्याला उभे रहाताच येणार नाही, हे संघर्षामागचे सूत्र आवा स्पष्ट करत होते. संघर्ष म्हणजे केवळ निदर्शने आणि मोर्चे नव्हेत, खुमखुमी जिरवण्याचे क्षेत्र नव्हे, हे चंद्रबळ म्हणजे संघर्षाची संजीवनी नव्हेच. कोणत्याही प्रकारच्या अन्यायाबाबत असहिष्णुता, आणि तो दूर करण्याची जिद्द हा संघर्षाचा पाया होय. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संघर्षाचे हे बीज, प्रत्येक व्यक्तीच्या मनात रुजलेले असायला हवे.

अखेर अध्याय संपला. दुसऱ्या दिवशी सकाळी कामावर आलो, त्यावेळी सर्व

घमेली आदल्या दिवशीच मातीने भरून तयार ठेवलेली होती. भराभर रिकामी होत असूनही काही केल्या त्यांची माळ संपेचना. काळ-काम-वेगाच्या एखाद्या गणितातच शोभावा, असा सुरेख मेळ, खणणे-भरणे-वाहणे या तिन्ही कामांचा जमला होता. 'आजच आपण सहा फूट खोल जाणार बहुतेक,' असे त्यावेळी वाटत होते. सहा फूट खोल जाण्याला त्यावेळी एक गंमतीदार महत्त्व प्राप्त झाले होते. शिबिराला येण्यापूर्वी आम्ही सारीच जणं विहिरीची स्वप्नं पहात होतो, पण आबांनी मात्र सहा फुटावर चक्क पाणी लागल्याचं पाहिलं होतं.

तिसऱ्या दिवशी मी खणायला खाली उतरले. कामातला बदल सहजच जाणवत होता. पायाखालची माती ओलसर लागत होती. खणलेल्या भागावर जरा पाय पडताच तो दबला जात होता व वरीचशी मेहनत वाया जात होती. क्षणाक्षणाला घमेली जास्त जड होत होती, आणि भरण्याचे काम अधिकाधिक अवघड. साऱ्या शक्ती-निशी घातलेला एखादा घाव मध्येच दगडावर बसून टिकाव उलटं उडत होतं नि हाताची नाजूक साल चाळवली जात होती. 'विहीरीला पाणी लागतं, म्हणजे नेमकं काय होतं,' अशी एक प्रामाणिक शंका पुन्हा पुन्हा माझ्या मनात डोकवत होती. इतक्यात आबांनी मला बोलावले व एक जांभा दगड माझ्या हातात दिला. धरल्याबरोबर माझी दोन्ही-तिन्ही बोटं ओली झाली, आणि कसल्यातरी अनामिक चाहूलीने आम्ही सारेचजण सावध झालो.



भायलाने जागा हेरली, चार-दोन घाव घातले आणि मग टिकाव टाकूनच हातानेच खणायला सुरुवात केली. तिसरीकडेच नजर लावीत, पाची बोटांनी तो सतर्कपणे माती उकरीत होता. अन शेवटी एक वेळ अशी आली की त्याच्या हाता-मागोमाग, मातीनं माखलेलं पाणीही हळूहळू वर आलं.

पाणी वर आलं, ते तसं येतच राहिलं नि चांगलं ओंजळभर जमा झाल्यावर स्थिरावलं. आनंदाचा जल्लोष उडाला होता. पिंपळपानावर अंगठा चोखत पहुड-लेल्या बालमुकुंदाप्रमाणे, जमिनीच्या कुशीतून वर आलेलं ते मळकट पाणी हसत होतं, कळत-नकळत एक उष्ण थेंब माझ्या डोळ्यांच्या कडांमागून डोकावला नि ओघळला. सारं समजून असणाऱ्या धरती आईनं, तो टिपूनही घेतला.

सहा फूटही वाट पहावी लागली नव्हती आम्हाला. सव्वाचार फुटावरच हे पहिलं पाणी लागलं होतं. एका नव्या जोमानं आम्ही कामाला पुढे सुरुवात केली. हळूहळू सर्वच ठिकाणी पाणी लागू लागलं आणि 'टिकाव मारीन तिथे पाणी काढीन' असे आम्ही वाच्यार्थाने म्हणू लागलो.

पाण्याची पातळी बिनतक्रार वाढत होती व काम अधिकाधिक क्लिष्ट बनत होतं. चिखलाने भरलेली घमेली हातातून निसटत होती. टिकावाचं काम आता फारसं नव्हतं. पहारीने मोठमोठे ढलपे काढावयाचे व ते शक्य तितक्या लवकर भरून वर पाठवायचे, असे काम सुरू झाले. त्याच्याबरोबरच, सगळीकडील पाणी खोल जागेत जमा करून ते काढून टाकणे सुरू झाले. शेवटच्या दिवसापर्यंत हे असंच चाललं होतं. निघण्यापूर्वी एकीकडे जास्त खोल खड्डा केला आहे. भायलाला, पाणी काढणे व बाजूबाजूने खणायला लागणे, अशा दोन्ही दृष्टींनी सोय झाली आहे.

एकतीस तारखेला संध्याकाळी कामावरून शेवटचा हात फिरवला. दुपारी काम संपवितानाच खरं म्हणजे आबरासावर झाली होती. संध्याकाळी सातच्या सुमारास कांतीभाई-मगनभाईंचे आभार कसे मानावेत या संभ्रमात, काहीशा अनिच्छेनेच, आम्ही मागाठणे सोडले.

परत जात असताना कृतार्थतेची झुळूक मनाला सुखवीत होती. शिबिर घेण्यापूर्वी केलेल्या साऱ्या विचारांची उजळणी मन करत होतं. त्यावेळची अनिश्चितता व धाकधूक संपली होती. आत्मविश्वास दुणावला होता. मागाठण्याहून आम्ही भरल्या मनाने निघालो होतो, इतकेच नव्हे, तर आमचे हातही रिते नव्हते. गेले आठ दिवस, आपल्या पाउलखुणा त्यांच्यावर उमटवून गेले होते. आणि याच वाटेने पुढे जायचे आहे, एवढे आम्हाला उमगले होते.

◻ ◻ ◻

# जजमेंट अ‍ॅट न्युरेंबर्ग

**अनन्त भावे**

## आय. आय. टी. चा देखणा प्रयोग

दिनांक ३ जानेवारी १९७० च्या 'माणूस'च्या अंकात 'बेरी द डेड' व 'गॅस लाईट' या दोन इंग्रजी नाट्यप्रयोगांचा परिचय मी करून दिला होता. त्यांची स्मृती ताजी असतानाच, 'जजमेंट अ‍ॅट न्युरेंबर्ग' हा तिसरा इंग्रजी नाट्यप्रयोग पाहण्याची संधी मिळाली. हा नाट्यप्रयोग भारतीय तंत्रविज्ञान शिक्षण-संस्थेच्या (आय्. आय्. टी. च्या) विद्यार्थ्यांनी सादर केला.

इंग्रजी नाटके आवर्जून पाहणाऱ्या रसिकांना ही संस्था सुपरिचित आहे. १९६६ साली, विलिस हॉल या नाटककाराचे गाजलेले 'द लाँग अँड द शॉर्ट अँड द टॉल' हे नाटक या संस्थेने सादर केले. त्यानंतर १९६८ साली रोल्फ होकूथ या जर्मन नाटक-काराचे 'द डेप्युटी' व १९६९ साली टॉम स्टोपार्ड या नाटककाराचे 'रोझेन क्रांझ अँड गिल्डेनस्टर्न आर डेड' ही नाटके सादर करून, या वर्षी अ‍ॅबी मान या नाटक-काराचे 'जजमेंट अ‍ॅट न्युरेंबर्ग' हे नाटक सादर केले आहे.

१९४५ साली हिटलरचे साम्राज्य कोसळले. अनन्वित अत्याचारांच्या पायावर हे साम्राज्य उभे राहिले होते. विजयानंतर, माणुसकीला कलंक लावलेल्या या अत्याचारांचे धनी शोधून काढण्याचा प्रयत्न तत्परतेने करण्यात आला. त्यानुसार या जर्मन युद्ध-गुन्हेगारांवर रीतसर खटले भरण्यात आले. खटल्यात उघड झालेल्या तपशीलामुळे हिटलरच्या पाशवी राज्ययंत्रणेचे अंतरंग जगाच्या दृष्टोत्पत्तीस आले आणि या खटल्यांना जगभर प्रसिद्धी लाभली. न्युरेंबर्ग या जर्मन शहराचे नाव या खटल्याशी कायमचे निगडित झाले आहे. न्युरेंबर्ग येथील पहिला खटला जर्मन सेना-पतींवर भरण्यात आला होता. दुसरा भरला होता जर्मन न्यायाधीशांवर. या न्यायाधीशांवर जाणूनबुजून वा नाइलाजाने हिटलरची साथ केल्याचा, त्याच्या अमानुष अत्याचारांना न्यायाची औपचारिक चौकट उपलब्ध करून देण्याचा, न्याययंत्रणा त्याच्या अन्यायी राज्यसत्तेची बटीक करण्याचा, आरोप ठेवण्यात आला होता. म्हणजे एकेकाळच्या न्यायदात्यांनाच न्याय देणारा हा खटला होता.

प्रस्तुत नाटक न्युरेंबर्ग येथील या दुसऱ्या खटल्यावर आधारलेले आहे. अनेक छोटचा दृश्यातून हे नाटक उलगडत जाते. दिग्दर्शकाने सोयीसाठी या दृश्यांची जी फेरमांडणी केली होती ती वेधक होती. नाटकाच्या पहिल्या अंकात या न्यायाधीशांवर आरोप ठेवण्यात येतो. दुसऱ्या अंकात, न्यायाधीशांवरील या आरोपाचे निराकरण करण्याचा प्रयत्न जर्मन वकीलाकडून मोठ्या कसोशीने व आवेशाने केला जातो. तिसऱ्या अंकात न्यायाधीशांना न्याय देण्यात येतो. या खटल्याच्या निमित्ताने एकत्र आलेली माणसे, त्यांची व्यक्तिमत्त्वे, त्यांच्या निष्ठा, त्यांचे स्वाभाविक गुणदोष यांचे प्रभावी दर्शन या नाटकात होते. सारे नाटक हा एक दीर्घ खटला असल्यामुळे आंगिक अभिनयापेक्षा वाचिक अभिनयालाच या नाटकात सर्वाधिक महत्त्व आहे, ही गोष्ट दिग्दर्शक श्री. बेहरूझ सेठना यांनी अचूक ओळखली होती.

तशी ती ओळखली नसती तर नाट्यप्रयोगाची धडगत नव्हती. कारण नाटकात भूमिका करणारे विद्यार्थी साहजिकच वर्णाने किरकोळ व कोवळे होते; नाटकातील पात्रांच्या दृश्य प्रतिमा उभ्या करण्यास असमर्थ होते. भूमिकेचे वजन आणि डौल सांभाळून ही उणीव दूर करण्याचा मोठा लक्षणीय प्रयत्न त्यांनी केला. त्याचबरोबर शब्दोच्चार हे आपले हुकुमी साधन त्यांनी प्रभावीपणे वापरले. न्यायाधीश हेवुडची भूमिका करणारे होमी भेद्वार, कॅप्टन बायर्स व कॅप्टन लॉसन या अनुक्रमे जर्मन व अमेरिकन वकीलांची भूमिका करणारे उदय वागळे आणि अतुल वाड, अर्न्स्ट यानिंगचे काम करणारे मार्क डिमेलो यांची शब्दोच्चारणपद्धती मोठी नेटकी व आवदार होती.

त्यामुळेच परिणामासाठी आक्रस्ताळी, भडक अभिनयाची गरजच दिग्दर्शक-नटांना भासली नसावी. अर्थात असा अभिनय प्रस्तुत नाटकाच्या प्रकृतीशी सर्वस्वी विसंगत ठरला असता. परंतु नाटकाची प्रकृती या मंडळीने नेमकी जाणली होती. त्याचे प्रत्यंतर नेपथ्यात आणि एकूण वातावरणनिर्मितीत सहज येत होते.

परिणामी एक प्रेक्षणीय नाट्यप्रयोग उभा राहिला. मराठी रंगभूमीवर अशा प्रकारची नाटके पाहायला मिळत नाहीत. ती गरज मुंबईतील इंग्रजी नाट्यप्रयोग सादर करणाऱ्या मोजक्या हौशी, निष्ठावंत, कष्टाळू मंडळ्यांकडून भागवली जाते, याबद्दल मराठी भाषिक रसिक त्यांचे ऋणी आहेत. भारतीय तंत्रविज्ञान शिक्षणसंस्थेचे विद्यार्थी या क्षेत्रात तसे नवीन आहेत. परंतु नाटकाच्या वेडाने झपाटलेले आहेत. त्यांची जिद्द, हौस आणि अभ्यासू वृत्ती पाहिली की त्यांच्याविषयीच्या अपेक्षा उंचावतात. शिवाय शिक्षणक्षेत्राचा व्यापक विचार करता अशा प्रयत्नांची एक वेगळीच अर्थपूर्णता मनात ठसते. महाराष्ट्रातील असंख्य महाविद्यालयांना आणि विद्यापीठांना अशा वेडाची दखल घेण्याचा शहाणपणा केव्हा तरी सुचेल अशी मला आशा आहे.

□ □ □

७ फेब्रुवारी १९७०

Existance of communist is a historic reality in India अस्खलीत इंग्रजीत माजी कॉम्रेड सुभान वैद्य बोलू लागले. वैद्य हे पिपरीचे राहणारे; परंतु खास इंडोकेटच्या अधिवेशनाकरता मुंबईला आले होते. लवकरच ते इंडिकेट कॉंग्रेसमध्ये सामील होणार आहेत. १९४५ च्या ए. आय. सी. सी. नंतर ते प्रथमच ए. आय. सी. सी. ला हजर रहात होते. बेचाळीसच्या स्वातंत्र्य-सैनिकांपैकी ते एक आहेत. ४९ ते ६३ या काळात ते कम्युनिस्ट पक्षाचे एक क्रियाशील कार्यकर्ते होते. तेव्हा त्यांच्या विधानांना विशिष्ट भरीवपणा आहे." कॉंग्रेसचा दहा कलमी कार्यक्रम हा सद्य:स्थितीत कोणत्याही कम्यु-निस्ट पक्षाशी मिळता जुळता आहे. आणि लोकशाही मार्गाने समाजवाद आणायचा असेल तर या कार्य-क्रमाचा पाठपुरावा करून इंडीकेटला पाठिंबा दिलाच पाहिजे "–कॉ. सुभान वैद्य.

"परंतु कॉंग्रेसच्या वर्गीय स्वरूपाबद्दल तुम्हास काय वाटते ?"–मी.

"सद्य:स्थितीत कोणत्याही समाजवादी पक्षाचे वर्गीय स्वरूप थोडे समिश्र राहणारच. पण लोकशाही मार्गाने समाजवाद आणायचा असेल तर या वस्तुस्थितीचा स्वीकार केलाच पाहिजे."–कॉ. वैद्य.

# मुंबई अधिवेशन...

**अनिल बर्वे यांनी घेतलेल्या मुलाखतींचा पहिला भाग मागील अंकी दिला होता. हा उरलेला भाग.**

"का? क्रांतीवरचा विश्वास उडाला काय ?" –तिखट प्रश्न

"स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानात शोषित वर्गाच्या सत्ते-साठी क्रांतीचा अयशस्वी प्रयत्न करण्यात आला. परंतु



# यांना असे वाटते!

" का ? क्रांतीवरचा विश्वास उडाला काय ?"—तिखट प्रश्न.

" एका पराजयात आत्मविश्वास डळमळला ? "—खवचट प्रश्न.

" आज देशात ' भांडवली लोकशाही ' आहे हे सत्य मान्य करूनही दोन राज्यात या ' भांडवली लोकशाही ' मार्गाने कम्युनिस्ट मंत्रिमंडळे सत्तारूढ झाली आहेत ह्या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करता येणार नाही ? "—कॉ. सुभान वैद्य.

" परंतु या भांडवली लोकशाहीचा मार्ग क्रांतिकारकांनी का स्वीकारावा ?"—मी.

" सशस्त्र क्रांती ही निदान सद्यःस्थितीत तरी अशक्य आहे; आणि १९४५ च्या

अमृतसर कॉन्फरन्समध्ये कम्युनिस्टांनी लोकशाही मार्ग स्वीकारला आहे. त्याप्रमाणे कम्युनिस्ट केरळ-बंगालमध्ये निवडून आले. केरळचे राज्य उलथवले तरी शस्त्र हातात घेण्यात आले नाही आणि लोकशाहीवरचा विश्वास पुन्हा एकदा व्यक्त करण्यात आला. "—वैद्य.

" पण तुमचा हात झिडकारावा असाही एक मतप्रवाह आहे "—मी.

" कम्युनिस्टांचे लोकशाहीकरण झालेले आहे. अशा परिस्थितीत त्यांना पुन्हा डावलणे म्हणजे क्रांतिमार्गाचा त्यांना पुन्हा विचार करायला लावणे आहे. "—वैद्य.

" म्हणजे एकंदरीत इंडीकेटला पाठिंबा द्यावा असे वाटते तर ? "—मी.

" होय. न दिला तर ती ४२ च्या चुकीची पुनरावृत्ती ठरेल. "—वैद्य.

वैद्य सिंपोसियमला सुंदराबाई हॉलकडे रवाना झाले.

वैद्य बरेच बोलले. त्यातला फार मोठा भाग स्वतःची समजूत घालण्याकरता बोलले. क्रांतीमार्गावर टीका केली. परंतु कुठे तरी कोपऱ्यात नक्सलाईटांबद्दल सहानुभूती होती. बंधुभाव होता. बोलताना डांगे-रणदिवे नेतृत्वावर त्यांनी कडाडून टीका केली. पक्षनेत्यांच्या चुकीच्या धोरणांनी शेकडो निष्ठावान कॉम्रेड फ्रस्ट्रेट होऊन पक्षाबाहेर पडले. जे ज्वलंत होते त्यांनी शस्त्र हातात घेतले. जे परिस्थितीच्या दडपणाने भेकड झाले होते ते मनाची समजूत घालून घेत दूर पळाले.

नवे नेतृत्व ही भारतातल्या सर्वच राजकीय पक्षांची गरज आहे.

◻

महाराष्ट्र काँग्रेस ही बागाईतदार व बड्या शेतकऱ्यांची बटीक आहे असे डावे पक्ष आरोप करतात, म्हणून मी कौलार बुद्रुकचे बागाईतदार चौधरी यांना जाऊन भेटलो.

" सिंडिकेट–इंडिकेट दोन्ही गट बरखास्त करून, दहा वर्षाकरता मिलिट्रीच्या साहाय्याने राष्ट्रपती अंमल सुरू करावा. सर्व लहानसहान पक्षांचे गाठोडे बांधून फक्त दोनच मोठे पक्ष ठेवावेत.

" अरे बापरे ! "—मी.

ही अधिवेशने म्हणजे लाखो रुपये खर्च करून खाणे, पिणे, चैन आणि पब्लिसिटीचा स्टंट करण्याकरता भरवण्यात येतात. हे सर्व राजकारणी नेते सत्तेकरता तडफडत आहेत. जनतेची कोणालाही फिकीर नाही. चांगला नेता मिळाला तर लोक बंड करून उठतील. ठाण्यात नक्सलाईट आले तर मी त्यांचे स्वागत करीन. त्यांना पूर्ण पाठिंबा देईन." श्री. चौधरी.—

चौधरींच्या बोलण्याने आताशी कुठे ग्रीप घेतली होती.

सर्व धर्मीयांना एकच कायदा पाहिजे. सध्याचे कायदे जनतेच्या हिताकरता नव्हे, तर छळाकरता करण्यात आलेले आहेत. कुळकायदा केला पण तो जनतेपर्यंत पोचणार नाही एवढ्या त्यात तांत्रिक अडचणी निर्माण करण्यात आल्या."

" समाजात बौद्धिक मक्तेदारी निर्माण करण्यात येत असून कायदा केला तरी प्रत्यक्षात जातीभेद चालूच आहेत. सवर्ग हिंदू हरिजनांना सामावून घेत नाहीत. हरिजनातदेखील पुरेशी जागृती नाही. म्हणूनच मी म्हणतो क्रांती पाहिजे."

मुलाखत संपली.

क्रांतिकारित्व हा हिंदुस्थानातल्या जनतेचा सुप्तावस्थेतला गुण आहे ! आणि म्हणूनच लाचार-भेकड अशी ही जनता आझादांपासून अजितापर्यंत सर्व क्रांतिकारकांना सहानुभूती दाखवून कृतज्ञता व्यक्त करते.

□

२९ डिसेंबर रोजी सध्याकाळी मालाड हॉकर्स युनियनने पोलिसी दडपशाही विरुद्धचा निषेधमोर्चा काढला होता. त्यात मी सामील झालो. फेरीवाल्यांच्या प्रतिक्रिया समजून घ्यायचा प्रयत्न केला.

अंधेरीच्या झोपडपट्टीतली गटारे ओलांडीत, खड्डे चुकवत, दादांची आणि वासूंची नजर सहन करीत झोपडपट्टीवासीयांची मते अजमावण्याचा प्रयत्न केला.

रामचंद्र पाडावे या बेकार मिठाई कामगाराची भेट घेतली; परंतु " शिवसेनेने संप फोडला. मालकांची बाजू घेतली. मालकाने गुंड पाठवून मारहाण केली." एवढेच तो सांगू शकला.

पोट जाळण्याकरता युनियन बांधण्याच्या वाढत्या प्रवृत्तीने मार्क्स-लेनीन-माओच्या ' प्रोलिटारियन ' वर्गात अजून राजकीय जागृती झालेली नाही. सर्वत्र वैफल्य आणि नैराश्य आढळले. नैराश्य-हिंसेला जन्म देणारे नैराश्य.

□

" सदर अधिवेशनाने इंडिकेटला स्थैर्य लाभेल, इंडिकेटची शक्ती दिसून येईल आणि सिंडिकेटला शह बसेल."

हे विचार दादरच्या प्रधान वकीलांचे आहेत.

" सिंडिकेट नेत्यांनी बोगस सभासद तयार करून संघटनेवर स्वतःचा ताबा ठेवला. पक्ष-सरकार भांडवलदारांच्या हिताकरता वापरले. सिंडिकेट ही जनतेची शत्रू आहे."

सिंडिकेटचे पोस्टमार्टेम बराच वेळ चालले होते.

" नेहरूनंतर नेतृत्वाची एक पोकळी निर्माण झालेली आहे. इंडिकेटचे तरुण नेते सामुदिक नेतृत्व निर्माण करीत आहेत."

" पण छुप्या कम्युनिस्टांचा धोका निर्माण होत नाही का ?" -मी.

" इंदिरा गांधी कम्युनिस्टांचे वारसे जेवून बसल्या आहेत. आणि समाजवादाच्या अंमलबजावणीनंतर कम्युनिस्टांना देशात फारसा थाराही मिळायचा नाही."-प्रधान.

" अहो, समाजवादाची घोषणा सिंडिकेटसुद्धा करते."-मी.

" ती नंतर सुचलेली उपरती आहे. समाजवादच देशाला तारू शकेल। पण

त्याकरता सावधगिरीने पावले टाकली पाहिजेत. बँकांचे राष्ट्रीयीकरण स्वागतार्ह असले तरी त्यात अत्यंत घाई झालेली आहे. तसेच कुळकायद्यासारखे अर्धवट कायदे करून चालणार नाही."

बुद्धिजीवी मध्यमवर्गीयात समाजवादाबद्दलचे आकर्षण वाढत आहे. पुरोगामी दृष्टिकोन प्राप्त होत आहे. स्वागतार्ह गोष्ट !

¤

सुरेश सदाशिव साळवी. स्टेट बँकेत मेसेंजरचे काम करतो. साधारणपणे कनिष्ठ सरकारी नोकरांच्या मुलाखती घ्यावयास फार त्रास पडायचा. एकतर ते मोकळेपणाने बोलायचे नाहीत. आणि स्वतःचे विचार त्यांना व्यवस्थित मांडताही यायचे नाहीत.

" हे लोक नुसत्या घोषणा करतात–प्रत्यक्षात काहीही आणीत नाहीत." नेहमीचीच तक्रार त्याने केली.

" राष्ट्रवाद्यांनी एकत्र येण्यानेच ही कोंडी फुटेल." त्यांचे मत.

भारतीय जनतेला चढलेली राष्ट्रवादाची नशा ! अध्यात्माच्या नशेपेक्षाही भयंकर आणि प्रतिगामी आहे !

¤

अधिवेशनाच्या निमित्ताने कांग्रेसमधील काही स्थानिक कार्यकर्त्यांना भेटलो. या कार्यकर्त्यांत एक पंचायत समितीचे सभासद होते. एक गावातले सरपंच होते आणि इतरही बरेच साळोस सालापासूनचे जुने कार्यकर्ते होते. हे सर्व कार्यकर्ते सध्याच्या तीव्र संघर्षाने भांबावलेले अन् गोंधळलेले दिसत होते. त्यांची तक्रार मांडण्याआधी त्यांच्या स्वरूपाची माहिती देतो. हे सर्व कार्यकर्ते खाऊन पिऊन सुखी, बरेचसे सुखवस्तू आणि गावातील प्रतिष्ठित मंडळीत मोडणारे होते. समाजसेवेची हौस म्हणा किंवा गरज म्हणा म्हणून हे लोक राजकारणात पडले. तत्त्वज्ञानाचा गंध नसलेले. हौशी राजकारण्यांची आज मात्र विचित्र अवस्था होऊन बसलेली आहे.

" तुम्ही अधिवेशनाला गेला नाहीत वाटते."–माझा प्रश्न.

" उगाच मांडवात जाऊन गर्दी करायची नाही. आम्हाला आमची शेतीची आणि गावकीची कामे आहेत." उत्तर त्यांचे.

काही काळ सर्द. मग खडा सवाल–तुम्ही कोणत्या गटाचे ?

" कोणत्याही नाही. कांग्रेस दुभंगलेलीच नाही असे समजून आम्ही काम करतो." –एक पुढारी.

सध्याची भांडणे ही सर्व दिल्लीतील भांडणे आहेत. त्याचा आमच्यावर काहीही परिणाम होणार नाही."–दुसरे नेते.

सध्याचे पक्षनेते समाजवादाच्या घोषणा करतात; परंतु प्रत्यक्षात मात्र केवळ सत्तेकरिता भांडतात."–तिसरे समाजसेवक.

" दुसरा पर्यायी पक्ष नसल्याने आम्ही या पक्षात आहोत."–चौथे अगतिक हौशी !

"समाजवाद पाहिजे पण उत्पादन वाढही पाहिजे. सध्याच्या समाजवादात उत्पादनवाढीचा विचार झालेला नाही."

त्यांच्यातले एक इंटलेक्चुअल वदते झाले. "एकंदरीत पक्षाला एकमुखी नेतृत्व पाहिजे. ते नसल्याने वरिष्ठ नेते भांडतात; परंतु त्यात आमच्यासारखे सामान्य कार्यकर्ते मात्र भरडून निघतात." हेच सर्वांचे रडगाणे होते.

पक्ष-सभासदत्व चार आण्याइतके स्वस्त केल्यावर स्थानिक पातळीवर हा असा खेळखंडोबा होतो. इकडे इतर पक्षांचे धुरीण लक्ष ठेवतील तर बरे होईल.

भारतीय राजकीय पक्षांचे पोलरायझेशन चालू असून या प्रक्रियेत जागृत कार्यकर्ते सोडले तर इतर 'हौशी' फ्रस्ट्रेट होऊन पक्षाबाहेर फेकले जातील तेव्हा सर्वच पक्षांनी आपले पक्ष–तत्त्वज्ञान व धोरण सामान्य सभासदांपर्यंत पोचवायचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांची वैचारिक बैठक भक्कम करण्यावर भर दिला पाहिजे.

झोपडपट्टीपासून मध्यमवर्गीय आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या मुलाखती घेतल्या. पण खऱ्या अर्थाने बुद्धिवादी समजल्या जाणाऱ्या वर्गाच्या मुलाखती अजून मिळाल्या नव्हत्या. म्हणून सबळ 'टाटा इन्स्टीटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च'मध्ये गेलो. मंगेश रेगे नावाचा एक मित्र तेथे गणिताचे संशोधन करीत आहे. तो अलजिब्रा 'वाचतो.' त्यामुळे त्याच्याबद्दल मला बराच आदर आहे. तरी पण तो मार्क्स, लेनीन गोतावळयातला असल्याने त्याची प्रतिक्रिया मी जाणून होतो. तेव्हा त्याच्या भरीस न पडता आर. एस. गुप्ता या मॉलीक्यु बॉयॉलॉजीच्या तरुण संशोधकांना 'गाठले.' बराच वेळ शून्यात नजर लावून मग एकदम त्यांनी बोलावयास सुरुवात केली.

"इंडीकेटच्या रूपाने पुरोगामी ताकद उभी राहायचा प्रयत्न करीत आहे. कांग्रेसचे पुनरुत्थान करण्याचा हा प्रयत्न असल्याने तो स्वागतार्ह आहे."

"पण यातून छुप्या कम्युनिस्टांचा धोका वाढत नाही का?"–मी.

"नाही. काही झाले तरी कम्युनिस्ट फोर्स हा प्रोग्रेसिव्ह फोर्स आहे. कम्युनिझम हा सोशॅलिझमचाच दुसरा फॉर्म आहे."–आर. एस. गुप्ता.

"बरं, ही क्विट पॉव्हर्टीची घोषणा आणि दहा कलमी ठराव."

"यू सी. दहा कलमी कार्यक्रमाला काळाचे बंधन नाही आणि तो बराच अनिश्चित व अपेक्षाभंग करणारा आहे. कुठलाही भरीव कार्यक्रम नसल्याने. क्विट पॉव्हर्टी ही सुद्धा केवळ एक घोषणाच राहणार आहे."–गुप्ता.

"बरं, इंडीकेटला हा पाठिंबा एवढा मोठा का?"–मी.

"सिंडीकेट ही उघड उघड भांडवलदारांचे बाहुले आहे. आणि घटनाच अशा क्रमवार घडत गेल्या की जनतेचा पाठिंबा आपोआप इंडिकेटमागे गेला."–गुप्ता.

"बरं. राखीव जागांच्या मुदतवाढीमध्ये कितपत तथ्य आहे?"–मी.

"जोपर्यंत योग्य दिशेने प्रगतीच्या वाटा मोकळया होत नाहीत तोपर्यंत मुदतवाढीचा उपयोग नाही."–गुप्ता.

"सध्या ज्या हिंसक दंगली घडत आहेत..." —मी.

" अशिक्षित समाजात जातीय दंगली अपरिहार्यच असतात."

" जातीय दंगलीबद्दल नव्हे, नक्षलबारीबद्दल विचारतोय."—मी.

" सरकारच्या आजपर्यंतच्या भांडवलदारी धोरणामुळे जो सामाजिक अशांती निर्माण झाली आहे तीच विद्रोहाच्या स्वरूपात नक्षलबारीमध्ये पेटली आहे. आणि ती अपरिहार्य होती. या देशात कम्युनिझम येणार हे सत्य आहे, फक्त तो रशिया किंवा चीनच्या पद्धतीने न येता जरा वेगळ्या मार्गाने येईल एवढेच."—गुप्ता.

" मध्यावधी निवडणुकींची कितपत शक्यता वाटते?"—मी.

" तशी शक्यता फार कमी, तरी पण इंडिकेटने जर पुरोगामी पावले उचलली तर आगामी निवडणुकीत ती बहुमताने निवडून येईल आणि 'काहीकाळ' कम्युनिस्ट पक्ष दबेल."

मी दोन शास्त्रज्ञांच्या मुलाखती घेतल्या. दोघांनाही मार्क्सवादाबद्दल आकर्षण दिसले. त्यांची विचार करण्याची पद्धत शास्त्रीय व जतनाभिमुख दिसली. माझी दुसरी मुलाखत शंकरलाल चक्रवर्ती यांची होती.

◻

" सिंडीकेट व इंडिकेट या दोन गटांचे झालेले विभाजन हे काँगेसांतर्गत उद्रेकाचा परिणाम आहे. काँग्रेसचा ६७ साली झालेला पराभव, दिवसेंदिवस कमी होत असलेला पाठिंबा यामुळे काँग्रेस पक्षरचनेवरून भांडणांना सुरुवात झाली. त्यामध्ये व्यक्तिगत संघर्षच जास्त आहे. तत्त्वांची भांडणे नव्हेत."—चक्रवर्ती.

" केंद्रामध्ये इंदिरा सरकार किती काळ टिकेल?"—मी.

" पक्षांतराच्या बाबतीत काँग्रेस पुढारी मुरलेले असल्याने कोणतेही तर्कशास्त्र त्यांच्यापुढे थिटेच पडेल, तरीपण उजव्यांची मेजॉरिटी होणार नाही व डावे इंदिरा सरकार कोलमडू नये म्हणून दक्षता घेतील."—चक्रवर्ती.

" बरं, हे संघर्ष का उद्भवले असे आपणास वाटते?"—मी.

" स्वातंत्र्यानंतर वैचारिक पोकळी देशात निर्माण झाली. देशाचे पुढारीपण अत्यंत दुबळे आणि तोकडे पडले. सरकार हे धनिक आणि सुशिक्षितांच्या हातचे बाहुले बनले. त्यामुळे विकासाचा समतोलपणा बिघडला. अत्यंत वाईट अशी विषमता निर्माण होऊन आर्थिक प्रश्न निर्माण झाले. हा केवळ आर्थिक म्हणजे निव्वळ भांडवल गुंतवणुकीचा प्रश्न नसून नेतृत्वाचासुद्धा आहे." चक्रवर्ती—

" या ज्या सशस्त्र उठावांना सुरुवात झाली आहे..."—मी.

" देशद्रोही वगैरे म्हणून त्या उठावांना हीन लेखू नये त्या लोकांचे स्वतःचे प्रॉब्लेम आहेत. ते ध्यानात घेतले पाहिजेत. सरकार प्रथम ह्यांना परकीय शत्रूंचे उठाव समजे, आता ते भूमिहीनांचे लढे आहेत हे मान्य करते. शेवटी परिस्थितीच्या दडपणाने का होईना, पण सरकारला डावीकडे झुकावेच लागेल."—चक्रवर्ती.

हॉस्टेल बाहेर गलबलाट वाढत होता. कारण नवीन वर्ष सुरू होणार होते. हॉस्टलमधले बरेच शास्त्रज्ञ गेटवे ऑफ इंडीयावरची रोषणाई पाहण्यासाठी बाहेर पडलेले होते.

□

मुलाखती बऱ्याच घेतल्या, पैकी काही वर दिल्या. परंतु जनतेमध्ये सर्वच स्थरांवर जे नैराश्य व राजकीय अज्ञान दिसून येते ते निकोप लोकशाहीच्या दृष्टीने भयावह आहे. सुशिक्षित वर्गदेखील घोषणा व खोट्या प्रचाराला गळी पडलेला दिसून येतो.

सर्वसाधारणपणे सर्वच राजकीय पक्षात संधिसाधूपणाचा प्रादुर्भाव झालेला दिसून येतो आणि त्याला कारण सध्या अस्तित्वात असलेली 'भोंदू संसदीय लोकशाही' होय. पाश्चिमात्त्यांच्या अधानुकरणाने निर्माण केलेल्या या लोकशाहीत मुळातच कोठे पाणी मुरत नाही ना, याकडे लक्ष दिले पाहिजे.


आपल्या देशात अस्तित्वात असलेले प्रश्न सुद्धा फार गुंतागुंतीचे आहेत. तेव्हा केवळ पोथीवादी सूत्रांच्या साहाय्याने त्याचे विश्लेषण करता येणार नाही. उदा. सिंडीकेट व इंडिकेट हे दोन्ही 'पॉवर ब्लॉक्स' आहेत हे सत्य गृहीत धरूनही इंडिकेटच्या 'फसव्या तडजोडवादी' भूमिकेकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

समाजवादाच्या नावाखाली इंदिरा सरकार 'स्टेट कॅपिटॅलीझम' निर्माण करीत आहे. स्टेट कॅपिटॅलझिम ही इथल्या भांडवलदारांची आवश्यकता आहे आणि त्याकरताच एल्. आय. सी. चे राष्ट्रीयीकरण करून तिचा सर्व पैसा शेअर बाजारात ओतला जातो. बँक राष्ट्रीयीकरणानंतर सुद्धा उद्योगपतींना दिलेल्या सवलती कायम राहतात.

माझ्या मते इंडिकेट गट हा 'फसव्या तडजोडवाद्यांचा' गट आहे. जेव्हा कधी मानवी समाजात दोन परस्परविरोधी तत्त्वात, विचारात संघर्ष घडतात तेव्हा समाजातील 'व्हॉसिलेटिंग एलीमेंटस्' मोठ्या प्रमाणावर आणि अचानक 'फसव्या तडजोडवाद्यांच्या' रूपाने उभे टाकतात परंतु ते समाजाला कधीच स्थिरभूत मूल्ये देऊ शकत नाहीत. त्यांचे इतिहासातले स्थान केवळ बफर म्हणून असते. आणि बफर स्वतः कधीच गतिमान नसते. जिकडे वेग जास्त तिकडे ते ओढले जाते. भारतात डाव्या शक्तींचा प्रभाव जास्त असल्याने इंडिकेट समाजवादाचे रणशिंग फुंकत आहे इतकेच.

देशात उजव्या आणि डाव्या शक्तींचे केंद्रीकरण चालू असून नजिकच्या भविष्यात दोहोतले संघर्ष संसदेमधून रस्त्यावर येणार आहेत. दरम्यानच्या काळात इंदिरा सरकार ही इतिहासाने दिलेली तात्पुरती व्यवस्था आहे हे विसरून चालणार नाही.

□ □ □



## मौजे गांधीनगर

श्री. ज. जोशी

दोन तीन महिन्यापूर्वी बाहेरच्या खोलीत झोपलो असताना एका पहाटे मला एकदम जाग आली. बाहेरच्या बाजूला डाव्या अंगाला प्राजक्ताचे झाड आहे. त्याचा सडा अंगणात पडला होता. मंद वास खोलीभर पसरला होता. वास ओळखीचा होता. मन फुलवणारा होता—पण जाग त्याने आली नव्हती.

अंथरुणावर मी उठून बसलो आणि खिडकीच्या गजातून बाहेर पहायला लागलो. रस्ता अगदी शांत होता. दंव पडलं होतं. धुकं तर इतकं होतं की समोरची संभाजी बाग देखील दिसत नव्हती. धुक्याचे पांढरे लोट खिडकीतून मोठे मजेदार दिसत होते.

आणि मग एकदम मी जागा कसा झालो याचं कारण कळलं. डेक्कन जिमखान्याकडून एक मोटार शांतपणाने माझ्या घरावरून चालली होती. तिचा आवाज देखील होत नव्हता. मोटारीत कुणीतरी दोन तीन तरुण स्त्रिया असाव्यात. भजनाच्या सुरात लाऊड स्पीकरवर त्या गात होत्या...

" रघुपति राघव राजाराम ।
पतीत पावन सीताराम । "

मोटार घरावरून पुढे चाललीच होती. तो आवाज फारच देखणा होता. मी ऐकतच होतो.

" ईश्वर अल्ला तेरे नाम ।
सबको सन्मति दे भगवान् । "

# साबरमती

लेखांक पाच

मोटार निघून गेली. मी खिडकीत तसाच बसलो. प्राजक्ताच्या वासावर...पांढऱ्या शुभ्र धुक्यावर...छे ! ...त्या सुरांवर !

झोप अगदी उडून गेली. स्वप्नामध्ये नवोढेला माहेरचं घर दिसावं तसं मला झालं..." ईश्वर अल्ला तेरे नाम ।...सबको सन्मति दे भगवान "

मनातल्या मनात मी ती ओळ त्या गोड गळयाच्या ठेक्यात म्हणण्याचा प्रयत्न केला. पण जमलंच नाही. ती गोडी आलीच नाही.

मी वायकोला उठवले आणि तिला ती ओळ म्हणण्यास सांगितले. तिलाही जमले नाही. ती माधुरी आलीच नाही.

त्या नंतर जवळजवळ दोन तीन तास मी झपाटलेल्या अवस्थेत होतो. मागे बंड गार्डन जवळ 'पर्णकुटी 'मध्ये मी महात्मा गांधींची प्रार्थना ऐकायला गेलो होतो... तेव्हा कस्तुरबा होत्या का ?...आठवत नाही. बहुधा नसाव्यात...खांद्यावर पंचा टाकलेले, किडकिडीत, किंचित उंच असे गांधीजी प्रार्थनेसाठी येताना पाहिले आणि धन्य झालो. त्या दिवशी प्रथम ते भजन ऐकलं..." ईश्वर अल्ला तेरे नाम—सबको सन्मति दे भगवान "...त्या स्वरातही त्या स्त्रियांच्या स्वरातला गोडवा मुळीच नव्हता. पण काही निराळंच होतं. ताज्या निरशा दुधात असावी तशी गोडी त्या भजनात होती. कुठंतरी फार मोठं सामर्थ्य दडून राहिलं आहे, असं वाटत होतं. त्याच दिवशी प्रथमच मी, " वैष्णव जन तो तेणे कहिये—पीर पराई जाणे रे । " हे भजन ऐकले...खरंच सांगतो; प्रार्थना, उपासना, हृदयपालट, याची प्रत्यही टिंगल होणाऱ्या पुण्यात माझा जन्म गेला. पण त्या दिवशी मला काही निराळंच वाटलं होतं. हृदयाचा गाभा कुणीतरी हलवावा असं झालं होतं.

त्या पहाटे उगीचच जुन्या स्मृती चाळवल्या गेल्या होत्या. केव्हा तरी ऐकलेली, कुणीतरी म्हटलेली जुनी भजने मनात एकदम जागी झाली. त्यांचा मधुर स्वर मन बेभान करायला लागला..." रघुपति राघव राजाराम । पतीत पावन सीताराम "..." जानकी नाथ सहाय्य करे तब कौन बिगाड करे नर तेरो । "..."आम्ही काय कुणाचे खातो रे । तो राम आम्हाला देतो रे "

निरनिराळ्या सुरांनी मनाचं प्रांगण भरून गेलं, मी तसाच बसून राहिलो. मग

एकदम तीस सालच्या चळवळीत महात्मा गांधींवर आमचे एक शिक्षक, कवी मुकुंदराय यांनी केलेलं स्तोत्र आठवलं.

" प्रतापशाली सम दृष्टि धीर ।
निर्भीड सत्याग्रह युद्ध वीर ।
सहाय्य ज्या साठ हजार बंदी ।
तो वंदिला मोहनदास गांधी ।। "

मी ते स्तोत्र मोठमोठ्याने पुटपुटायला लागलो.

" सहाय्य ज्या साठ हजार बंदी
तो वंदिला मोहनदास गांधी "

मी खिडकीच्या बाहेर बघितले. सकाळ झाली होती. जंगली महाराज रस्त्यावरून वहाने धडाधड करीत जायला लागली होती. धुकं पार वितळलं होतं. प्राजक्ताचा वास हरवला होता. मी आत आलो आणि स्वतःच मनमुराद हसलो... सेनापती कसा ! ...तर पंचा नेसलेला. शरीराचं हाड नि हाड दिसणारा...अशक्त नि कुरूप ! ...सेना कशी ?...त्याला साजेशीच..." सहाय्य ज्या साठ हजार बंदी !"...कैद्यांची सेना घेऊन एक फाटक्या अंगाचा अर्धनग्न माणूस साम्राज्य सरकारशी लढायला निघाला आहे...शालिवाहनाने मातीचे घोडे घेऊन लढाई केली, त्यातलाच हा प्रकार..." तो वंदिला मोहनदास गांधी. "

त्या दिवसानंतर दोन तीन महिने तसेच गेले. मी सगळेच विसरलो. गांधी विसरलो...पर्णकुटी विसरलो...प्रार्थना विसरलो. मग एकदम एका दुपारी काँग्रेस बघण्यासाठी अहमदाबादला जायचे ठरले. कसे कुणास ठाऊक भजनाचे ते गोड सूर दोन तीन महिन्यानंतर मनात घुमले. अहमदाबादला जायचे ठरवले त्या वेळेला रखरखीत दुपार होती. पण मला ती पहाट आठवली...पारिजातकाच्या वासावर नि पांढऱ्याशुभ्र धुक्यावर मी बसलो होतो. ती सुंदर चेहऱ्याची सकाळ मला त्या दुपारी दिसली.

अहमदाबादला जाताना मी पारगावकरांबरोबर थट्टामस्करी करत होतो. निरनिराळ्या विषयांबद्दल विचार करत होतो; पण मनाच्या कोपऱ्यात मात्र पारिजात फुलला होता. आत कुठेतरी एकतारी वाजत होती...कुणीतरी आर्त स्वरानं सांगत होतं–" ईश्वर अल्ला तेरे नाम। सबको सन्मति दे भगवान। "

गाडीत वाचायला म्हणून मी मृणालिनी देसाई यांची 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी मुद्दाम घेतली होती ..महात्मा गांधींच्या जीवनावर ही कादंबरी आहे असं मला कळलं होतं...गांधींच्या जीवनावर कादंबरी !...अफाट दर्या उसळतो आहे...लाटा गगनाला भिडल्या आहेत...त्या रौद्रतेला आणि महानतेला कादंबरीच्या एका छोट्या बाटलीत सीमित करण्याचा प्रयत्न आहे...प्रवासात वेळ मिळेल तसतसा मी कादंबरी वाचत गेलो.

पहिली बरीचशी पाने संपवली आणि मग एका ठिकाणी नजर खिळली. वीस एकवीस साली कादंबरीचा नायक साबरमतीला गांधींना भेटावयास गेला होता. त्या वेळी गांधी आश्रमात नव्हते. तब्येत बरी नव्हती म्हणून त्यांना अंबालाल साराभाईंच्या राजप्रासादात नेलं होतं. पण तिथून ते दुसऱ्या दिवशी परत आले होते. कादंबरीच्या नायकानं वर्णन केलं आहे, " आम्ही साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमात थडकलो. साबरमतीच्या तीरावरच आश्रम—म्हणजे एका मोठ्या मैदानात काही झोपड्या होत्या. प्राचीन काळी इंद्राचे व्रज घडविण्यासाठी आपल्या अस्थी देणाऱ्या दधीचीचा आश्रम या जागी होता म्हणे. कोण जाणे ! पण सध्यातरी एका बाजूला स्मशान, दुसऱ्या हाताला जेल, समोर गिरण्यांची धुराडी आणि मागच्या बाजूला साबरमती, असा त्या आश्रमाचा भूगोल होता."

वाचता वाचता मन तिथेच रेंगाळले...पर्णकुटीतली प्रार्थना आठवली...आठ ऑगस्टला विराट जनसमुदायापुढे केलेलं भाषण आठवलं...दधीची ऋषीचा आश्रम तिथे होता म्हणे ! ...त्यांनी इंद्राचं वज्र घडवण्यासाठी स्वतःची हाडं दिली...त्या वज्राने जो प्रताप केला, तोच गांधींनी केला.

गाडी चाललीच होती. पुस्तकात बोट ठेऊन मी नुसताच बसलो होतो. आश्रम ! ...बघितलेले सर्व आश्रम आठवले...महर्षी आण्णासाहेबांची हिंगण्याची छोटी झोपडी दिसली...फार पूर्वी सासवडच्या शंकरराव देवांचा आश्रम बघण्यासाठी गेलो होतो,...शंकरराव तिथे नव्हते पण प्रेमाबाई होत्या...त्यांच्या कादंबरीवर तेव्हा त्यांच्याशी बोलली होतो ते सारं उगाचच आठवलं.

मी पुढे वाचीत गेलो, " संध्याकाळ होती. प्रार्थनेची वेळ झाली होती. शक्ती नव्हती तरी वळेवळेच गांधीजी प्रार्थनेसाठी आले होते. खाटेवरच बसले होते. कडुलिंबाच्या गर्द छायेतून अंधार उतरत होता. गीतेमधल्या श्लोकांचे धीरगंभीर ध्वनी —बारीक केलेल्या कंदिलाच्या मंद उजेडात एखाद्या स्वप्नासारखी दिसणारी खाटेवर बसलेली ती जीर्णजर्जर तपस्व्याची मूर्ती—त्या साऱ्याचा मनावर खोल परिणाम झाला."

" प्रार्थना संपली आणि मग बापूजी खोल आवाजात म्हणाले, " काल ताप चढला होता. संध्याकाळी जरासा ताप उतरला नि पहातो तो आजूबाजूला मोठा राजेशाही महाल...शरीराबरोबर मनही जळू लागले. मी हट्ट धरून येथे आलो... मी कसा वाहवत चाललो आहे. कामामागून कामे घेत गेलो. पण एकही तडीला नेले नाही. चंपारण्याचे काम तसेच राहिले. मजुरांचा हरताळ संपला. त्यांना सोडून खेडा जिल्ह्यात गेलो. शेतकऱ्यांची दशा तशीच उघड्या डोळ्यांनी बघत लष्कर भरतीसाठी आटापिटा केला...मी हा असा एक ना धड भाराभर चिंध्या घेऊन बसलो. हा आश्रम उभा केला. घराचा आसरा टाकून आलेले लोक इथे झोपड्यात ! ...आणि मी साराभाईंच्या राजवाड्यात ! ...देवाने तरी कशी क्षमा करावी मला ?

अहमदाबाद स्टेशनवरून गांधीनगरकडे बस चालली होती. मी आसपासच्या देखाव्याकडे निवांत बघत बसलो होतो...इतक्यात–अगदी अचानक कंडक्टरने पुकारा केला, "साबरमती !"...मी जणू स्वप्नातून जागा झालो आणि बाहेर पाहिले. चार सहा छोट्या छोट्या एक मजली बंगल्यांची वसाहत दिसली. मनोमन ओळखले की तोच साबरमती आश्रम...बसमध्ये निरनिराळ्या प्रांताचे लोक होते. मी सहज त्यांच्याकडे पाहिले. प्रत्येकजण खिडकीतून डोकावून आश्रमाकडे पहात होता...आश्रमाची आणि प्रत्येक माणसाची जणू जन्मजन्मांतरीची ओळख होती. परब्रह्माला भेटायला आल्याने उत्सुक असावे त्याप्रमाणे प्रत्येकाचे झाले होते. प्रत्येक चेहऱ्यावर उत्सुकता होती. काही निराळीच कांती प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चढली होती.

बस मोठ्या पुलावरून चालली होती. खाली नदीचे विस्तीर्ण पात्र होते. शेजाऱ्च्या मद्राशाने विचारले, "ही कुठली नदी ?" मला कोणी सांगितले नव्हते, पण मनाला माहीत होते. मी सांगितले, "ही साबरमती !" मी तितकासा भाविक नाही. मी नुसताच नदीकडे बघत राहिलो. पण मद्रासी मात्र उठला आणि खिशातून नाणे काढून त्याने नदीच्या पात्राकडे भिरकावले व नमस्कार केला. पंढरपूरला चंद्रभागेत पैसे टाकताना मी यात्रेकरूंना पाहिले आहे. अलाहाबाद येण्यापूर्वीच्या गंगेच्या पुलावरून गाडी चालली की नुसत्या गंगादर्शनाने बेहोश झालेले लोक मी बघितलेले आहेत. पंढरपूरला आणि अलाहाबादेला भाविकांच्या अनेक पिढ्यांची भक्ती लाभलेली आहे. तीच भक्ती साबरमतीलाही लाभली आहे.

नदीचे पात्र विशाल आहे...पैठणजवळ गोदावरीचे आहे तसे ! पण पाणी फारसे नाही. पात्रात म्हशींचे कळप अस्ताव्यस्त बसलेले आढळले. उघडी नागडी पोरे गुढगाभर पाण्यात डुंबताना दिसली. नदीचे असे सौंदर्य काहीच नव्हते. हल्ली नद्याही म्हाताऱ्या झाल्या आहेत असे मला वाटते. त्यांचे सगळे तारुण्य धुवून गेलेले आहे. वाईला कृष्णा नदी आमच्या लहानपणी जशी सुसाट वहायची तशी हल्ली वहातच नाही. ती मलीन आणि दीनच दिसते. साबरमती तशीच होती. पण माझ्या मनाला मात्र तिचं सौंदर्य भासत होतं. काका कालेलकरांच्या लेखणीनं साबरमतीच्या ठाई जे सौंदर्य निर्माण केलं होतं, त्याची चव फार पूर्वी मी घेतली होती तीच अजूनही माझ्या दृष्टीत रेंगाळत होती... मी शरयू बघितली तेव्हा मला राम वनवासाला जाताना दिसले होते. अयोध्यावासीयांचा त्यांना पोचवायला आलेला शरयूतीरावरचा घोळका मी पाहिला होता...मी यमुना बघितली तेव्हा मला सावळ्या रंगाचा कृष्ण सखा भेटला होता. मोटार साबरमतीच्या पुलावरून चालली होती, तेव्हा मला गांधी, कस्तुरबा नि विनोबा दिसले...सगळी ओळखीचीच ठिकाणं वाटायला लागली...हीच का ती नदी ? होय ! हीच ती...विनोबा पोहायला गेले असताना इथेच धारेला लागले होते. बुडून मरणार असं त्यांना वाटलं...पाण्याखाली

जाताना तीरावरच्या लोकांना ओरडून ते म्हणाले, " बापूंना सांगा—मी गेलो."... हेच ते ठिकाण... बराच वेळ मी पाण्यात बुडणाऱ्या विनोबांकडे पहात राहिलो. मोटार पुढे चाललीच होती.

अहमदाबादला दोन तीन दिवस राहिलो. मी काँग्रेसमधील भाषणे ऐकत होतो. शहरातून हिंडत होतो. निरनिराळ्या विषयावर विचार करत होतो. पण मनात कुठेतरी पारिजातकाच्या फुलांचा वास दरवळत होता. साबरमतीचं पाणी झुळझुळ वहात होतं.

अहमदाबाद सोडायच्या आदल्या दिवशी सकाळी आश्रमात जायचं ठरलं होतं. त्या दिवशी पहाटेच मला जाग आली. गांधींच्या जीवनातले अनेक प्रसंग आठवले. मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळेला मी शाळकरी मुलगा होतो. पण त्या वेळेच्या केसरीत वाचलेली दांडी मार्चची वर्णने मला आठवली. माणसाचे सौंदर्य त्याच्या चालीत असते. मोर्चात सामील झालेल्या गांधीजींची चालण्याची ढब मला इतक्या लहानपणी देखील फार सुंदर वाटली होती. तसं सौंदर्य पुढे कधी बघितलंच नव्हतं. 'पुत्र मानवाचा' या कादंबरीचा नायक त्या मोर्चात सहभागी झाला होता. त्याची त्या कादंबरीतली वर्णनं मी पूर्वीच वाचली होती. आश्रमात जाण्यासाठी हॉटेलमधून निघण्यापूर्वी ते वर्णन मी पुन्हा एकदा वाचले.

" मार्चचा दुसरा आठवडा उगवला. संध्याकाळची प्रार्थना उपासनाभूमी ऐवजी साबरमतीच्या वाळवंटात होऊ लागली. हजारो माणसे प्रार्थनेला येत होती. अकरा मार्चला प्रार्थना संपली, तरी कोणी घरी जायचे नाव काढले नाही. रात्रभर मुंग्यांच्या रांगा लागाव्या तशी माणसांची रीघ लागली होती. गांधींच्या बरोबर जाणाऱ्या एकूणऐंशी जणांनाही 'माहात्म्य' प्राप्त झाले होते. त्यांच्या दर्शनासाठी लोक धडपडत होते.

पहाटे प्रार्थनेची घंटा झाली. लोक जागतच होते. गांधीजींचे नेहमीचे भजनीक पं. खरेजी प्रार्थनेसाठी आश्रमातून बाहेर आले. त्यांना लोकांनी घेरून घेतले— दर्शनासाठी. त्या संगीत—साधकाने डोळे मिटून तेथेच प्रार्थना सुरू केली. " रघुपति राघव राजाराम पतीत पावन सीताराम " बुलंद आवाजात खरेजी रामनाम घेत होते. हजारो लोक ते नाव झेलून घेत होते. गांधीजी तेथे केव्हा येऊन पोचले, कळलेच नाही.

प्रातःस्मरण झाले. खरेजींनी एकतारी छेडली. " जानकीनाथ सहाय करे तब कौन बिगाड नर तेरो. "

हॉटेलमधून बाहेर पडताना मी हातात तेच पुस्तक घेऊन निघालो. लाल दरवाजाजवळच्या बसस्टॉपवर खूप गर्दी होती. बराच वेळ थांबावं लागणार होतं. पारगावकर काहीबाही बोलत होते पण माझं लक्षच नव्हतं. मला जुन्या प्रसंगाची धुंद चढली होती. चाळीस वर्षापूर्वी अकरा मार्चला साबरमतीच्या तीरावर जो

इतिहास घडला तो माझ्या डोळ्यापुढून हलत नव्हता...अगदी ठरल्याक्षणी गांधीजींनी आश्रमाच्या बाहेर पाऊल टाकले. खांद्यावरच्या पंचावर बिल्ला लावला होता. कुणीतरी औक्षण केले होते त्याची खूण म्हणून कपाळावर चांगला ठसठशीत कुंकवाचा टिळा होता...हातात भक्कम थोडी वाकडी–पेराची काठी...प्रसन्न हास्य करीत गांधीजी निघाले...त्यांच्या मागून त्यांचे एकूणऐंशी सहकारी...पंचा नेसलेले हाडांचे सापळे असलेले ते सैन्य ब्रिटिश सरकारला आव्हान देण्यासाठी निघाले... बस स्टँडवर उभा राहून मी तो सर्व देखावा बघत होतो.

बऱ्याच वेळाने बस आली. आत बसलो आणि कंडक्टरला ' साबरमती ' म्हणून सांगितले. हातातल्या पुस्तकातला भाग चालत्या बसमध्ये तेवढ्यातल्या तेवढ्यात वाचून काढला.

" जमलेली सर्वच माणसे या पदयात्रेमागून निघाली. ' वैष्णव जन तो तेणे कहिये, जे पीर परायी जाणे रे ' गांधीजींचे आवडते भजन सुरू झाले होते – हजारो कंठांतून ते उमटत होते. रस्ता भराभर संपत होता. कडुलिंबाच्या जाळीतून उन्हाचे कवडसे रस्त्यावर रांगोळी घालत होते. बरेच दूर–असलालीपर्यंत सारे गाव त्या यात्रेला निरोप देण्यासाठी गेले. तेथे दांडी यात्रेच्या यांत्रिकांनी जनताजनार्दनाला नमस्कार केला आणि निरोप घेतला...' वैष्णव जन तो तेणे कहिये...'चे सूर वातावरणात घुमत होते. "

कंडक्टर ओरडला, ' साबरमती ! ' मी जागा झालो, आणि आम्ही खाली उतरलो ...' वैष्णवजन तो तेणे कहिये ' हे भजन आतलं मन म्हणतच होतं. पाय आश्रमाच्या आवारात पोचले होते.

आश्रमाच्या बाहेर पाटी होती ' सत्याग्रहाश्रम–स्थापना २५–७–१९१७ ' खाली लिहिले होते–विसर्जन १–८–१९३३...आत निरनिराळ्या कुटी होत्या...हृदयकुंज...नंदिनी...जिथे विनोबा राहिले होते ती बारकीशी खोली...विनोबांच्या खोलीत मी उगाच जाऊन बसलो. एक खणाची ती दगडी खोली आहे. साबरमतीवरचे थंड वारे त्या खोलीत घुसतात. मी उगाचच खिन्न झालो.

गांधीजी रहात होते त्या कुटीने आपला त्या वेळेचा पोशाख टाकून दिलेला आहे – ती आता सीमेंटकाँक्रिटची झाली आहे. तिथे विनोबांनी काढलेले जीवनचक्र आहे. एका वर्तुळाभोवती चारी बाजूला स...त्या...ग्र...ह अशी अक्षरे आहेत. वर्तुळामध्ये छोटे चौकोन आहेत त्यात ' रामराज्य ', ' अस्पृश्यता निवारण ' वगैरे तत्त्वे लिहिली आहेत. अस्पृश्यता, अभय, अपरिग्रह, अस्तेय, आणि अहिंसा ही तत्त्वे आश्रमवासीयांनी पाळावी असा आदेश आहे. दोन तीन ठिकाणी सूत्रे लिहिलेली आढळली त्यातले एक असे होते –

' नाहं कामये राज्यं । न स्वर्गम् न पुनर्भवम् ।<br>
कामये दुःखतप्तानाम् । प्राणिनाम् आर्तिनाशनम् । '

आतल्या बाजूला रसोईघर आहे. कस्तुरबा तिथे स्वयंपाक करीत. गांधीजींचे अन्नाचे प्रयोग बहुधा तिथेच चालत असावेत. कस्तुरबा काय स्वयंपाक करत असतील, याचा विचार मनात येऊन मी हसलो. रसोईघरात उभा असतानाच त्या लोकविलक्षण जोडप्याविषयी मनात नाना तऱ्हेचे विचार येऊन गेले...मागे आठ दहा वर्षांपूर्वी मी वर्ध्याचा आश्रम बघायला गेलो होतो. तिथली कस्तुरबांची खोली आठवली. त्या खोलीच्या निम्म्या भागातच फरशी होती. कस्तुरबांना थोडं 'फॅशनेबल' रहाण्याची इच्छा झाली म्हणून त्यांनी स्वतःच्या खोलीला फरशी बसवून घेण्याचा हट्ट धरला. खोली अर्थात दोघांची होती. त्यामुळे गांधीजींनी फक्त निम्म्याच भागात फरशी घालून दिली, असे गाईडने सांगितले होते....कस्तुरबा त्या घरात कसा स्वयंपाक करत असतील कुणास ठाऊक!...एकदा तर नियमापेक्षा जास्त भाजी केल्याबद्दल गांधीजींनी संध्याकाळच्या प्रार्थनेत नापसंतीचे उद्‌गार काढले होते आणि स्वतःच्या वर्तमानपत्रात लेखही लिहिला होता.

आम्ही हिंडतच होतो. बापूजींनी स्वतःच्या हातांनी आपल्या हरिजन सहकाऱ्याकरता विणलेले वस्त्र तिथे पाहिले. जगाच्या कानाकोपऱ्यातून गांधीजींना आलेल्या पत्रांवरचे पत्ते एका कपाटात लावून ठेवले होते...एक पत्ता होता– 'महात्मा गांधी, जहाँ हों वहाँ!...दुसऱ्या पत्रावर प्रेषकाच्या नावाखाली लिहिलं होतं. 'I, who adore your work for the world'...जगत् सेवक महात्मा गांधी–वर्धा.... His excellancy Mahatma Gandhi–Kalkutta, असे काही पत्ते होते.

दुसऱ्या भागात गांधीजींच्या जीवनातील विविध प्रसंगांची चित्रे होती. साबरमती आश्रम त्यांनी सोडला आणि ते पदयात्रेसाठी निघाले त्या प्रसंगाचे चित्र कारुण्यपूर्ण आहे. पंधरा-वीस चेहरे चित्रात दिसतात. त्या प्रत्येकावरील छटा बघत रहाव्यात, अशा आहेत. एके ठिकाणी राजकुमारी अमृतकौरला गांधींनी लिहिलेली पत्रे आहेत. 'माय डियर ईडियट, रिबेल, अँड व्हॉट नाट!'...'माय डियर अनटचेबल'...अशा तऱ्हेने गांधींनी कौरना संबोधले आहे. महात्माजींच्या मनावर त्यामुळे काही निराळाच प्रकाश पडतो....चित्रे पहात आम्ही हिंडतच होतो.... जन्मापासून मृत्यूपर्यंतची!...इंग्लंडमधली... बोअर युद्धातली... बेचाळीसच्या सत्याग्रहातली... त्या सर्व चित्रांचा सामुदायिकरित्या मनावर एक चमत्कारिक परिणाम होत होता...एके ठिकाणच्या चित्रात कस्तुरबा बापूंच्या पायावर पाणी घालत होत्या. खाली लिहिलं होतं, 'बापू के पैर धोते हुए।' 'बां'च्या चेहऱ्याकडे बघत मी बराच वेळ उभा राहिलो. वाटलं, की ही स्त्री सुखी असेल का?... टिळकांची, सावरकरांची आणि गांधींची स्त्री नवऱ्याच्या 'वेडा'मागे अनिच्छेने फरपटत गेली असेल का? त्यांचे मूक दुःख कोणाला कळलेच नसेल का? परंपरागत हिंदू गृहिणीचे, त्या स्त्रिया म्हणजे प्रतीकच नव्हेत का? गांधींच्या आणि 'बां'च्या चेहऱ्याकडे बघत असताना मला उगाचच एक जुना प्रसंग आठवला....

बांचं निधन आगाखान पॅलेसमध्ये तुरुंगावस्थेत झालं. तिथेच दहनही झालं. चिता पेटली होती आणि कडक उन्हात गांधीजी अनवाणी उभे होते. तुरुंगाच्या मुख्य अधिकाऱ्याने छत्री उघडली आणि त्यांच्या डोक्यावर धरायला लागला. गांधीजींनी नुसत्या डोळ्याच्या इशाऱ्यानेच त्याला थांबवले आणि प्रेताचे संपूर्ण दहन होईपर्यंत ते त्या तळपत्या उन्हात तसेच उभे राहिले. कस्तुरबांची राख झाल्यावर खाली मान घालून स्वतःच्या कोठडीत निघून गेले...आम्ही चित्रे बघतच होतो. शेवटी त्यांच्या पायातल्या खडावा आणि हातातली काठी ठेवली होती. वर पाटी होती, 'दुन्यवी मिलकत (Earthly possession)'...त्या मिळकतीकडे क्षणभर दृष्टी टाकून आम्ही बाहेरच्या आवारात आलो आणि देवाच्या दारी क्षणभर विसावा घ्यावा या विचाराने तिथेच थोडा वेळ बसलो. समोर साबरमतीवर बांधलेला छोटासा घाट होता. तिथे माणसे कपडे धुवत होती. बायका पाणी भरत होत्या. अर्धे पाऊण पात्र ओसच होते. म्हशींचे कळप तिथे सुस्त बसले होते. पलीकडच्या तीरावर बांधलेल्या विजेच्या मोठ्या भट्टया दिसत होत्या. रस्त्यावरून वाहने जोरात पळत होती. मनात विचार आला की सत्तावीस अठ्ठावीस साली महात्माजी तिथे असताना हे काहीच नसेल....साबरमतीला भरपूर पाणी तेव्हा असेल....हा खरोखरच एखाद्या ऋषीचा आश्रम असेल.

आश्रमविषयक एक पत्रिका मी विकत घेतली होती. साबरमतीच्या तीरावर बसून मी ती चाळायला लागलो. पत्रिका इंग्रजी आणि गुजराथी भाषांतून होती. आश्रम कशासाठी स्थापन केला गेला, याबद्दल लिहिले होते, "The object of this Ashram, is that, its members should qualify themselves for and make a constant endeavour towards the service of the country, not inconsistent with universal good."

आश्रमवासीयांनी कसे वागावे हे पुढे लिहिले आहे. पहिला परिच्छेद 'सत्या'-वर आहे....नंतर अहिंसा आणि प्रेम याबद्दल म्हटले आहे. "Mere non-killing is not enough. The active part of non-violence is love. One who follows this law, must not be angry even with the perpetrator of the greatest wrong but must love him and serve him."...तिसरा परिच्छेद ब्रह्मचर्यावर आहे...सत्य, अहिंसा आणि प्रेम या गोष्टी ब्रह्मचर्य पालना-शिवाय शक्य नाहीत असे लिहिले आहे. परस्त्रीकडे किंवा पुरुषाकडे वासनायुक्त नजरेने बघणे हे विषासमान आहे....विवाहितांनी देखील परस्परांकडे वासनेने न पहाता मित्रभावाने पहावे, व शरीरसंबंध टाळावेत... असे सांगून पुढे लिहिले आहे, "A sinful touch, gesture or word is a direct breach of this principle." पुढे जिव्हालौल्याबद्दल लिहिले आहे– "Food must therefore be taken like medicine under proper restraint. Meat, liquor, to-

bacco, 'bhang' etc. are excluded from Ashram."

नंतर पुढे अनेक नियम आहेत त्यातले काही असे :– 'Non-possession or poverty' 'One does not possess anything which one does not really need; for instance, one must not keep a chair if one can do without it.'... 'Physical labour' मध्ये लिहिले आहे– 'Able-bodied adults should do all their personal work themselves and may not be served by others except for proper reasons.'

ती पत्रिका मी वाचून संपवली आणि स्वतःशीच हसलो. गांधी-आश्रमाच्या आवारात सर्व प्रांतातील लोकांची गर्दी होती. साबरमती वहातच होती....सगळंच चमत्कारिक होतं...सत्य अहिंसा प्रेम !... खाण्यावर निर्बंध, ब्रह्मचर्य ! स्वतःच्या स्त्रीशी देखील संग करायचा नाही. अनावश्यक वस्तू जवळ बाळगायच्या नाहीत... बापरे ! मी आसपास पाहिले. स्त्रियांच्या अंगावर नायलॉनच्या साड्या होत्या, पुरुष गरम सुटात वावरत होते, ट्रांझिस्टरवरून गोड गाणी ऐकू येत होती.... साबरमती नदी या सर्व प्रकाराकडे बघून हसत असावी. भगवान बुद्धानेही असाच हट्ट धरला होता. त्याच्या मागे त्यावेळेची जनता गेली होती. त्या जनतेने बुद्धालाच फसवले होते...झुरळे आणि मेलेल्या घुशी खाऊन त्यांनी विक्रम केला होता. मोठ-मोठे मठ आणि स्तूप बौद्ध भिक्षू आणि भिक्षुणींनी स्वतःची विहारस्थाने बनवली होती. अहिंसेचे तर वेड्या अशोकानंतर काय झाले कुणास ठाऊक !...गांधींच्या मागेही जनता तशीच गेली. पण जनतेनेच नव्हे तर त्यांच्या अनुयायांनीही त्यांना फसवले....सत्य अहिंसा प्रेम ब्रह्मचर्य !...मी उठून उभा राहिलो. चांगलं चांगलं खायचं नाही. कपडे घालायचे नाहीत. स्त्रीशी संग करायचा नाही. मग जगायचं कशासाठी ?... अन्नाचा किंवा स्त्रीचा चवीने उपभोग घ्यायचा नाही तर मग त्या वस्तू परमेश्वराने निर्माणच कशाला केल्या ?...तो सर्व आश्रम मला निराळाच भासायला लागला.

पारगावकरांशी बराच वेळ बोललो नव्हतो. ते म्हणाले, "तुम्ही बऱ्याच वेळात सिगरेट ओढली नाहीत..." मला एकदम तलफ आली. खिशातली सिगरेट काढून मी तोंडात धरली आणि काडी पेटवणार...

इतक्यात साबरमती नदीकडे माझे लक्ष गेले. चमत्कारिक नजरेने ती माझ्याकडे आणि आश्रमाकडे पहात आहे असा भास झाला. मी सिगरेट खिशात टाकली आणि पारगावकरांना म्हटले, "चला, बाहेर जाऊ."

लांब दूरपर्यंत चालत गेलो. आश्रम दिसेनासा झाला.

मग खिशातली सिगरेट पुन्हा काढली आणि मस्त झुरका मारला.

□ □ □

पुस्तके

# मुंबई ते मॉस्को व्हाया लंडन

' मुंबई–रोम–लंडन–पॅरिस–झुरिक–बर्लिन–हॅम्बुर्ग–म्युनिक–मॉस्को–मुंबई ' : ह्या एवढ्या शब्दसमूहावरूनही कल्पना यायला हरकत नाही. समोर असलेले पुस्तक हे एक प्रवासवर्णन आहे. एका पत्रकाराने आपल्या परदेशवारीचे केलेले चित्रण त्यात आहे.

प्रवासाला निघाले, की परतल्यावर प्रवासवर्णन लिहायचे हा आता जवळ-जवळ अलिखित संकेत ठरून गेलेला. हल्ली मासिकातूनही ह्याला भरपूर जागा करून दिली जाते. त्यातून प्रवासवर्णन हा प्रकार अलीकडे देशपांडे-काणेकर-बापट प्रभृतींनी वाचकप्रिय केलेला. त्यामुळे प्रवासवर्णन काही आता मराठी वाचकाला नवे नाही. पण ह्या प्रकारात, त्याच्या लेखनात विविधता, वैचित्र्य मात्र कितपत असते, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. वैचित्र्य असलेच तर ते विषयाचे, त्याच्या तपशीलाचे. बहुतेक वर्णने Alsoran ह्यातच मोडणारी. कुणी दैनंदिनीच्या, पत्राच्या रूपाने वा अन्य काही पद्धतीने हा प्रकार हाताळताना आढळत नाही. अर्थात प्रत्येकाची लेखनपद्धती वेगळी. आणि ती तशी असणारच. असायलाच हवी. पु. ल. देशपांड्यांचे सर्वसामान्यांशीही पटकन् सुसंवाद साधणारे प्रवासवर्णन तर प्रा. वसंत बापटांचे लेखनामागचे तरल, संवेदनाशील कविमनाचे दर्शन घडविणारे प्रवासवर्णन. गडकऱ्यांचे प्रवासवर्णन कसे आहे ? साधे, सरळ. त्यांच्या लेखनातच एक साधी, सरळ निवेदनपद्धती आहे. त्यात फारसा हळुवारपणा नाही, तरलता नाही. आहे तो तटस्थपणा. (हे यश की अपयश ?) पत्रकाराच्या वृत्तीला शोभेसा ! त्यात मधूनच डोकावणारी मिस्कीलता थोडासा ' रिलीफ् ' देते इतकेच.

गडकरी प्रवासाला निघाले, ते केवळ प्रवासाखातर म्हणून नव्हेत. ' थॉमसन फौंडेशन् ' ही वृत्तपत्रीय जीवनातली मानाची शिष्यवृत्ती घेऊन ते लंडनला गेले. त्यांच्या ह्या शिष्यवृत्तीच्या निमित्ताने लंडन आणि अन्य युरोपियन देशात त्यांचे जे वास्तव्य घडले, त्या वास्तव्यात त्यांनी तेथल्या जीवनासंबंधी जे भलेबुरे अनुभवले, त्याचे चित्रण म्हणजे हे ' मुंबई ते मॉस्को व्हाया लंडन !

गडकऱ्यांचा हा प्रवास सुरू झाला १५ एप्रिल १९६५ रोजी. त्यांनी पहिली

## जयवंत चुनेकर

# साधा, सरळ प्रवास !

झेप घेतली, ती रोमकडे. ही झेप घेण्यापूर्वीची, विमानतळावरची, प्रथमच परदेश प्रवासाला निघालेल्या मनाची आतुरता, हुरहूर का कोण जाणे, पण पुरेशा उत्कटतेने व्यक्त होत नाही. इथे आहे ते साधे, सरळ दृश्यांचे वर्णन. भोवतालच्या त्या वातावरणाचा, निकटवर्तीयांपासून दुरावताना होणाऱ्या मनाच्या हळवेपणाचा ठसा उमटलेला अनुभवाला येत नाही.

गडकऱ्यांनी रोममध्ये वास्तव्य केले, ते चक्क विमान कंपनीला 'गंडवून'! 'रोम' ह्या नावाबद्दल इतिहासाचे थोडेफार ज्ञान असणाऱ्यालाही एक आकर्षण वाटत असते. कुणाच्या डोक्यात तिथला इतिहास असतो, तर कुणाच्या डोक्यात नीरो असतो; गडकरी रोममध्ये उतरले आहेत, ते क्लिओपात्रा आणि सीझरची आठवण घेऊन. ह्या अशा काही आठवणी असल्या म्हणजे बरे असते. त्या स्थलकालाबद्दल एकदम जिव्हाळा उत्पन्न होतो. मग एखादे प्रार्थनामंदिरच मनात घर करून बसते. सीझरच्या रक्षेच्या वास्तव्याने पुनीत झालेला परिसर असलेले, मायकेल अँन्जेलोच्या स्तिमित करणाऱ्या प्रतिभेचा स्पर्श झालेले ! हा कलेचा साक्षात्कार पाहाता पाहाता ईश्वराचा शोध घ्यायला जावे, पण तो लागूच नये. (पृ. १०–११)

रोमनंतरचा मुक्काम लंडन. म्हणजे प्रवासातला महत्त्वाचा टप्पा. 'लंडन' म्हटले, म्हणजे नजरेसमोर साहेब उभा राहतो; 'लंडन' म्हटले, की वर्डस्वर्थ आणि त्याचा 'वेस्टमिन्स्टर ब्रिज' चटकन आठवतो. एवढेच कशाला, तिथं न जाऊन देखील तिथल्या 'बॉबी'शी आमचा परिचय झालेला. साहेब दीडशे वर्षे राज्य करून गेला. पण आमच्या डोक्यातून आणि मनातून मात्र अद्याप साहेबाने ठाण मांडलेय् ! परदेशी जाणारा माणूस – खास करून आमचा मराठी माणूस – साहेबाबद्दलचा जिव्हाळा बरोबर घेऊन जातो. आणि परत येतो तो त्याच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून जाऊनच. गडकऱ्यांचाही त्याला अपवाद नाही. याची कबूलीही त्यांनी दिली आहे. (पृ. २) पण मानवी स्वभावाचीही गंमत असते. लंडनचे हिरवे माळ पाहताना बालकवींच्या पंक्ती आणि तळकोकण यांनी मनावर केलेले संस्कार, उमटवलेला ठसा पुसला नसल्याचेही जाणवते.

गडकऱ्यांचे बहुतेक वास्तव्य लंडन आणि त्याच्या परिसरात झाले असल्याने साहजिकच ह्या शहरांनी त्यांच्यावर केलेल्या संस्कारांच्या अनुभवांचे दर्शन ह्या पुस्तकात अधिक होते. एकंदरीने दीर्घ काळाचे वास्तव्य ह्या कारणामुळे असेल किंवा लंडनबद्दल वाटणारे सुप्त आकर्षण असेल; पण इथल्या वातावरणाने खुलून गेल्यासारखे दिसतात खरे गडकरी. म्हणूनच 'टेम्स' नदीचे चित्रण करताना, 'आजीबाईच्या ऐटीत चालणाऱ्या एखाद्या चिमुरड्या पोरीसारखी ती टेम्स नदी मला भासली,' असे चमकदार वाक्य सहजपणे येऊन जात असावे. साहेबाच्या भावाचा लेखकाला तिथल्या पोर्टरनेच करून दिलेला 'परिचय' आपल्याही डोळ्यात हसू उमटवतो. (पृ. २१)

साहेबाच्या स्वभावाचे वर्णन करण्यासाठी गडकऱ्यांनी एक प्रकरण खर्ची टाकले आहे खरे (ब्रिटनमधील लोक आहेत तरी कसे? पृ. १४५–१५२); पण पुस्तक वाचता वाचताच साहेबाच्या स्वभावाचे दर्शन काही कमी स्पष्ट होत नाही! अगदी हे थॉमसन् महाशयच घ्या ना. एका कारकुनाची १४० वर्तमानपत्रे मालकीची करण्याची जिद्द (पृ. २५–२६) ह्यांची! थॉमसन् फौंडेशनचे सळसळत्या उत्साहाचे प्रतीक असणारे डायरेक्टर डॉम रोलँडस्; 'Oh no, the little girl is also my daughter. I am not so old to become a grand mother' असं म्हणून गडकऱ्यांची टोपी उडवणारी पोक्त दुकानदारीण (पृ. २८–२९) एका इमारतीची मालकीण असणारी, 'इंटरनॅशनल हाऊस'मधील लेखकाची खोली झाडायला येणारी मिसेस् हार्पर ही विलक्षण म्हातारी, अशी कितीतरी व्यक्तिचित्रे गडकऱ्यांनी जाताजाता समर्थपणे उभी केली आहेत. भारतीय मनाची पराक्रम, विद्वत्ता, ओज यांच्यावर विलक्षण श्रद्धा असते. तो अशा ठिकाणी विनम्र होतो. बर्ट्रांड रसेलशी एकच वाक्य बोलायला मिळाल्यानेही समाधान पावणारे (पृ. ५१–५४), लॉईड जॉर्ज यांचा मोठ्या आत्मीयतेने परिचय करून देणारे, त्यांची कन्या लेडी मेघन वारल्याचे मुंबईत आल्यावर कळल्यानंतरही हळहळणारे गडकऱ्यांचे मन याचीच साक्ष पटविते! तसाच लक्षात राहातो, तो वेल्स मधला ८२ वर्षांचा 'अशिक्षित लेखक' जॅक जोन्स! खूप काही भोगूनही चिरतरुण राहाणाऱ्या ह्या 'वेल्सच्या 'मामा वरेरकरां'चा हेवा वाटतो! जगापेक्षा मोठा आहे सामान्य माणूस. आपण एकमेकांना विसरता कामा नये,' असे तत्त्वज्ञान हा माणूस सहजपणाने सांगतो तेव्हा आश्चर्य वाटते. (पृ. ६९).

माणसाच्या स्वभावाचे हे सारे नमुने. तसेच आणखी काही समुदायाच्या मनाचे गंमतीदार दर्शन घडवणारे. स्मशानातही मृत्यूच्या सावटाची बिलकूल छाया पडू न देणारा साहेबाचा 'फ्युनरल् डेकोरेटर' (पृ. ७३) आणि आमचा 'अखेरचे सामान' विकणारा दुकानदार यांची तुलना या संदर्भात गंमतीदार ठरावी.

राणीच्या राज्यात गेलेला माणूस आणि तो शेक्सपीअरच्या जन्मभूमीचे दर्शन घेतल्याशिवाय परतेल हे असंभवनीयच ! त्यातून गडकरी हे हाडाचे पत्रकार—आणि 'रामगणेशां'ची कुळी सांगणारे. इथे मात्र ते आतापेक्षा अगदी निराळ्या पातळीवर येऊन पोहोचतात. 'एव्हनच्या तीरावर' हे संपूर्ण प्रकरणच स्वप्नील वातावरणात घेऊन जाते. Reportage पासून गडकरी दूर जाऊन पोहोचतात. ह्या प्रकरणाचा शेवटही हळुवार आहे. अखेरच्या दोन वाक्यांनी मात्र ह्या स्वप्नीलतेला छेद दिल्यामुळे, प्रकरणाचा तोल विघडतो, असे वाटते.

या परीकथेच्या वातावरणातून लेखक बाहेर पडतो, तो पुन्हा 'पूर्व इंग्लंडची सफर' करायला. मग येत राहाते, ते माहितीवजा वर्णन. Reportage च्या स्वरूपाचे. कदाचित पत्रकार म्हणून अपरिहार्यपणे.

'चार्लस डिकन्सचे इप्सविच' यात डिकन्सबरोबर लक्षात राहाणारी व्यक्ति म्हणजे 'ईस्ट अँग्लियन डेली टाइम्स'चे संपादक बी. आर. विल्सन. मिष्कील संपादक. अग्रलेखांकडे लक्ष वेधण्याचा उत्तम प्रकार कोणता ? ह्या महाशयांच्या मते, त्याच्या बाजूला चक्क सिनेमा—नाटकांच्या जाहिराती छापणे हा ! पण एकंदरीतच आम्हाला बरेच काही शिकवणारा साहेब अग्रलेखाला अग्रहक्क देण्यात चांगलाच कंजूष. अग्रलेखाचे महत्त्व तुम्हा आम्हाला ! (ह्या बाबतीत तर आमचे नाक साहेबाच्या वर! ) साहेबाला इंटरेस्ट '१६ वर्षाच्या पोरानं पस्तीशीची पत्नी' कशी केली यात, तर साहेबीणीला 'कोणत्या वस्तू स्वस्त झाल्यात वा हप्त्याने मिळतात' ह्यात. 'ब्रिटीश वृत्तपत्रांचे जग' ही काय चीज आहे त्याचा परिचय ह्या पुस्तकातून मुळातच करून घ्यायला हवा. ह्या 'जगात' सकाळच्या बातम्याच पुन्हा संध्याकाळी छापल्या जातात चक्क ! 'ह्या दैनिकातल्या जाहिरातीने माझे जीवन


मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमानुसार लिहिलेले

# सुगम समाजशास्त्र

लेखक : प्रा. उत्तम बा. भोइटे, एम्. ए.

*श्रीशिवाजी महाविद्यालय, परभणी*

मूल्य रु. ६–०० रजि. ट. खर्च रु. १–२०

व्हीनस प्रकाशन

३८१ क, शनिवार पेठ, पुणे ३०

बदलले,' असे म्हणणारा शेतकरी ह्याही देशात आहे. (आमच्याकडच्या जाहिरातींची इतकी काय बरं चोरी करायची ?) अशा एकापेक्षा 'अद्‌भुत्' कथांसाठी 'ब्रिटिश वृत्तपत्रांचे जग' हे प्रकरण मुळातूनच वाचावे. माहितीच्या दृष्टीने 'ब्रिटिश संसदेत', 'साऱ्यांचे जीवन व्यापणारे टेलिव्हिजन' ही प्रकरणेही नोंद घेण्यासारखी. 'बिटल्स व बीटनिक्स यांचे धुंद जग' हा बीटल्सना समाजावून घेण्याचा प्रयत्न म्हणून उल्लेखनीय. 'पब्ज आणि नाईट क्लब्ज' लेखकाबरोबरच वाचकालाही अंतर्मुख करणारे प्रकरण.

'दुभंगलेले बर्लिन,' 'साम्यवाद्यांची मक्कामॉस्को' ह्यात त्या त्या देशांबद्दलच्या व्यक्तिमत्त्व गुदमरवून टाकयच्या आपल्या कल्पनांना दुजोरा देणारीच माहिती आहे.

ह्या वारीत पाश्चात्यांच्या कलाविश्वात रस घेणे मात्र गडकऱ्यांना फावलेले नाही. म्हणूनच 'पाश्चात्त्य रंगभूमी व चित्रपट' हे प्रकरण सपक उतरले आहे.

शेवटी खटकलेल्या काही गोष्टींची नोंद : पुस्तकात अनेकदा अडखळायला होते, ते सैल, सदोष वाक्यरचनेने. (पृ. १६, २४, २५, ३४, ३७, १७८, १८८ इ.) 'तीन इंग्रजी जाणणाऱ्या जर्मन विद्यार्थिनी' (पृ. १८६) ह्यापेक्षा 'इंग्रजी जाणणाऱ्या तीन जर्मन विद्यार्थिनी' हे अधिक बरे नाही का ? खेरीज, 'अवन्ति हे शब्द अगदी भारतीय वाटले,' ह्यातला अक्षरे आणि शब्द ह्यांमधला गोंधळ गडकऱ्यांसारख्या पत्रकाराच्या लेखात तरी येऊ नये, असे म्हणणे अवाजवी ठरू नये ! केव्हा केव्हा लेखनातली सुसूत्रता ढळल्याचेही जाणवते. मुद्रणदोषही आहेत. जाणवावेत, एवढे. तो दोष गडकऱ्यांचा हे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे. पण त्यामुळे अडखळायला होते, हेही खरेच.

सर्वसामान्य वाचकाचीच नव्हे, तर एकंदरीतच परदेशीय वातावरणासंबंधी कुतूहल, जिज्ञासा असलेल्या वाचकाचीही ती जिज्ञासा भागेल, असे लेखन आहे हे. म्हणूनच सुरुवातीला म्हटले, हे पुस्तक अखेरपर्यंत वाचावेसे वाटते.

मला मात्र पुस्तक वाचताना सारखे जाणवत होते, ह्या साऱ्या लेखनामागे दिलखुलास अशा व्यक्तिमत्त्वाची कुचंबणा झाली आहे. स्वैरपणाने, उत्कटतेने अनुभव घेण्याची वा रंगविण्याची वृत्ती येथे अभावानेच जाणवते. 'जो विषय समोर येईल त्याला सामोरे' जाण्याच्या वृत्तपत्रीय वृत्तीची मर्यादा आड आली असावी काय ?

आणखी एक प्रश्न : हे 'मुंबई ते मॉस्को व्हाया लंडन' की 'मुंबई ते लंडन व्हाया मॉस्को ?'

**['मुंबई ते मॉस्को व्हाया लंडन': माधव गडकरी**
**मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई : पृ. २२७, मूल्य आठ रुपये]**

¤ ¤ ¤



# मला काही सांगायचंय !

## वसंत कानेटकरांचे नवे नाटक

चिकित्सक नाट्यप्रेमी रसिकांना ज्या नाटककाराविषयी अगत्य व कुतूहल असते ते नाटककार व्यावसायिक अर्थाने सहसा यशस्वी नसतात. मराठी प्रेक्षकाला जे आवडते ते देण्यासाठी नाटककाराला बहुधा कलात्मक निकषांशी तडजोड करावी लागत असावी. नाहीतर यशस्वी नाटककारदेखील या चिकित्सक रसिकांना प्रिय होऊ शकला असता. काहीच नाटककार चिकित्सक रसिकांचे कुतूहल जागृत ठेवूनही सामान्य प्रेक्षकांची खुषी झेलताना दिसतात. श्री. वसंत कानेटकर हे असे एक नाटककार आहेत. म्हणूनच श्री. कानेटकरांच्या नव्या नाट्यकृतीकडे, नाटकाकडून कलात्मक अपेक्षा बाळगणारा चिकित्सक रसिक, आणि शनिवार–रविवारच्या संध्याकाळी, पैसे टाकून, मनोरंजन विकत घेणारा प्रेक्षक, दोघेही मोठ्या अपेक्षेने पाहात असतात.

श्री. कानेटकरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व असाधारण स्वरूपाचे आहे. ' रायगडाला जेव्हा जाग येते ' या अभिनव ऐतिहासिक नाटकाने त्यांना प्रसिद्धी मिळवून दिली असली तरी वाचकांना, त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वातील विकासक्षमता, ' घर ', ' पंख ' आणि ' पोरका ' या त्यांच्या कादंबऱ्यांतून आणि ' वेड्याचे घर उन्हात ' या नाटकामधूनही जाणवत होती. या कलाकृतींनी जे यश त्यांना मिळाले होते त्यापेक्षाही त्यांच्या प्रतिभेविषयी ज्या अपेक्षा त्यांनी निर्माण होत होत्या त्या अधिक मोलाच्या होत्या. ' रायगडा'च्या यशानंतर श्री. कानेटकरांनी विलक्षण वेगाने नाट्यलेखन केले. मात्र लेखनाच्या या वेगामुळे रसिकांच्या मनात सहज निर्माण होणाऱ्या भयकारी शंका, त्यांच्या विविध प्रकारच्या लक्षणीय नाट्यकृतींमुळे, निवारल्या गेल्या. तरीही ' अश्रूंची झाली फुले ' हे नाटक पाहताना, विचारी प्रेक्षकाच्या मनात, श्री. कानेटकरांनी आपल्या प्रयत्नांची दिशा तर बदलली नाही ना, अशी शंका निर्माण झालीच. कारण हे नाटक म्हणजे एखाद्या समस्येची संकेतनिष्ठ, सोपी, कृतक–नाट्यात्मक रचना करणाऱ्या बाळ कोल्हटकरी नाटकाचाच एक अधिक चतुर पर्याय होता. पण समर्थ वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाविषयी निश्चित भविष्य वर्तवणे अवघड असते; त्यामुळे श्री. कानेटकरांच्या पुढील नाटकांची सर्वच मराठी प्रेक्षक आतुरतेने वाट पाहात होते.

" मला काही सांगायचंय ! " या आकर्षक नावाच्या, श्री. कानेटकरांच्या नव्या नाटकाचा पहिला प्रयोग शुक्रवार दिनांक ९ जानेवारी रोजी, मुंबई येथील साहित्य संघ मंदिरात झाला. एका सुखी, एकत्र कुटुंबापुढे भूतकाळातील रहस्याचे भूत अचानक उभे राहते; त्यावेळी निर्माण झालेल्या संघर्षामुळे या घरातील माणसे दुरावणार असे वाटत असतानाच ती अधिक जवळ येतात; हे या नाटकाचे मूळ कथाबीज. परंतु या नाटकातील संघर्ष केवळ परिस्थितीवर आधारलेला नाही; तर निवृत्त न्यायाधीश असणारा, न्यायनिष्ठा अखंड जपणारा कुटुंबप्रमुख (प्रभाकर पणशीकर,) घराचा आधारस्तंभ असणारी त्याची सून यशोधरा (सौ. सुधा करमरकर,) तिचा यंत्रात रमलेला, सर्वांना ज्याच्या चारित्र्याविषयी शंका आहे असा बेछूट पती (डॉ. काशीनाथ घाणेकर,) त्याचा विद्वान भाऊ दिलीप आणि कुटुंबमित्र या नात्याने घरात वावरणारे गांधीवादी बाप्पाजी, यांच्या भिन्न व्यक्तिमत्त्वातून हा संघर्ष निर्माण झाला आहे. जी यशोधरा घरामधील सर्वांना पवित्र, आदरणीय वाटते तिच्या मनावर भूतकाळामधील एका कुरूप रहस्याचा भार आहे; प्रत्यक्ष वडिलांना ज्याच्या भूतकाळाविषयी शंका आहेत असा यशोधरेचा पती राहुल निरागस आहे, पराकाष्ठेचा उदार आहे. (या नाटकाच्या कथानकाची तपशीलवार चर्चा केल्यास, त्याच्या रहस्यपूर्ण मांडणीतील आकर्षण नाहीसे होऊन रसिकांचा मनोभंग होईल, म्हणून अशी चर्चा जाणीवपूर्वक टाळली आहे.)

या नाटकातील घटनांची रचना दोन प्रमुख सूत्रान्वये केलेली आहे. एक सूत्र दिलीप–जान्हवी यांच्याविषयीचे आणि दुसरे सूत्र यशोधरा (तिचे पूर्वरहस्य) व राहुल यांच्याविषयीचे. दोन्ही सूत्रे, न्यायाधीशाच्या – पित्याच्या या दोन्हीविषयी असणाऱ्या अपेक्षा व निर्णय यांमध्ये गुंतली जातात. पहिल्या दोन अंकांच्या रचनेमध्ये " मला काही सांगायचंय " या वाक्याचा व त्यामागील भावनेचा वेधक योजकतेने उपयोग केला आहे. परंतु तिसऱ्या अंकाचा शेवटचा प्रवेश म्हणजे हरिभाऊंच्या कादंबऱ्यांच्या उपसंहाराचाच एक वेगळा पर्याय आहे. यशोधरेच्या विवाहपूर्व मातृत्वाविषयीचे सर्व धागेदोरे न्यायाधीशमहाशय आपल्या न्यायालयीन चाणाक्षतेने उकलतात, अशी या प्रवेशामागील मूळ कल्पना होती. या प्रवेशातच, श्री. कानेटकरांनी, न्यायापलीकडची नीती श्रेष्ठ आहे, आणि दिसते तसे नसते, अशी दोन सुभाषिते सिद्ध व विशद केली आहेत. स्पष्टीकरणात्मक तिसरे अंक ही मराठी नाट्यरचनेची नेहमीचीच मर्यादा आहे. परंतु या नाटकात श्री. कानेटकरांनी राहुल व यशोधरा या पतिपत्नीसंबंधाचे चित्रण ज्या मनोवेधक सूचकतेने केले होते त्याच्या तुलनेने शेवटच्या अंकातील पितापुत्रमीलनातील ढोबळपणा फारच खटकला.

या नाटकाचे दिग्दर्शन श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी नेहमीच्या नेटकेपणाने केले होते त्याबद्दल, आणि सरकत्या रंगमंचाचा चमत्कार प्रेक्षकांना साक्षात दाखवून टाळी मिळवण्याचा सांप्रतचा प्रघात टाळल्याबद्दल, त्यांना धन्यवाद द्यायला

हवेत. परंतु श्री. दारव्हेकरांसारख्या, स्वत: नाटककार असलेल्या दिग्दर्शकाने, सरावाने व मेहनतीने येणाऱ्या सफाईच्या पलीकडील काही संकल्पनात्मक विकास दाखवावा अशी अपेक्षा बाळगणाऱ्या रसिकाच्या पदरी मात्र निराशा येते. तसेच कितीही लोकप्रिय व मोठा नट झाला तरी दिग्दर्शकाचा दाब त्यावर हवा असे नाट्याच्या सामूहिक स्वरूपातून सूचित होते; या नाटकाच्या प्रयोगात मात्र राहुलचे पात्र ज्या पद्धतीने उभे राहिले त्यामध्ये हा दाव सैलावला होता की काय, अशी शंका पुन्हा पुन्हा येत होती. डॉ. काशीनाथ घाणेकर हे लोकप्रिय नट आहेत; आणि दुर्दैव असे की भूमिका रंगमंचावर प्रत्यक्ष सादर करत असतानाही लोकप्रियतेचे हे भान जपतच ते रंगमंचावर वावरतात. त्यांचा व त्यांच्या चाहत्या प्रेक्षकांचा जो लाडिक संवाद नाटकात चालू राहतो तो अनेकदा नाटकाचा विरस करणारा ठरतो. प्रस्तुत प्रयोगात तर अनेक गंभीर प्रसंगी, डॉ. घाणेकरांच्या आविर्भावांनी, हास्यकल्लोळ निर्माण होत होता. हे दिग्दर्शकाला अपेक्षित असेच घडत होते काय?...प्रारंभीच्या उमेदवारीच्या काळापासूनच भडक अभिनय व सदोष शब्दोच्चार ही श्री. काशीनाथ घाणेकरांची वैशिष्टये आहेत. या नाटकात, श्री. दारव्हेकरांनी त्यातील दुसऱ्या दोषामध्ये बऱ्याच सुधारणा केल्या आहेत. परंतु भडक अभिनयाचे काय? तो तसाच राहणार काय? की श्री. घाणेकरांच्या देखण्या रूपाप्रमाणे त्यांचा भडक अभिनय हाही व्यावसायिक यशामधील हुकुमी एक्का आहे?...श्री. प्रभाकर पणशीकर यांनी त्यांच्या नेहमीच्या रुबाबाने, सहज अभिनयाने निवृत्त न्यायाधीशाची भूमिका साकार केली. अशा गुणी नटाचा योग्य उपयोग करून घेणारी नाटके निर्माण झाली नाहीत तर त्यांच्या अभिनयाचा एकच एक साचा होईल की काय, असे भय वाटते. सौ. सुधा करमरकर यांनी यशोधरेची भूमिका, कर्तबगार, करारी सून आणि भूतकाळातील रहस्याने विद्ध झालेली पत्नी, या दोन्ही अंगांनी फार समर्थपणे सादर केली. वर उल्लेखिलेल्या प्रमुख भूमिकांना इतर सर्व पात्रांनी समजूतदार अभिनयाची साथ दिली. परंतु त्यामध्येही कु. गिरिजा पेंढारकर या मुलीने केलेल्या मीरा या अपंग मुलीच्या भूमिकेचा विशेष उल्लेख करायला हवा. (हे पात्र कथानकात मात्र अनावश्यक वाटले.)

"मला काही सांगायचंय!" या नाटकाची कुशल रचना, सफाईदार दिग्दर्शन व कसलेला नटवर्ग यांमुळे हे नाटक लोकप्रिय होईल यात शंका नाही. परंतु श्री. कानेटकरांसारख्या सच्च्या कलावंताकडून असे सीमित यश अपेक्षित नाही. त्यापेक्षा एखादे अपयशही अधिक मोलाचे ठरेल. पण..व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी होणारा नाटककार, आणि नाटक या कलाप्रकारातील श्रेयस शोधणारा अस्वस्थ नाटककार, यांच्या भूमिका, मराठीत तरी, एकरूप झालेल्या क्वचितच दिसतात!

–सौ. पुष्पा भावे

## हृषिदांची नवी कलाकृती

# सत्यकाम



संजीवकुमार । शर्मिला टागोर

जीवनातील सात्विक मूल्यांचा होत असलेला ऱ्हास, तडजोडीच्या नावाखाली पदोपदी होणारे गैरव्यवहार, समाजाचे होत असलेले नैतिक अध:पतन आणि या अध:पतनाबद्दल ना खंत ना खेद अशा वृत्तीने राहिल्याने अधिक वेगाने अधोगतीकडे जाणाऱ्या समाजाला किंचित धक्का देण्याचा प्रयत्न जरी एखाद्या अनामिकाने केला, तर ज्यांच्या हितसंबधांना त्यामुळे बाधा येईल अशा सर्वांकडून अशा एखाद्या सत्वशील माणसाची चाललेली ससेहोलपट याचे मर्मभेदक चित्रण हृषिदांच्या 'सत्यकाम'मध्ये केले आहे.

आचार्य घराण्याची सत्यप्रियतेची परंपरा चालवणारा सत्यप्रिय हा हृषिदांच्या चित्रपटाचा नायक. इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण करून नवीन उमेदीने सत्यप्रिय नोकरीवर रुजू होतो आणि प्रामाणिकपणे आपले स्वत:चे काम करणेही किती अवघड आहे याची प्रचीती त्याला येते. एका ठिकाणी त्याला टिकून राहणेही कठीण जाते. विवाहासंबंधी घेतलेल्या निर्णयामुळे प्रेमळ दादाजींना कायमचे अंतरावे लागते. पत्नीला विवाहपूर्व संकटामुळे अपत्य झालेले असल्याने, आणि ही बाब सतत मनामध्ये राहिल्याने वैवाहिक जीवन फारसे समाधानी नसते. सत्यासाठी चाललेल्या संघर्षापायी दारिद्र्य येते. स्वभावामध्ये बदल होतो. आणि मुंगीच्या पावलाने आलेला कॅन्सर अक्राळविक्राळ स्वरूप धारण करतो. अखेरच्या क्षणी पत्नी आणि मुलासाठी सत्यप्रिय तडजोड करतो. पत्नीला ही तडजोड मानवत नाही आणि आपल्या हातून सत्यप्रियतेचे पालन झाले या सुखासमाधानामध्ये सत्यप्रिय मृत्यूला सामोरा जातो. सत्यप्रियता ही एखाद्या घराण्याची परंपरा नाही; तर व्यक्तिगत प्रवृत्तीवर आणि मिळणाऱ्या मार्गदर्शनावर या गोष्टी, अवलंबून असतात, याची दादाजींना खात्री पटते आणि मग सत्यप्रियचा मुलगा काबूल — 'सत्यकाम' या नावाने आचार्य कुलाची जबाबदारी स्वीकारतो.

गोष्ट वाचल्याशिवाय वाचकांना समाधान वाटत नाही म्हणून मुद्दाम चित्रपटाची

पोष्ट नोंदवली. एखादी कलाकृती अशी असते की, तिच्या वर्णनापेक्षा प्रत्यक्ष आस्वादाने अधिक आनंद मिळतो. हृषिदांचा 'सत्यकाम' ही एक अशी कलाकृती आहे. केवळ कथा म्हणून या चित्रपटातील घटनांची तर्कसंगती लावण्यापेक्षा त्यातील प्रतिकात्मक अर्थ समजल्यास या कलाकृतीचा आस्वाद अधिक समर्थपणे घेता येईल.

## सदोष पटकथा

नारायण संन्याल यांची ही कथा निवडण्यामध्ये, आणि त्या चित्रीकरणाची जबाबदारी हृषिकेश मुखर्जी यांच्यावर सोपवून त्यांना विषय – हाताळणीमध्ये पूर्ण स्वातंत्र्य देण्यात निर्माते एस्. जे. एस्. पंछी (अराऊंड द वर्ल्डवाले नाही) यांनी मोठे धाडस दाखविले आहे. विषय हळुवारपणे हाताळून हृषिदांनी बिमल रॉय स्कूलची आपली परंपरा यशस्वीपणे चालवली आहे.

पटकथा काहिशी गलथान आहे. विशेषतः विश्रांतीच्या आधीच्या भागामध्ये हा दोष प्रकर्षाने जाणवतो. प्रसंग अथवा व्यक्तिरेखा यांना कोणतेही विशेष प्राधान्य न मिळाल्याने गतिमानता, आणि व्यक्तिरेखा ठसविण्याच्या दृष्टीने हा भाग निरुपयोगी वाटतो. त्यानंतर मात्र भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष व स्वातंत्र्योदय पाहून महत्त्वाकांक्षेच्या नवीन क्षितिजांची, आणि स्वतंत्र, स्वयंपूर्ण भारताची स्वप्ने पाहणाऱ्या तरुण पिढीचे प्रतिनिधित्व चित्रपट करतो.

तत्वनिष्ठा, आणि ध्येयवादाने काम करणाऱ्या या मंडळींपैकी एक सत्यप्रिय. स्वशासीत देशामध्येही आयुष्य हे तितकेच किंबहुना अधिक कठोर आहे. आपलीच माणसे सहजतेने देशाची हानी करत आहेत. एक दुसऱ्यांना पाण्यात पहात आहेत. आणि काळ्या संपत्तीचे डोंगर उभे करीत आहेत, अशा समाजाविरुद्ध लढा देण्यासाठी सत्यप्रिय उभा आहे, कर्तव्य, शिस्त प्रामाणिकपणा, आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष या विचारसूत्रांना प्रमाण मानून तो मार्गक्रमण करतो आहे. प्राणपणाने संघटीत समाजाशी लढतो आहे – सत्यप्रियला झालेला कॅन्सर प्रतिकात्मक आहे. समाजाला लागलेल्या या किडीमुळे संपूर्ण देश मृत्यूच्या खाईत लोटला जात आहे असेच सत्यप्रियच्या मृत्यूने सूचीत केले आहे. आणि सत्यप्रियचे असाधारण व्रत चालवणारी त्याची पत्नी आणि मुलगा – दोघेही गृहहीन झाले आहेत. चित्रपटाचा प्रारंभीचा भाग पाहिल्यावर चित्रपट नेहमीच्या मार्गाने जाणार असे वाटते. चित्रपटावर लादलेले स्पष्टीकरणात्मक निवेदन अकारण लांबले आहे. प्रारंभीचे समूहगीत, त्यानंतर नायकाने संस्थानामध्ये नोकरी पत्करणे, तिथे त्याची दुष्ट माणसाची गाठ पडणे, त्याने नायिकेची सुटका करणे, हा भाग तांत्रिकदृष्टया उत्तम असला तरी कथा नेहमीच्या मार्गाने जाणार असे वाटते. कथाविषयाची पार्श्वभूमी, राजकीय संदर्भ, संस्थानी वातावरण आदी बाबी उत्तम आहेत. नायकाची मंत्रिमहोदयांबरोबर मनमोकळी चर्चा – अतिशय वास्तवपूर्ण पद्धतीने चित्रित

करण्यात आली आहे. मंत्र्याने सत्यप्रियच्या घरी जाण्याचा भाग टाळला असता तर उत्तम ठरले असते.

चित्रपटामध्ये केवळ तीन गीते आहेत. त्यांचे चित्रीकरण ठाकठीक असले, तरी या गाण्यांनाही फाटा देण्याचे धाडस दिग्दर्शकाने दाखवले असते तर ते उपकारक ठरले असते.

धर्मेंद्र, शर्मिला टागोर, रवी घोष, आणि अशोककुमार या कलावंतांनी उत्कृष्ट भूमिका करून चित्रपटाची उंची वाढवली आहे. विशेषत: धर्मेंद्र व शर्मिला यांचा विशेष गौरव आवश्यक आहे. नाटकीपणा टाळून संयमी अभिनयाने समर्थ व्यक्ति-रेखा उभी करण्याचे त्यांचे सामर्थ्य वाखाणण्यासारखे आहे. त्यांच्या या गुणांची प्रचीती अखेरच्या दृश्यातून विशेष प्रकर्षाने जाणवते.

चित्रपटाच्या तांत्रिक बाजू उत्कृष्ट आहेत. दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी यांच्या हाताळणीमधील जिवंतपणा जाणवण्यासारखा आहे. सत्यप्रिय व त्याचा मित्र यांच्या कॉलेज संपण्यापूर्वी झालेल्या गप्पा, सत्यप्रिय, त्याची पत्नी व मित्र यांच्या प्रथम भेटीचा प्रसंग, सत्यप्रियच्या मृत्यूचा प्रसंग, अशा अनेक प्रसंगातून त्यांनी आपले कौशल्य प्रगट केले आहे. अन्य हिंदी चित्रपटांच्या संदर्भात विचार करता एकदम वेगळी भासणारी ही कलाकृती प्रेक्षकांना समाधान देऊन जाते.

—शरद गोखले

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे ॲण्ड कं. प्रा. लि. बम्बई-१.



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ▫ पुराणातली वांगी अमेरिका एक्स्पोर्ट

उंदरांना योग शिकविण्याचा प्रयत्न एक अमेरिकन वैज्ञानिक सध्या करीत आहे असे नुकतेच ' माणूस 'मध्ये वाचले. आता ही त्या माणसाची कमाल की त्या उंदरांची कमाल हे ठरविणे कठीण आहे. प्राचीन भारतातले योगी आपल्या योग-सामर्थ्याच्या बळावर अनेक चमत्कार करीत असत असे आपल्या पुराणात आहे. पण आता ही पुराणातली वांगी पुराणात न ठेवता थेट अमेरिकेला एक्स्पोर्ट! करण्याची पाळी आली आहे असे दिसते. अर्वाचीन अमेरिकेतले हे चतुष्पाद योगी आपल्या नवसंपादित योगविद्येचा काय बरं उपयोग करू शकतील ? मला वाटते कुठलाही योगसामर्थ्यसंपन्न मूषक जगत्कल्याणाचे पहिले कार्य करील ते म्हणजे मार्जारा-सुराचा बंदोबस्त करणे. " मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार ? " या समस्येची चर्चा इसापनीतीच्या गोष्टीत अपुरी राहिली होती, पण आता एक हात-चुकलो, शेपटी-आत्मविश्वासपूर्वक वर जाईल अन् हा योगी उंदीर मांजराला संमोहावस्थेत पाडून त्याच्या गळ्यात अगदी नारोशंकराची घंटादेखील बिनदिक्कत बांधू शकेल. आणखीही बरीच किरकोळ कामे हा योगी उंदीर करू शकेल. उदाहरणार्थ; योगी मनुष्य दगडाला हात न लावता तो हवेत उचलतो त्याप्रमाणे पिंजऱ्यात अडकलेला खोबऱ्याचा तुकडा पिंजऱ्यात न शिरता आपोआप बाहेर आणणे; भिंतीतली बिळे बुजविण्यासाठी वापरलेल्या सीमेंटचे पाणी करणे; सरकारी हपिसातली कुठलीही फाईल न उघडताच ती कुरतडण्याच्या लायकीची आहे की नाही हे दिव्यचक्षूने ओळखणे, इत्यादी.

## ▫ सोमरस की साम्यरस ?

निरनिराळ्या नित्योपयोगी वस्तूंच्या बनावटीसाठी योग्य प्रमाण ठरवून देणाऱ्या भारतातील एका संस्थेने नुकतेच भारतात तयार होणाऱ्या व्होड्कासाठी प्रमाण ठरवले असल्याचे वृत्त आहे. हे मात्र अत्यंत लोकोपयोगी कार्य झाले यात शंका नाही. कारण बुरसटलेल्या भारताचा आधुनिक इंडिया व्हायचा असेल तर दुधा-तुपाच्या नद्या वाहत असलेल्या आपल्या देशात आता समाजवादी सुरेची नदी वाहिली पाहिजे, तेव्हा तिच्या क्वालिटीकडे काटेकोर लक्ष पुरविणे हे एक राष्ट्रीय

कर्तव्यच आहे. शिवाय मदिरा व मदिराक्षी यांचा जगजाहीर संबंधही विसरून चालणार नाही. उदाहरणार्थ रशियन साम्यवाद हा आता रगेल राहिला नसून रंगेल झाला आहे याचा भक्कम पुरावा नुकताच उघडकीला आला आहे, व तो म्हणजे 'कामसूत्रा'ची रशियन आवृत्ती तयार झाली आहे. आता सोव्हिएट साम्यवादी जर कार्लमार्क्सपासून कामसूत्रापर्यंत प्रवास करू शकतात तर आपल्याला सौंदर्यवतीकडून समाजवादाकडे जाणे जमायला हरकत नाही. पण ते केव्हा, आपण सोमरस सोडून साम्यरस प्राशन करू तेव्हा.

## ▫ मिनी मासिक

मिनी–स्कर्टने सुरू केलेली मिनीची फॅशन पुढे मागे कपड्यापुरती मर्यादित न राहता इतर क्षेत्रातही प्रवेश करील असा माझा अंदाज होता व तसेच घडले आहे. कलकत्त्याहून एक बंगाली मासिक अडीच इंच रुंद व साडेतीन इंच लांब एवढ्या आकारात निघू लागले आहे. म्हणजे मिनी–स्कर्टच्या जोडीला मिनी–साहित्य तयार झाले म्हणायचे. या मिनी–मासिकात म्हणे भरपूर कविता, कथा इत्यादी मजकूर असतो. आता चतकोर कविता करणाऱ्या किंचित्–कवींना एवढे आटोपशीर मासिक योग्यच आहे. पण लघुकथेला एवढ्या आकारात बसण्याइतकी लघु करायची म्हणजे तिला चांगलेच स्लिमिंग करावे लागेल. हे अगदीच अशक्य आहे असे मात्र नाही. मागे 'माणूस'मध्ये एका सत्तावीस–पानी कादंबरीचे परीक्षण आल्याचे आठवते. अन् कादंबरी सत्तावीस पानांची असू शकते तर सत्तावीस शब्दांची असायला काय हरकत आहे? शिवाय ही मिनीची फॅशन साहित्यात तरी अभारतीय नाही. "श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः" असे म्हणणारे शंकराचार्य हेच मिनीचे मूळ पुरुष नाहीत काय?

## ▫ देवाच्या बायकोची गैरसोय

देवाने घडविलेली दुनिया भारतीय मानक संस्थेने ठरविलेल्या बरहुकुम बनलेली नाही. अर्थात तिच्यात बऱ्याच उणीवा आहेत. त्यातली एक मोठी उणीव म्हणजे देवाने तयार केलेल्या गुलाबाच्या फुलांचा रंग बहुतेक गुलाबी व फार तर पांढरा अन् पिवळा असतो. पण किरमिजी रंगाच्या साडीवर यातल्या कुठल्याच रंगाचा गुलाब खुलणार नाही हे देवाच्या लक्षात झाले नसावे–व त्यामुळे देवाच्या बायकोची बरीच गैरसोय झाली असावी. ही देवाची चूक दुरुस्त करण्यासाठी दिल्लीच्या शेतकी संशोधन संस्थेच्या तज्ज्ञांनी नुकत्याच किरमिजी रंगाचा गुलाब तयार केला आहे. चला, आता परमेश्वर–पत्नीची रंगसंगतीची अडचण मिटली. देवाने माणसाचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

▫ ▫ ▫

## खोजाची चाल....

[पृष्ठ ६ वरून]

भाषण केले. कॉंग्रेसमधील संघर्षापासून ते लोकसंख्येच्या प्रश्नापर्यंत सर्व बाबींची चर्चा करून त्यांनी तरुणांना 'इंदिरा–यशवंतरावांची कॉंग्रेसच समाजवाद आणील' अशी ग्वाही दिली. जवळ जवळ अनुयायी असलेले श्रोते आणि भाषणाचा मार्ग-दर्शनपर सूर यामुळे या भाषणाची विशेष दखल घेण्याची गरज वाटली नाही. जमलेली मंडळी मात्र भाषणाच्या बैठकीवर खुश झाल्याचे निश्चितपणे जाणवले. सभा संपली. नगर येथे असलेल्या केंद्रीय कर्मचाऱ्यांनी काही निवेदन धारियाजींना दिले. युनिट हलवले जात असल्याने महाराष्ट्र सोडावा लागेल या भीतीने मंडळी अस्वस्थ झालेली दिसली. शक्य ते सर्व सहकार्य देण्याचे आश्वासन धारियाजींनी दिले. खोसला कमिटी रिपोर्टचा निषेध करणारे एक पत्रक कोणा महिलेने धारिया-जींच्या हातात ठेवले. गर्दी टाळून आम्ही बाहेर पडलो.

पहिलवान छबू रानबोके, अहमदनगर पालिकेचे नगराध्यक्ष. भोजनाचा बेत त्यांच्या घरी होता. पानातील पहिली वाढ पाहून आम्ही अक्षरशः गारद झालो. बहुधा समव्यवसायी मंडळी भोजनासाठी येत असावीत असा पहिलवानांचा ग्रह झाला असावा, असे भरल्या ताटाकडे पाहून वाटले. धारियाजींनी अॅडीशनल प्लेट मागवून हलके केले. मीही तोच मार्ग अनुसरला. भोजन साधे पण खास मराठी पद्धतीचे होते. पहिलवानांकडे पाहून सुबत्तेची कल्पना येणे खरोखर कठीण होते. मळकट पायजमा, दोन लावलेल्या आणि दोन उघडचा गुंड्या असलेला शर्ट, डोईवर मळकट पांढरी टोपी – अशा वेषाआड दडलेला पहिलवानांचा प्रचंड देह पाहून जी कल्पना होती त्यापेक्षा घरचे वातावरण वेगळे होते. दारात अॅम्बेसेडर होती, घरात फ्रीझ होता, भोजनाचे पदार्थांमध्ये पुण्यातील रेशनचा मागमूस नव्हता.

दुपारी साडेतीनच्या सुमारास धारियाजींच्या घरून आम्ही निघालो. गप्पा स्वाभाविकपणेच प्रचलित राजकारणावर होत्या. कॉंग्रेसमधील संघर्ष हा तात्त्विक अथवा वैचारिक स्वरूपाचा आहे हे आपल्याला मुळीच मान्य नसल्याचे मी सांगितले. वाईचे सगळे पवित्रे व्यक्तिगत राजकारणातून आणि सत्तेच्या हव्यासा-तून पडलेले दिसतात. धारियाजी म्हणाले, 'प्रारंभी हा संघर्ष वैचारिक नसेल. व्यक्तिगत पातळीवर सुरू झालेल्या या संघर्षाला हळूहळू वैचारिक बैठक प्राप्त होत आहे. मुंबई अधिवेशनाने या बदलाची दिशा निश्चित केली आहे. केवळ ठरावांच्या फूटपट्टीवर वैचारिक बैठक ठरवायची तर अहमदाबाद आणि मुंबई कॉंग्रेसमध्ये काही फरक आढळत नाही. दोघांनाही दहा कलमी कार्यक्रम मंजूर

आहे. दोन्ही बाजूंना समाजवाद हवा आहे.' 'मग ही भांडणे कशासाठी ?' असे विचारून मी म्हणालो, 'इंदिराजी सत्ता राखण्यास आणि त्यांचे विरोधक त्यांच्या हातून सत्ता हिसकावून घेण्यास उत्सुक आहेत. म्हणजे अखेरीस भांडण आहे ते सत्तेसाठी, समाजवादाच्या गप्पा केवळ जनतेला भुलावण घालण्यासाठी.' 'समाजवादाची भाषा केल्याखेरीज कोणत्याच काँग्रेसवाल्याला जनतेसमोर जाता येणार नाही' असे सांगून धारियाजी पुढे म्हणाले : 'समाजवादाच्या नुसत्या गर्जना करून पोकळ आश्वासने देणारे कोण, आणि समाजवाद आणण्यासाठी प्रयत्नशील असणारे कोण याची दखल जनतेने घ्यावयाची आहे. आता संस्थानिकांच्या तनख्यांचेच घ्याना. सिंडीकेटवाल्या मंडळींपैकी तनखे आणि सवलती रद्द करण्यास किती जणांचा मनापासून पाठिंबा आहे ? मात्र असे असले तरी इंदिराजींचे सरकार अडचणीत आणण्याच्या हेतूने राजकीय पातळीवरून ही मंडळी तनखे रद्द करण्याची भाषा बोलतात. इंडिकेट काँग्रेसने मात्र तनखे रद्द करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष पाऊल उचलले आहे आणि पार्लमेंटमध्ये सिंडीकेटलाही या निर्णयाला पाठिंबा द्यावा लागेल.'

मी : बाईंची समाजवादी काँग्रेस तनखे रद्द करण्याच्या घोषणा करते, पण प्रत्यक्ष तनखे रद्द करण्याची वेळ येईल त्यावेळी मात्र नुकसानभरपाईच्या रूपाने भरपूर रक्कम संस्थानिकांच्या पदरात टाकली जाईल.

धारिया : संस्थानिकांचा प्रश्न तसा गुंतागुंतीचा आहे. तत्त्व म्हणून तनखे रद्द केले, तरी सध्याच्या परिस्थितीतील संस्थानिकांची राजकीय ताकद लक्षात घेता हा प्रश्न सोडवताना त्याच्या राजकीय अंगाचा विचारही करावाच लागेल. व्यक्तिशः माझे मत विचाराल, तर ब्रिटीशांची इमाने-इतबारे सेवा करून भारतीय जनतेच्या स्वातंत्र्य-प्रेरणेशी प्रतारणा करणाऱ्या या मंडळींना एक पैही नुकसान-भरपाई देऊ नये असे मला वाटते.

इंडिकेट संघटनेसंबंधी बोलताना धारियाजी म्हणाले : महाराष्ट्राने कायम पुरोगामी धोरणाचा पुरस्कार केला आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे संपूर्ण ताकदीनिशी महाराष्ट्र इंडिकेट काँग्रेसच्या पाठीशी उभा राहील. सिंडीकेट काँग्रेसला फारसे भवितव्य येथे नाही. बाद झालेली वृद्ध मंडळी आणि असंतुष्ट आत्मे गोळा करून संघटना बांधता येणार नाही. आणि या मंडळींनी चव्हाणांबद्दल जो खोटा प्रचार चालवला आहे, तो केवळ संतापजनक आणि दिशाभूल करणारा आहे. अध्यक्षीय निवडणुकीमध्ये संघटना कायम रहावी म्हणून चव्हाण संघटनेच्या बाजूने उभे होते. तथापि तात्त्विक विचारसरणीच्या आधारे काँग्रेस फुटल्यावर यशवंतरावांसारखा प्रखर समाजवादी नेता पुरोगामी धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या इंडिकेट काँग्रेसमध्ये येणे स्वाभाविक होते.

'समजा, यशवंतराव सिंडीकेटमध्ये राहिले असते, तर महाराष्ट्र काँग्रेस आणि व्यक्तिशः तुम्ही कोणत्या बाजूला उभे राहिला असतात ?'–मी.

'राजकारणामध्ये 'जर तर'च्या भाषेला अर्थ नसतो.'—धारियाजी.

'एकीकडे समाजवादाच्या घोषणा करायच्या, समाजवादी कार्यक्रमाच्या अंमल-बजावणीची आखणी करायची आणि दुसरीकडे बिर्लांना खत कारखान्यास परवानगी द्यायची हा कुठला समाजवाद?'

धारियाजी: 'बिर्लांना खत कारखान्यास दिलेली परवानगी ही घोडचूक समजावी लागेल. विशेषत: बिर्लांच्या उद्योग समूहांची चौकशी करण्यात येत असताना त्यांना नवीन परवानगी देणे संतापजनक आहे. शिवाय खत कारखान्यातील नफ्याचा मोठा वाटा परकीय मंडळी उचलतील हेही विसरून चालणार नाही. वास्तविक अशा स्वरूपाचे उद्योगधंदे सरकारने कार्पोरेशनमार्फत सुरू केले पाहिजेत.'

'सरकारी क्षेत्रातील मोठ्या उद्योगधंद्यांचा अनुभव फारसा चांगला नाही—'मी.

'ही नोकरशाहीची पोलादी चौकट त्याला पुष्कळ प्रमाणात जबाबदार आहे. समाजवादी समाजरचनेवर ज्यांचा विश्वास नाही अशा मंडळींच्या हाती सत्ता केंद्रीत झाल्याने आपल्याला हा अनुभव येतो. ही चौकट मोडून एक नवीन कार्यक्षम यंत्रणा उभारणे अत्यंत आवश्यक आहे. सरकारी क्षेत्रातील कारखानदारी समाधानकारकपणे चालत नाही ही टीकेची बाब नाही. एक एक दोष टिपून अलगद बाजूला काढले पाहिजेत. श्रमिक वर्गामध्येही हा माझा, माझ्या देशाचा कारखाना आहे ही भावना निर्माण केली पाहिजे.'—धारिया.

शहरी मालमत्तेवर मर्यादा, आणि संपत्तीच्या मूलभूत अधिकाराचा प्रश्न या संबंधीच्या चर्चेला मी तोंड फोडताच धारियाजी म्हणाले, 'हा प्रश्नही गुंतागुंतीचा आहे. ग्रामीण भागामध्ये तुम्ही जमिनीच्या मालकीसंबंधीच्या कमाल मर्यादा आणता आणि या मर्यादेपलीकडील जमीन, विधिमंडळे ठरवतील त्या किंमतीने सरकार विकत घेऊ शकते. मग शहरी भागातील मालमत्तेसंबंधी काही तरतुदी नकोत का? या मालमत्तेवर जर समाजाची सत्ता आणायची असेल, तर संपत्तीच्या मूलभूत अधिकारासंबंधी फेरविचार करावा लागेल. कुटुंबसंस्था मोडावी, अथवा किमान गरजा नाकाराव्यात अशी माझी अथवा माझ्या अन्य सहकाऱ्यांची मुळीच भूमिका नाही. पण एक विशिष्ट मर्यादा ठरवली की त्यावरील संपत्तीचा कब्जा शासनाला घेता आला पाहिजे. संपत्तीचा मूलभूत अधिकार मान्य केला तर अशी जादा संपत्ती ताब्यात घेतानाही प्रस्थापित बाजारभावाने पूर्ण किंमत मोजावी लागेल आणि समाजवादी विचारसरणीचा बळी पडेल. यातून वाट म्हणून शहरी भागातील संपत्तीच्या कमाल मर्यादेपर्यंत संपत्ती राखण्याच्या अधिकारांचा मूलभूत अधिकारांमध्ये समावेश करावा. आणि त्यावरील संपत्ती या कक्षेतून सोडावी, तरच त्याला काही अर्थ उरला. तुमच्या मुंबईच्या खोजाच्या चाळीचेच उदाहरण घ्या. रक्ताचे पाणी करून कामगारांनी नामशेष राहिलेल्या या चाळीला पुन्हा नवचैतन्य प्राप्त करून दिले. आणि आज मालक त्यांच्या अक्षरश: छातीवर उभा आहे. आजचा कायदा माल-

काला अनुकूल आहे. संपत्तीवर कमाल मर्यादा घातल्यावर व ही चाळ या कक्षेबाहेरील ठरल्यावर जर त्याची प्रस्थापित बाजारभावाने पूर्ण किंमत मोजायची म्हणल्यास या व अशा अन्य चाळींचा प्रश्न कधीच सुटणार नाही. सध्याच्या परिस्थितीत जागा न सोडणे आणि एक प्रकारचा सत्याग्रह करणे, एवढा एकच माग या मंडळींपुढे आहे. शासन ज्या पद्धतीची समाजरचना करण्यास वचनबद्ध आहे त्याच पद्धतीने हा प्रश्न सुटल्यास मुंबईच्या गिरण भागातील इतरही अनेक चाळींपुढील प्रश्न सुटतील. खोजाची चाळ ही या दृष्टीने Test case ठरणार आहे आणि वेळ पडली तर मी स्वत: या मंडळींच्या बाजूने उभा राहणार आहे.'

ग्रामीण भागातील आर्थिक प्रश्नांसंबंधी धारीयाजी : ' जमीनविषयक कायद्यांची अंमलबजावणी करण्यास तर आम्ही वचनबद्ध आहोतच; पण या वचनबद्धतेला क्रियाशीलतेचे स्वरूप आले पाहिजे. शेतावर खपणाऱ्या प्रत्येकाला कष्टाचा पुरेपूर मोबदला मिळालाच पाहिजे. सहकारातून नवीन सत्तास्थाने निर्माण होऊन पिळवणूक होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. अन्न, वस्त्र, निवारा, औषध, आणि शिक्षण या किमान गरजा पूर्ण करू शकलोच पाहिजे अशा जिद्दीने काम करण्याची गरज आहे. बदलत्या समाजरचनेमुळे ज्यांना गमवावे लागणार आहे त्यांच्याकडून विरोध होणारच. तो आपण यशस्वीरीत्या कसा मोडून काढतो यावरच पुढचे यश अवलंबून आहे.'

' खरं सांगू का, आपल्याला तरुणांमध्ये राहून त्यांचे प्रश्न समजावून घेण्याची अतिशय आवड आहे. काही करता आले तर या मंडळींसाठी करावे अशी इच्छा आहे. आजचा तरुण, मग तो शहरी भागातील असो अथवा ग्रामीण भागातील असो, सुशिक्षित असो, अशिक्षित असो, तो सारखाच निराश आहे. देशामध्ये ज्या पद्धतीचे राजकारण चालू आहे त्याची त्याला विलक्षण चीड आहे. वाढती विषमता त्याच्या मनाला बोचत आहे. बेकारीने तो त्रासून गेला आहे. समाजवादाच्या नुसत्या गप्पांना तो आता कंटाळला आहे. आता हा वर्ग अपेक्षा करतो कृतीची. चर्चा, भाषणे, घोषणा यांना विटलेल्या या मंडळींना आता कार्यक्रमाची अंमलबजावणी हवी आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे पाऊल उचलले गेल्याने बाईंच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस समाजवादी कार्यक्रमाची अंमलबजावणी करू शकेल, अशी आशा त्याच्या मनामध्ये निर्माण झाली आहे. या आशेचा दीप हातात घेऊन इंडिकेट कॉंग्रेसने जाहीर केलेल्या कार्यक्रमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामध्ये कुचराई झाल्यास सबंध भारताचा बंगाल–केरळ होण्यास वेळ लागणार नाही.'–धारिया.

गाडीने निम्मे अधिक अंतर कापले होते. थोड्याफार विश्रांतीची गरज होती. एका भल्यामोठ्या झाडाखाली श्री. पवार यांनी गाडी उभी केली. पायमोकळे करून

आणि चहापान करून आम्ही पुन्हा मार्गस्थ झालो. देशाचे परराष्ट्रीय धोरण, भाषावार प्रांतरचना, राष्ट्रभाषेचा प्रश्न, सध्या ज्वलंत असलेला चंदीगडचा प्रश्न, जातीय दंगली, मध्यावधी निवडणुका, आदी विविध प्रश्नांसंबंधी धारियाजींशी मनमोकळेपणे वातचित केली. या संदर्भातील त्यांच्या मतांचा धावता आढावा असा—

'रबात मुस्लीम परिषदेमध्ये आपण भाग घ्यावयास नको होता. एक तर ती मुस्लीम परिषद होती. आणि दुसरे आपल्याला आमंत्रण नव्हते. मग भाग घ्यायचा कशासाठी ? समजा अशीच जर हिंदूंची एखादी परिषद भरली असती, तर सरकारी पातळीवरून आपण सहभागी झालो असतो का ? मग या परिषदेमध्ये जाण्याचे कारण काय ?' त्रिवेंद्रम येथे रशियन वकिलातीमार्फत केंद्राच्या परवानगीशिवाय बांधल्या जात असलेल्या आणि इमारत पडल्यामुळे उजेडात आलेल्या सांस्कृतिक केंद्रासंबंधी त्यांनी नापसंती व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय राजकारणामधील तटस्थतेच्या धोरणाचा मात्र त्यांनी पुरस्कार केला.

भाषावार प्रांतरचना तत्त्व म्हणून ठीक; परंतु यातून निर्माण झालेल्या अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एक कायम स्वरूपाची यंत्रणा निर्माण करणे आवश्यक होते. विशेषत: राज्यांच्या सरहद्दीचे प्रश्न काही निश्चित तत्त्वांच्या आधारे सोडवले जाणे जरूर होते. अशी यंत्रणा निर्माण झाली असती तर बेळगाव–कारवारचा वा चंदीगडचा प्रश्न सुलभतेने सुटला असता.

चंदीगडचा प्रश्न ही सरकारच्या कसोटीची वेळ आहे. प्रश्न कसाही सोडवला तरी त्यातून नवीन प्रश्न निर्माण होतील. तथापि शहा कमिशनचा अहवाल बाजूस सारून चंदीगड पंजाबला दिले, तर महाजन कमिशनचा अन्याय्य अहवाल बाजूस ठेवून बेळगाव-कारवारच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा आग्रह धरता येईल. मुस्लीमांवरील धर्माचा पगडा कमी करू शकेल, असे मुस्लीम नेतृत्व निर्माण करणे आणि सर्व भारतीयांसाठी कॉमन सिव्हील कोड लागू करणे अत्यंत आवश्यक आहे. हिंदू–मुस्लीम विवाहाला उत्तेजन द्यावे आणि शासनाने अशा विवाहास अनेक सवलती द्याव्यात. अखेर रोटी–बेटी व्यवहारच कायमची जवळीक निर्माण करू शकतात.

मध्यावधी निवडणुकांसंबंधी कितीही हवा निर्माण करण्यात आली असली तरी अशा निवडणुका होतील, असे मला वाटत नाही. आणि झाल्याच तर त्याला आम्ही डरत नाही. समाजवादी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये अडथळे येत आहेत म्हणून आम्ही जनतेचा कौल मागण्यास आलो आहोत अशी आमची भूमिका राहील. कदाचित सिंडिकेटवालेही समाजवादाची आरोळी मारतील. पण एस. के. पाटील, मोरारजीभाई, निजलिंगप्पा, यांच्यासारखी मंडळी समाजवाद आणू शकतील, यावर जनता विश्वास ठेवेल असे वाटत नाही. कदाचित अशा निवडणुकीच्या वेळी मध्या चुकूनमाकून विरोधी गटामध्ये असणारी मंडळी बरोबर आपआपल्या तंबूत डेरेदाखल होतील.

भोजनाचा बेत छान झाला होता. सभा कशी होते हे जाणण्यास मी उत्सुक होतो. रात्री ९॥ ची सभा होती. तथापि कडाक्याच्या थंडीमुळे फारशी गर्दी जमेल अशी अपेक्षा नव्हतीच. बरोबर ९॥ ला आम्ही गांधी मैदानात आलो. गर्दी बऱ्यापैकी होती. आणि सभा सुरू झाल्यावर हळूहळू गर्दी वाढू लागली. धारियांना पट्टी बरोबर सापडली. हशा-टाळ्यांची दाद घेत सभा त्यांनी चांगली तास-दीड तास रंगवली. जमलेल्या मंडळींपैकी ५-२५ श्रोते सोडले तर बाकी जनता शेतकरीवर्गातील होती. त्यामुळे प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम रंगेल अशी कल्पना नव्हती. पण मंडळींनी आणून दिलेले प्रश्न खरोखर मार्मिक होते. 'इंदिराजींच्या काँग्रेसमध्ये यशवंतराव शेवटपर्यंत राहतील का ? निवडणुकीचा खर्च सामान्य माणसास सोसवत नाही. मग सामान्य माणसाच्या सक्रिय सहभागाशिवाय समाजवाद कसा आणणार ? कम्युनिस्टांच्या बाबतीत काँग्रेसचे धोरण काय ? जगजीवनरामबाबू कोण ? काँग्रेस अध्यक्ष का केंद्रीय सरकारचे मंत्री ?' जनता जागृतीचे थोडेफार दर्शन या प्रश्नातून पहावयास मिळाल्याने समाधान वाटले. पक्षीय शिस्तीच्या मर्यादा संभाळून धारियाजींनी प्रश्नाला उत्तरे दिली. बाबू जगजीवनरामजींनी केंद्रीय मंत्रिपद सोडले पाहिजे असे त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले.

सभा संपवून रात्री ११॥ वाजता आम्ही नगर सोडले. आणि रात्री १॥ वाजता पुण्यास परत आलो. सरकारी काँग्रेसमधील कडव्या गटातील एक नेते म्हणून श्री. धारियाजींचा उल्लेख करावा लागेल. आत्तापर्यंत उपेक्षणीय वाटणाऱ्या या गटाने आपल्या अस्तित्वाची चुणूक प्रकर्षाने दाखवावयास सुरुवात केली आहे. काँग्रेस फाटाफुटीचा लाभही या गटाला मिळालेला आहे. सरकारी काँग्रेसच्या कार्यकारिणीमध्ये या मंडळींना स्थान मिळाले आहे. यापैकी काही मंडळींनी इंदिराजींच्या मंत्रिमंडळाच्या पुर्नरचनेचे वेळी मंत्रिमंडळामध्ये प्रवेश मिळवला तर त्यात फारसे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सध्या या गटाची ताकद बेताची आहे. महत्त्वाच्या निर्णयावर अद्यापही ही मंडळी प्रभाव पाडू शकत नाहीत. ही वस्तुस्थिती, बिर्ला खत कारखाना प्रकरण आणि मालमत्तेच्या मूलभूत अधिकारासंबंधी काँग्रेस कार्यकारिणीने केलेला ठराव, यावरून स्पष्ट झाली आहे. तथापि नवीन तरुण पिढीला काँग्रेसमधील कोणत्या गटासंबंधी जास्त आकर्षण वाटते असे विचारल्यास, या तरुण तुर्कांकडे बोट दाखवावे लागते. भविष्यकाळामध्ये हा छोटा गट मर्यादित अर्थाने प्रभावी शक्ती बनण्याची शक्यता असल्याने या गटाचे प्रवक्ते श्री. मोहन धारिया यांचे विचार म्हणून मुद्दाम विस्ताराने मांडले.

मुंबई काँग्रेसचा मजकूर मी देऊ शकलो नाही. त्यामुळे मनाला लागलेली रुखरुख धारियाजींच्या या मुलाखतीमुळे काही प्रमाणात कमी झाल्याचे समाधान मला मिळाले.

— शरद कृष्णन्

# फॉस्फोमिन -



# अधिक उत्साह देते. भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.









**खरोखर!... फॉस्फोमिन म्हणजे घरकुलांतील आरोग्याचे कारंजे!**

व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटसयुक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB® TIT® ® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50A/67 Mar



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

७ ते १३ फेब्रुवारी १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रह सुखदायक आहेत. शनी उदरी, मंगळ बारावा, सोमवारपासून राहू-शुक्र अकरावे, रवि-बुध दहावे व गुरू सातवा. असे सर्व ग्रह शुभफलदायक आहेत. व्ययातील मंगळामुळे शरीरस्वास्थ्य विघडेल. पहिले दोन दिवस धनलाभ चांगला होईल; पण मानसिक व्यथा राहील. ८ तारखेपासून विद्याभ्यास नीट चालेल. २७ ते ३२ वर्षाच्या तरुण-तरुणींना प्रेमविवाहाचा योग येईल. प्रसाधनाच्या व्यवसायातील, नाट्यकला अगर चित्रकलेतील व्यावसायिकांना दिवस चांगले आहेत. पत्नीची व मित्रांची मदत होईल. सरकारी अगर सहकारी कामात यश येईल. प्रतिष्ठा मिळेल. राग आवरणे जरूर आहे. शत्रुनाश होईल. ९।१० तारखांना बरेच दिवस राहिलेले येणे येईल. च, ल, र, त, अ या अक्षरांनी नावे सुरू असणाऱ्या लोकांना वरीलप्रमाणे फळे मिळतील.

शुभ तारखा ९ ते १३

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान अपयश देणारे आहे. व्ययात शनी भाग्येश व दशमेश आहे. मंगळ एकादशात, राहू-शुक्र दशमात, रवि-बुध भाग्यात व षष्ठात गुरू. भाग्यहानी व इभ्रतीला कमीपणा आणणाऱ्या गोष्टी घडतील. वडील आजारी पडण्याचा योग आहे. ३६ ते ४२ वयाच्या लोकांना ही फळे जास्त प्रमाणात मिळतील. गुरु-शुक्रांच्या शुभयोगामुळे विस्कटलेली घडी सावरली जाईल. चंद्राचे भ्रमण दशम-एकादश व व्ययातून आहे. भावंडांकडून पहिल्या दोन दिवसात मदत होईल. मित्रही मदत करतील. शेवटचे दोन दिवस मानसिक यातना, घराबद्दल नसते वाद निर्माण होतील. सार्वजनिक कामात मात्र भरघोस यश येईल. " Unless man is devalued in domastic life he cannot be a successful public worker. " असा सिद्धांत आहे की सार्वजनिक मोठे कार्यकर्ते वैयक्तिक जीवनात सुखी नसतात. हा नियम अगदी श्रीरामचंद्रापासून कोणत्याही पुढाऱ्यापर्यंत लावून पहावा. न, य, व, ब, आ, ई, उ, ए, ओ या अक्षरांनी नावे सुरू असलेल्या लोकांनाही वरील फळे मिळतील.

शुभ तारखा ७।८।९।१०

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला धनप्राप्ती करून देणारे आहे. शनी अकरावा, मंगळ दहावा, राहू-शुक्र नववे, रवी-बुध आठवे व गुरू पाचवा असे रवीशिवाय सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. रवी-बुधामुळे भावंडांकडून त्रास. सरकारी, कोर्टातील, घराबद्दलची कामे पुढे ढकलावी. विद्याभ्यास चांगला होईल. मशिनरी व शेतीचा व्यवसाय चांगला चालेल. ता. ९–१० ला अचानक धनलाभ होईल. चंद्राचे भ्रमण ९–१०–११ या घरातून शुभफलदायी आहे. धनलाभ सतत होत राहील. २७ वयाच्या पुढील व्यक्तींना जास्त प्रगतीपर आहे. हातून शास्त्रीय लिखाण होईल. नोकरीत प्रमोशनचा योग येईल. मातुल घराण्याकडून अगर सासऱ्याकडून ९–१० तारखेला मदत होईल.

शुभ तारखा ९।१०।११।१२

**कर्क** : या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला धनप्राप्ती करून देणारे आहे. चतुर्थात गुरू, शनी दहावा, नववा मंगळ, आठवे राहू-शुक्र, सातवे रवी-बुध अशी संमिश्र फल देणारी ग्रहमालिका आहे. चतुर्थेश व लाभेश शुक्र राहूबरोबर अष्टमात सुखनाश व अचानक धनलाभ दाखवितो. भाग्यातील एकच एक राजयोग-कारक ग्रह मंगळ विद्या-मानसन्मान-धनप्राप्ती होईल असे दाखवितो. ता. ९–१० या धनलाभाच्या दृष्टीने फार चांगल्या तारखा आहेत. जे कराल त्यात यश येईल. चतुर्थातील गुरू सर्व पापग्रहांची वाईट फळे नाहीशी करील. भागीदारांकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. ता. ७–८ ला अचानक धनलाभ. ता. ९–१० ला प्रवासाचे बेत यशस्वी होतील. धनप्राप्ती होईल. ता. ११–१२ ला एकाद्या सार्वजनिक कार्यात भाग घेण्याचा योग येईल. सिंडिकेटची प्रगती होईल.

सर्व आठवडा शुभ आहे.

**सिंह** : या सप्ताहातील ग्रह पीडा देणारे आहेत. नववा शनी, आठवा एकच एक राजयोगकारक ग्रह मंगळ, सातवे राहू–शुक्र, सहावे रवी–बुध व तिसरा गुरू. सुख व भाग्यहानी होईल. भागीदारांकडून व पत्नीकडून त्रास होईल. व्यसनाधीन व्यक्ती ता. ७–८ रोजी बेताल होतील. अनीतिकारक गुन्हे वाढतील. विद्याभ्यास बरा होईल. फॅन्सी वस्तूंचा व्यापार करणारांवर अनपेक्षित नुकसानीचे प्रसंग येतील. कोर्टातील दाव्यात विरुद्ध निकाल लागून नुकसान होईल. सरकारी नोकरीत प्रगती होईल. ता. ७–८ ला घरात भांडणे होतील. ता. ९–१० ला सुखात व प्रतिष्ठेत कमीपणा येईल. मुलांशी व पाठीवरच्या भावंडांशी मतभेद होईल.

शुभ तारखा ११।१२।१३

**कन्या** : या सप्ताहातील ग्रह सौख्यदायक आहेत. शनी आठवा, मंगळ सातवा, राहु–शुक्र सहावे, रवी–बुध व गुरू दुसरा. असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. अचानक धनलाभाचा योग आहे. भावंडांकडून मदत होईल. शत्रुनाश होईल. सरकारी व सहकारी कामात यशप्राप्ती. प्रतिष्ठा वाढेल. बौद्धिक व्यवसायातील – लेखक

शिक्षक–व्यक्तींना आठवडा प्रगतीपर आहे. ३२ ते ३६ वयाच्या व्यक्तींना याचा अनुभव जास्त येईल. वडिलार्जित स्थावर मालमत्तेचे निकाल मनासारखे लागतील. ता. ७–८ ला अचानक धनलाभ. ता. ८–१० ला प्रिय माणसांची भेट. ता. ११–१२–१३ हे सर्व दृष्टींनी दिवस चांगले; फक्त थोडया मानसिक यातना वाढतील.

**तूळ** : या सप्ताहातील ग्रह सौख्यदायक आहेत. पहिला गुरु, चवथे रवी–बुध, पाचवे राहू–शुक्र, सहावा मंगळ व सातवा शनी असे सर्व ग्रह मालायोगात आहेत. सरकारी व सहकारी कामात संपूर्ण यश येईल. चैनीकरता खर्च होईल. विद्याभ्यासात अडथळा, तो नीट चालणार नाही. शत्रुनाश होईल. भागीदारांकडून व पत्नीकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. हाती घेतलेल्या कोणत्याही धंद्यात यश मिळेल. या राशीची माणसे व्यवहारी असतात. पण सध्या गुरु–शनींच्या दृष्टियोगाने भोळसटपणाने एकादा व्यवहार करतील, त्याला जपावे. व्यवहारातील नुकसान टाळण्याकरता गजांतलक्ष्मीच्या तसविरीला हार घालावा. चंद्राचे भ्रमण ५–६–७ या घरातून आहे. ते सर्वच शुभफलदायी आहे. सार्वजनिक कामात संपूर्ण यश.

शुभ तारखा ७।८।९।१०

**वृश्चिक** : या सप्ताहातील ग्रहमान मानसिक यातना देणारे आहे. तिसरे रवी–बुध, चवथे राहू–शुक्र, पाचवा मंगळ, सहावा शनी व बारावा गुरू. नटींना सिनेमा अगर नाटकात प्रवेश मिळविण्याला आठवडा चांगला आहे. एजंट लोकांना नवीन करार करावयास बरा आहे. धनप्राप्तीत अडथळे, सुखनाश, स्थावर मालमत्तेबद्दल झगडे, पोटदुखीचे रोग बळावतील. शत्रुनाश होईल. सार्वजनिक कामात भरघोस यश येईल. ता. ७–८ व ११–१२ रोजी मनस्वास्थ्य बिघडेल. नसती कामे करण्याचे कबूल करून अडचणीत याल. स्त्रीवर्गापासून दूर राहणे बरे. ४२ च्या पुढील वयाच्या माणसांना सार्वजनिक कामात स्त्री-प्रतिपक्षाचा विरोध सहन करावा लागेल.

सर्वच सप्ताह नरम–गरम वातावरणात जाईल.

**धन** : या सप्ताहातील ग्रहमान भोगदायक आहे. दुसरे रवी-बुध, तिसरे राहू-शुक्र, चवथा मंगळ, पाचवा शनी व अकरावा लग्नेश चतुर्थेश गुरु असा हा सर्व ग्रहांचा शुभ मेळावा झालेला आहे. गुरु-शुक्रांचा शुभयोग- नवमपंचम व भाग्येश रवीचा-चतुर्थेश सप्तमेश बुधाबरोबर युती हे दोन्ही योग सर्व बाबतीत प्रगती दाखवतात. मानमरातब, धनप्राप्ती, शरीरस्वास्थ्य या सर्व बाबतीत चांगले योग आहेत. २७ ते ३२ ही ज्यांची वये आहेत त्यांच्या विवाहाबद्दल बोलणी सुरू करण्याला वेळ चांगली. कलावान व बुद्धिजीवी व्यक्तींना हा योग अधिक चांगला आहे. विद्याभ्यासात थोडे दुर्लक्ष होण्याचा योग आहे. हातून उत्तम लिखाण होईल. चंद्राचे भ्रमण ३–४–५ या स्थानातून अस्तगोलार्धात आहे, ते अत्यंत शुभ आहे. पराक्रम, सुख, व संतती या सर्वांना यशदायी आहे.

सर्व आठवडा शुभफलदायी आहे.

**मकर** : या सप्ताहातील ग्रहमान भोगदायक आहे. पहिले रवी-बुध, दुसरे राहू-शुक्र, तिसरा मंगळ, चवथा शनी व दहावा गुरू असे सर्व ग्रह शुभस्थानात आहेत. धनस्थानाचा अधिपती शनी व दशमाचा अधिपती शुक्र यांचा दशमातील गुरूशी शुभ योग आहे. तो अत्यंत चांगला आहे. भाग्येश बुध व रवीची लग्नी शुभ युती आहे. सरकारी कामात यश मिळेल. अचानक चांगल्या घटना घडतील. चंद्राचे भ्रमण २–३–४ या घरातून आहे, ते अत्यंत चांगले आहे. विद्याभ्यासात थोडा अडथळा येईल. यंत्राशी संबंध असलेल्या व फॅन्सी वस्तूंच्या धंद्यात अमाप फायदा होईल. सार्वजनिक कामाकरता केलेल्या प्रवासात निश्चित फायदा होईल.

पहिले दोन दिवस थोडा मनस्ताप होईल. बाकी सर्व आठवडा शुभ आहे.

**कुंभ** : या सप्ताहातील ग्रह शुभ फल देणारे आहेत. रवी-बुध बारावे, राहू-शुक्र पहिले, मंगळ दुसरा, शनी तिसरा व गुरू नववा. रवी खेरीज सर्व ग्रह शुभस्थानात आहेत. भागीदारीत व घरात मतभेद होतील. विद्येत अडथळा येईल. संततीशी विरोध येईल. एकच एक राजयोगकारक ग्रह शुक्र लग्नात आहे व भाग्यातील गुरूने दृष्ट आहे. ४२ च्या पुढील वयाच्या व्यक्तींना विद्येवर अमाप पैसा मिळण्याचा योग आहे. मंगळ धनस्थानात तृतीयेश दशमेश आहे. तो मानमरातब मिळवून देईल. त्यातल्या त्यात ता. ९–१० या दृष्टीने चांगल्या जातील. प्रेसच्या धंद्यात यश मिळेल. हातून पराक्रम होईल. चंद्राचे भ्रमण १–२–३ घरातून आहे, ते फारच चांगले आहे. नवीन व्यवसाय हाती घेणे जमेल. स्त्रियांकडून धनप्राप्ती होईल. कलावान लोकांची चलती होईल. पहिले दोन दिवस मानसिक चंचलता जाणवेल. सरकारी कामे पुढे ढकलावी.

सर्व आठवडा शुभफलदायी आहे.

**मीन** : या सप्ताहातील ग्रहमान सुखकारक फल देणारे आहे. अकरावे रवी-बुध, बारावे राहू-शुक्र, पहिला मंगळ, दुसरा शनी व आठवा गुरू आहे. हातून पराक्रम होईल. भाग्य उदयाला येईल. सरकारी कामात यश येईल. पत्नी व भागीदारांकडून धनलाभ होईल. सरकारी कामात यश येईल. अचानक धनलाभ होईल. वाचाशुद्धी कमी होईल. 'मौनं सर्वार्थ साधनम्' हे लक्षात ठेवावे. अचानक धनलाभाला सप्ताह चांगला आहे. विशेषत: शुक्रवार-शनिवार चांगले जातील. चंद्राचे भ्रमण १२–१–२ या घरातून होत आहे. पहिले दोन दिवस मनस्वास्थ्य बिघडेल. शत्रुनाश होईल.

ता. ९।१०।११।१२

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. MH-649




" काय ? गेल्या दोन वेळेप्रमाणे माझ्या याही आमरण
उपोषणाला तुम्ही दाद देणार नाही ? ... "